६९५

# आव्हान

म ग्रं सं ठाणे
विषय · भू-प्रवास
सं क ६९५



REFBK-0023240

संदर्भ
भु-प्रथास्या
६९५
२३२४०
२८।८।८९

# आव्हान

लेखक
आनंद पाळंदे

REFBK-0023240

किंमत पंचवीस रुपये

मुक्ता प्रकाशन

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

**सूचना** :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

23 SEP 1981
4 OCT 1981
18 OCT 1981
25 NOV 1981
30 NOV 1981
13 DEC 1981
20 DEC 1981
10 JAN 1982
26 SEP 198
24 OCT

19 FEB 1986
23 APR 1986
MAY 1986
11 MAY 1986
16 DEC 1987
5 MAY 1986

(क्र मा. प.)
५०००-४-८०

प्रकाशक
मुक्ता प्रकाशन,
माधववाडी, १०२ / सी
खो क्र ९
मु म ग्रंथ सं. मार्ग दादर
मुंबई ४०००१४

लेखक
© श्री आनंद वा पाळदे
२/३ एरंडवणे
प्रभाकर सदन
कर्वे पथ
पुणे ४११००४

मुद्रक
चिं स लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४, सदाशिव
शिव-पार्वती
पुणे ४११०३०

मुखपृष्ठ
बादोडकर

मुखपृष्ठ छपाई
बॉम्बे सर्वोदय प्रेस,
माहीम, मुंबई

फोटो व नकाशे
आनंद पाळदे

ब्लॉकमेकर
मुखपृष्ठ व इतर चित्रे
भारगळकर प्रोसेस व
कलाभुवन ब्लॉकमेकर्स

प्रथमावृत्ती
मार्च १९८१

किंमत
पचवीस रुपये

ज्याच्या प्रेरणेशिवाय
पाय कधी
घराबाहेरही पडले नसते,
त्या बंधू रमाकांत यास

**आनंद पाळंदे**

६९५
२३२७०
भु–प्रवास
२४।८।९

## लेखकाचे मनोगत

गिरिभ्रमणाला मी दहा-बारा वर्षांपूर्वी सुरुवात केली त्या वेळी असे वाटले नव्हते की, हा भटकण्याचा छंद माझ्या जीवनाचा अविभाज्य घटक होईल पण आता खरोखरीच ह्या छंदाला बाजूला ठेवणे अशक्य झाले आहे हा छंद समाजाच्या सर्व वयोमानाच्या गटातही आता चांगला जोपासला गेला आहे.

या विषयावर मराठी भाषेत मार्गदर्शनपर पुस्तके मात्र अद्याप प्रसिद्ध झालेली नाहीत यासाठी वर्तमान पत्रीय लेखावरच अवलंबून राहावे लागते हे पुस्तक वेळोवेळी वर्तमानपत्रे, मासिके यात प्रसिद्ध झालेल्या माझ्या लेखाचा संग्रह आहे या लेखाना दूरदूरच्या वाचकाचाही उत्तम प्रतिसाद आला होता. या लेखातील माहिती प्रत्यक्ष भटकणाऱ्याना उपयोगी पडावी या दृष्टीने लिहिलेली आहे त्याचबरोबर त्यात अनुभवसिद्ध लालित्यही असल्याने इतर वाचकानाही ते आवडावेत.

महाराष्ट्रातील गिरिभ्रमण म्हणजे प्रामुख्याने दुर्गभ्रमणच आहे त्याचबरोबर या दुर्गांच्या परिसरात अनेक ऐतिहासिक स्थळेही विखुरलेली आहेत गिरिभ्रमण करताना अपरिहार्यपणे हीही स्थळे नजरेस येतात अर्थात त्यावरील लेखनही यात समाविष्ट केले आहे मात्र हे पुस्तक वाचून भटकतीला बाहेर पडणाऱ्यानी एस टी गाडीच्या वेळा इत्यादी माहिती मात्र अद्ययावत मिळवूनच कार्यक्रम ठरवणे चांगले.

गिरिभ्रमण करताना एकाच भागातील शेजारशेजारची स्थळे निवडून जास्त दिवस जाणे खर्चाच्या दृष्टीने सोयीस्कर पडते. उघड्या आभाळाखाली, शक्यतो वस्ती टाळून ( पण पाणवठा पाहिजेच ) मुक्काम, करणे,

शिधा-सामग्री सोबत नेऊन स्वावलंबी जीवन जगणे, यात शरीराला कष्ट होतातच पण भटकतीतील आनंदाचे तेच खरे रहस्य आहे हिंडताना वाटा अवश्य विचाराव्या पण पूर्णपणे वाटाड्या सोबत घेऊ नये. ऐतिहासिक स्थळ पाहायला जाताना त्याचा इतिहास आधीच वाचून जाणे योग्य ठरेल अर्थात इतिहासाकडे दुर्लक्ष करून केवळ गिरि-भ्रमण हे उद्दिष्ट ठेवूनही जायला हरकत नाही मात्र निसर्गाचा आनंद मिळ-विताना ऐतिहासिक अव शेषाचा नाश होणार नाही आणि जाता जाता घाटाची, वास्तूंची माहिती त्यानी जमविली तर ते उत्तम होईल कारण इग्रजांनी तयार केलेली गॅझेटियर अपुऱ्या माहितीची असली तरीही अजूनही त्यावरच अवलबून राहावे लागते आहे.

माझ्या लेखातील माहितीत इतरानी भर घालून ती लिहून ठेवणे व पुढच्या लोकाना उपलब्ध करून देणेही योग्य होईल

हे लेख लिहिताना मला अनेकाचा उपयोग झाला त्याचा उल्लेख करणे अनिवार्य आहे सर्वश्री दिलीप निंबाळकर, उषःप्रभा भिडे (साठे), डॉ जी आर पटवर्धन, र य पराडकर, डॉ. अ वि नाईक, मठाधिकारी, म वि सोवनी, सुरेश गरसोळे यानी मोलाची मदत केली आहे भारत इतिहास सशोधक मंडळा-चाही उल्लेख आवश्यक ठरेल

हे लेख यापूर्वी मनोहर, स्वराज्य, सकाळ, केसरी, तरुण भारत, विशाल सह्याद्री, महाराष्ट्र टाइम्स, नवशक्ती, लोकप्रभा, मराठा यातून प्रसिद्ध झाले होते

प्रकाशक श्री करदीकर याचे आभार मानणे त्याना आवडणार नाही. ते स्वतःही 'भटके' असल्यामुळेच हे पुस्तक प्रसिद्ध करण्यास उद्युक्त झाले

या पुस्तक प्रसिद्धीमुळे आम दर्जाच्या गिरिभ्रमणाला आणि पर्यटणाला अधिक चालना मिळावी हीच इच्छा

—आनंद पाळंदे

# अनुक्रमणिका

दुर्ग पन्हाळा ते सिंधुसागर / १
दिवे घाटातील ऐतिहासिक वास्तू : जाधवगढी / २२
एका मेघाळलेल्या दिनी ' मुन्हा रायरेश्वर / २९
होळकराची गढी / ३५
माळशेज घाटानजीकचा हरिश्चंद्रगड / ३८
शिवथरच्या गिरिकंदरी / ४८
दुर्गम दुर्ग वासोटा ! / ५६
हेळवाकची रामघळ / ६७
मुळशीच्या मावळतीकडे / ७०
भीमा ताटाकी पेडगावी / ८२
दुर्ग लिंगाण्या, एक बेभान / ८६
सिंहाच्या छाव्याने जेथे आत्मसमर्पण केले / ९५
हिरवे डोंगर ओल्या वाटा ! / ९८
रतनवाडीचे अमृतेश्वर मंदिर / १०५
डोंगरमाथ्यावरी / १०८
मेरुलिंग आणि धावडशी / ११६
अरण्यदुर्गाच्या माथ्यावर / १२२
मुरुड जंजिरा / १३१
अवतीभवती डोंगरझाडी / १३४
गडावर स्वारी एक आगळा आनंद / १४३
नळदुर्ग : सहलीचे उत्तम ठिकाण / १५२
तोरणा ते रायगड : पायी / १५९
पेशवेकालीन वडकी तलाव / १६९

आव्हान

या पुस्तकातील लेख
पुनर्मुद्रित करण्यास
परवानगी दिल्याबद्दल
तरुण भारत, पुणे,
महाराष्ट्र टाईम्स, मुंबई,
लोकप्रभा, मुबई,
रविवार सकाळ, पुणे,
सा मनोहर, पुणे,
सा. स्वराज्य, पुणे,
केसरी, पुणे,
नवशक्ति, मुबई
व विशाल सह्याद्री, पुणे
या सर्वांचा
मी आभारी आहे
मुक्ता प्रकाशन करता

एकनाथ गणेश करंदीकर

# दुर्ग पन्हाळा ते सिंधुसागर

६९५ २३२०० प्रवास २८/८/८

आषाढातली शुद्ध पौर्णिमा अन् तरीही पन्हाळगड दाट काळोखात बुडून गेला. पावसाळ्याचे दिवस होते. आकाश मेघानी झाकोळून गेले होते. कडाडणाऱ्या विजा आणि गस्त घालणाऱ्या पहारेकऱ्याच्या ललकाऱ्याच तेवढ्या निरव शाततेचा भंग करीत होत्या. बाकी सर्वत्र काळोख अन् शातता याचे साम्राज्य ! ही होती शके १५८२ च्या आषाढातली काळोखी रात्र !


गडाचा दरवाजा हलकेच उघडला गेला आणि सहाशे धिप्पाड सावल्या अधारात विलीन होऊन कितीतरी दूरवर निघून गेल्या...

साक्षात पारतत्र्य सिद्दी जौहरच्या रूपाने गडाला गराडा घालून बसले होते. छावणीत मशालींचे जाळे पसरले होते. पहारेकरी निद्रेच्या गोड गुंगीत होते आणि एकाएकी छावणीत एकच एक गदारोळ उठला,

" भागो ! दौडो ! भाग गया ! "

" सिवाजी ! सिवाजी ! "

मी झटकन जागा झालो ते याच गलक्याने नुकतेच कुठे उजाडत होते. साथी शिलेदारही उठून बसले होते. सामानाची बाधाबाध चालली होती. एकदम लक्षात आले की पन्हाळगडावरच्या सोनाळे तळ्याशेजारील दत्त मदिरात आम्ही आदल्या दिवशी डेरे-




दाखल झालो होतो. सात दिवसाचा प्रवास मनात योजला होता. थेट सिंधुसागरापर्यंत !

इतिहाससंशोधक श्री मु गो. गुळवणी याच्यासमवेत सोनाळे तळे सोडले. आणि पन्हाळ्याच्या इतर घरावर अजून झोपेची झापड होती तोच राजदिंडी मागे टाकून ही दिंडी व पुसाटीचा बुरूज यामधील तटातल्या वाटेशी आलो. श्री. गुळवण्याच्या आपुलकीची जाणीव मनात ठेवून गडाबाहेर पडलो. समोर म्हसाई पठार व खाली तुरुकवाडी दिसत होती. बावतच खाली उतरण्यास सुरुवात केली.

आम्ही पुढे धावत होतो पण विचार मात्र पूर्वीच्या बुलंद वेढ्यात शिरले. शके १५८२ च्या चैत्री पाडव्याला गडावर दाखल झालेले शिवछत्रपती ४॥ महिने त्या मृत्युमिठीत अडकले आणि मग एका रात्री आदिलशाही फौजेच्या वेढ्यातून महाराज सहाशे मावळ्यासह बाजीप्रभूच्या सागातीने ऐन पावसाळ्यात विशाळगडास निसटले ते ज्या मार्गाने गेले असावेत जवळजवळ त्याच मार्गाने आम्ही पुण्याचे सहाजण आता उन्हाळ्यात चालले होतो. जंबोजेट युगातले एक वेडे साहस!

भानावर आलो तेव्हा पुसाटीचा बुरूज मागे पडला होता आणि त्याबरोबर पन्हाळाही ! तुरुकवाडीच्या अलीकडून उगवतीकडे पाठ करून म्हसाई पठाराची चढण चढण्यास सुरुवात केली. महाळुंगे गावातून थोड्याच वेळात पठारावर आलो. कसोटी क्रिकेटचे मैदान सहज सामावू शकेल असे हे मोठे पठार आहे. सर्वत्र काळा खडक- पश्चिमेस एक पांढरा ठिपका दिसतो. हेच म्हसाईचे देऊळ. आकाश स्वच्छ असेल तर पन्हाळ्याच्या पुसाटी बुरुजावरूनही हे दिसू शकते.

उगवतीला प्रकाशशलाका झोपेतच होत्या. डावीकडची वाट सोडून म्हसाईच्या दिशेने चालायला सुरुवात केली. मी, अजित पंडित, वसंत जोशी असे आघाडीवर तर श्रीकांत प्रभुणे, प्रकाश जोशी, सुरेश मराठे हे पिछाडीस होते. डावीकडे खोल दिसणारे कासारीचे हिरवे खोरे न्याहाळत सुमारे दीड तास चालीनंतर एक मोठे खिंडार पार केले व पन्हाळ्यापासून ८ कि. मी. अंतरावरील म्हसाईचे देऊळ सामोरे आले. पठाराच्या दक्षिण कड्यावरील या देवळात एक अंगात आलेली बाई घुमत होती — हुं हुं हुं ऽ ऽ ऽ म्हसाई देवळाच्या दारातून साधारण उत्तरेला दृष्टी टाकली तर दूरवर एक लाकडी खांब दिसतो. तो आम्ही जवळ केला. पुढे एक कोरडे तळे मागे पडले आणि एका ओढ्याच्या घळईत खोदलेली 'पांडव- दरा लेणी' दृष्टीस आली. ही बुद्धकालीन लेणी अर्धवर्तुळाकृती असून, आठ छोट्या व दोन मोठ्या गुहा आहेत. एका गुहेत घुमटाकार 'दघोबा' असून बुद्धाचे प्रतीक म्हणून बांधलेला असतो. लेण्याची पडझड बरीच झाली आहे. कोरीव काम मात्र अजिबात नाही.

पांडवदरा सोडले तेव्हा मनगटी घड्याळाने नऊ दर्शविले. तास- भरात वाटचालीनंतर पुन्हा एक खिंडार लागले. येथूनच पठार

उजवीकडे खाली उतरून कुंभारवाडीवरून पठार डावीकडे ठेवून पुढे जायला हवे. पण चुकून वाट सपली असताही आम्ही खिंडारातून काट्या-कुट्यानी खरचटत दीडशे मीटर उंचीच्या सरळ कड्यावर उभे ठाकलो. खालची तांबड्या मातीची शेते अन् कासारीचे खोरे यानी मनाला तजेला दिला.

कड्याच्या काठाकाठाने पुढे निघालो आणि कुवारखिंड दिसू लागली. ही खिंड मोठी गमतीदार आहे. एकावर एक ठेवून रचावे तशा ताशीव खडकाच्या माळाच्या माळा इथे दिसतात.

उत्साहाने पुढे गेलो, पण एक तुटलेला कडा, सामोरा आला. थोडे मागे फिरलो तो वाट गवसली असे वाटले. पण क्षणभरच ! कारण, पठाराच्या थोड्या खालच्या अंगाने गेल्यावर पुन्हा एका कड्याने आमचा मार्ग अडवला.

आता मात्र आमचे धाबे दणाणले. खाली शेतात माणसे दिसत होती, पण अंगठ्याएवढी. आम्ही ओरडून-आरडून त्याचे लक्ष वेधले पण आमचे व त्याचे आवाज यानी दरी नुसती घुमत होती. सरळ तसेच पुढे कुंवारखिंडीत जायचे म्हणजे चक्क कडेलोटच. किंचित मागे वळलो. एक पावसाळी धबधब्याचा कडा दिसत होता. मोठाल्या शिळा थेट खालपर्यंत पहुडल्या होत्या. सरळसोट कडा ! मनातला धाडसी विचार एकदम अमलातही आणला व दोन कि. मी. मागे जाण्याचा मरीआईचा फेरा चुकवून हा वेताळाचा कडा धडपडत, ठेचकाळत, घसरत आणि खरचटत खाली उतरलो. हा एक कडा उतरण्यास तब्बल पाऊण तास गेला, पण सफरीत एक आगळेच ' थ्रिल ' निर्माण झाले.

काही काळातच शेतात पोचलो. रामराम करून चौकशी केली तो कळले की ती माणसे कुभारवाडीतली ! सूर्य माथ्यावर येऊ पाहत होता. सायंकाळपर्यंत निदान ' पाटेवाडी ' तरी गाठावयाची

होती. अन् वाटेत तर अजून कितीतरी वाड्या! ठरवले की कितीही वाजोत, करपेवाडीशिवाय पोटपूजा करावयाची नाही.

कुवारखिंडीच्या उजवीकडून तिला पाठीमागे टाकून चापेवाडीत किंवा खोतवाडीत शिरलो. कुवारखिंडीत एक कुवारी देवीची मूर्ती आहे. पूर्वी कधी काळी खाबातून एक कुमारी स्त्री नाहीशी झाली असे सांगतात.

शास्त्रीय परिभाषेत कुवारखिंडीत आढळणाऱ्या खडकास असितास्म स्तंभ ( Basault Columns ) म्हणतात. लाखो वर्षांपूर्वी लाव्हारस थंड होत असताना काही विशिष्ट तपमानात रसाच्या तळापर्यंत जोड निर्माण होऊन वरील प्रकारचे स्तंभ निर्माण झाले. मुबईतील अंधेरीलाही अशा प्रकारचे स्तंभ आहेत.

चापेवाडीनतर पिशवीच्या धनगरवाड्यावरून आम्ही पुढे निघालो. कुवारखिंड मागे पडत होती आणि आमच्या डावीकडची डोंगररागही सतत लाबलाब वाढत होती, हनुमंताच्या शेपटासारखी! करपेवाडी तर अजून कितीतरी दूर होती.

सुमारे २० किलोमीटर चालणे झाले होते. दुपारचे कडकडीत ऊन व चढउताराचा रस्ता यानी आपले दात दाखवायला सुरुवात केली. पाय जड होऊन रेंगाळले. आमचे आपोआप दोन गट होऊन एक गट मागे पडला. साधारण २—२॥ च्या सुमारास माडलाईवाडी आली. तिथल्या मधुर व थड पाण्याची चव घेऊन पुढे निघालो. आता दोन वाटा फुटल्या, दोन्हीही बऱ्यापैकी बैलगाडीचे रस्ते. संभ्रमात पडून आम्ही नेमके डावीकडच्या चढणीला लागलो ( खरे म्हणजे करपेवाडीला जाण्याची वाट उजवीकडची, खालच्या अगाने जाणारी ) तासाभरात करपेवाडीला पोहोचू असा अदाज होता. पण बराच वेळ गेला तरी तिचा मागमूस लागेना.

आता निसर्गाचे भेसूर रूप जाणवू लागले. चहूकडे किर्र रान,

रखरखीत ऊन. जवळजवळ २ तास मनुष्यवस्तीचा पायरव नाही. मोठाली गावे कितीतरी दूर! आमच्या सवंगड्याचा तर पत्ताच नव्हता. इतक्यात नवल वर्तले. दूरवर दोन परकरी मुली व त्याचा भाऊराया जाताना दृष्टीस पडले. इतक्या वेळच्या निर्मनुष्य प्रदेशा-मुळे ६ फुटी पंडितने एकदम पुढे होऊन जोरात हाळी दिली. रानातल्या भीषण शांततेला चिरीत तो आवाज दूरवर गेला आणि आगीतून फुफाट्यात सापडलो. डोंगरातून हिंडणाऱ्या तीन भुताच्या कल्पनेने त्या मुली विलक्षण भयानक रीतीने किंचाळत नाहीशा झाल्या. क्षणभर पुन्हा नीरव शांतता! डोळ्यासमोर क्षणात काजवेच चमकले. मनात आलं की जर का याचे दादा-बाबा आले आणि गैरसमजाने कुऱ्हाडी अंगावर पडल्या तर? तर काय? या भयाण रानात हाडसुद्धा सापडणार नाही, कोणाला! पुढे आमच्या नावे वीरगळाचे धोंडे उभारायचे तरी नेमक्या जागेवरून संशोधकात वादच होतील. आता पन्हाळा पण नाही अन् विशाळगड! तो तर नाहीच नाही. संपलंच सारं!

पण पुढचा क्षण सुटकेचा आनंद घेऊन आला. झाडीतून मुंडाशी बांधलेली डोकी वर आली. त्यांनी विशेष गैरसमज करून न घेता वाट दाखवली. धडधडणारी हृदये शांत झाली. दूरवर पाठीमागं एक गाव दिसत होते. त्राण नसतानाही धावतच ते गाव गाठले. करपेवाडीच होती ती! आमचे मागचे तीन वीरही भरकटत करपेवाडीस दाखल झाले.

( पन्हाळ्यापासून २५ कि. मी. )

या सगळ्या गोंधळात सांजावले होते. विठ्ठलराव जाडगे या पहिलवान गृहस्थाकडेच पथाऱ्या पसरल्या. रात्री स्वप्ने पडत होती. जंगलाची, ओढ्या-नाल्यांची, विशाळगडच्या दऱ्या-खोऱ्याची!

जाग आली ती जात्याच्या घर्घर आवाज आणि गोड ओव्यांनी.

सफरीचा आजचा तिसरा दिवस. तुकाराम जाडयाना बरोबर घेऊन करपेवाडीचे अंगण सोडले. भातखाचरातल्या वाटेने आंबेवाडीतून पुढे गेलो. प्रभात समयीची काहीशी गार व कुंद हवा. डोंगरी वाऱ्याचा मंद झुळकातून येणारा गोड सुवास. पक्ष्यांची किलबिल, वेडंवाकडं पण गच्च रान यामुळे थकवा नाहीसा झाला. यातूनच मार्ग काढीत कळकवाडी, रिंगेवाडी, माळेवाडी, अशा पाठोपाठ तीन वाड्या मागे टाकत पाटेवाडीत पाऊल रोवले. करपेवाडी-पाटेवाडी हा दोन तासाचा रस्ता.

वाटेतील वाड्यांची रचना एकसारखीच. फणस, आंबे, जांभळी यानी वेढलेली तांबडी कौलारू घरे आणि मधूनमधून फरसबंद रस्ता. आधुनिक विश्वाच्या वाऱ्याला न उभ्या राहणाऱ्या या वाड्यांचे सौंदर्य आगळेच ! दरिद्रीपणा पण त्यापेक्षा माणुसकी विपुल.

निसर्गाचे रौद्र पण मनोहर रूप आता जाणवू लागले. पाटेवाडीतून बाहेर पडताच दूरवर एक धनगरवाडा दिसतो. यापुढचा मार्ग नवख्याना वाटाड्याशिवाय सापडायचा नाही. कारण दाट रानातले ओढे, नाले, आणि दिशाहीन वाटा. वाट चुकली तर भरकटण्याशिवाय गत्यंतर नाही. कौरवानी उभारलेला चक्रव्यूहच जणू !

हा चक्रव्यूह छेदीत मन एकदम मागे गेले. अभिमन्युरूपी शिवछत्रपती ३०० वर्षांपूर्वी या चक्रव्यूहातून पावसाळ्यात कसे निसटले असतील ? शत्रू घोड्यावरून जोरदार पाठलाग करतोय. कवींद्र परमानंदाने शिवभारतात वर्णन केल्याप्रमाणे शिळांच्या योगे उंचसखल झालेला, पर्वताच्या तुटलेल्या कड्यांवरून पडताना गर्जना करणाऱ्या नद्यांच्या योगे अतिदुर्गम झालेला, निळ्या शेवाळ्याच्या योगे जांघडभर चिखल साठलेला, पालवीच्या योगे चकचकीत दिसणाऱ्या तळानी ज्याच्या वरील वृक्षाना वेढलेले आहे. तुफानी पर्जन्यामुळे

धादल उडालेल्या वाघाची गर्दी ज्याच्यातील गुहामध्ये झाली आहे, वारुळातून बाहेर पडणाऱ्या सर्पांना मारण्याच्या त्वेषाने इच्छेने धावणाऱ्या मोराच्या टाहोंनी भरलेला आणि मनुष्याचा संचार नसलेला असा भयकर मार्ग सात प्रहरात (२१ तास) उल्लंघून जाणे अग्नि-दिव्यापेक्षाही बिकट होते. धन्य धन्य त्या बाजीप्रभूची आणि मर्द मावळ्याची.

इतिहास गंगेत हरवून जाऊन ओढेनाले ओलाडीत सुकामाच्या किंवा पणुंद्याच्या धनगरवाड्यावर कधीच पोचलो. या वाड्यातून एक मधली वाट पाढरपाण्याला आहे. पण तिथे अतिशय दाट रान. ती वाट सापडणार नाही म्हणून जरा लांबच्या वाटेने निघालो, पण एक मोठा ओढा ओलांडून पुढे रानात शिरताच वाट गडप. वाटाडेसुद्धा चक्रावून गेले. थोडा वेळ भरकटून कुठल्यातरी अंत:प्रेरणेने एक वाट धरून म्हसवडे गाठले. विश्रांती घेऊन पुढे निघालो. मानवाड्यावरून मलकापूर अणुस्कूरा एस. टी. रस्ता जवळ केला आणि थोड्याच वेळात पाढरपाण्याने पाढरे निशाण दाखवले. पाढरपाणी पन्हाळ्याहून सुमारे ४०–४१ किलोमीटर येईल.

तुकाराम जाडग्याचा औदार्याने निरोप घेतला. पाढरपाण्यात रामचंद्रराव हेगीष्टे याचा स्नेह संपादून बाहेर पडलो. कडकडीत उन्हाळ्यातल्या मृगजळात धनगरवाडा उठून दिसत होता. पाऊलवाटेने एक चढण चढून धनगरवाड्यात शिरलो. या वक्ताला वाड्यात बाप्ये माणसे भेटणे कठीणच. घोडखिंड गवसायची नाही म्हणून सखुबाई कातर या धनगरणीस विचारलं. ती पटकन म्हणाली, "चला मी दावतो वाट तुमास्नी, अगदी गजापूरचा मोहरा दिसेपर्यंत सोडतो." इकडली बायामाणसही पुरुषीच बोलतात.

रान सुरू झाले आणि एका अनोख्या संवेदनेने मन भरून आले. इथून पुढचा प्रदेश रणभूमीचा. गजापूरच्या घाटातील घोड-

खिंड (पावनखिंड) इथलीच. इथेच ते झुंज लढले. एका ठिकाणी फरसबंदी वाट लागली. हीच जुनी ऐतिहासिक वाट असावी. रानातली सपाटी संपली आणि घोडे माळाचा उतार सुरू झाला. बरेच खाली उतरलो व एका ओढ्यात शिरलो. पाण्यात पावले चुबक-चुबक वाजवीत ओढा वाहत होता त्या दिशेने निघालो. झाडीच्या गचपणातून ओढा खोल उतरत गेला होता अन् काही वेळातच आम्ही एकदम ओढ्यातल्याच ६–७ मीटर उंचीच्या कड्यावर येऊन उभे राहिलो पावनखिंड ?

तिथले दृश्य पाहून मन थरारले. झाडीने झाकलेला खोल उतरत जाणारा कासारी नदीचा ओढा, त्यातल्या अजस्र शिळा, दोन्ही बाजूचे ३० मीटर उंचीचे ताशीव कडे, असे दृश्य इंग्रजी बोलपटातच असू शकते ही कल्पना क्षणार्धात धुऊन निघाली. झाडाच्या मुळीला धरून कसेबसे तो कडा उतरलो. पालापाचोळा अन् अजस्र शिळांचा खच पडलेला होता. पण कासारी नदीचा ओढा इथूनच वाहतो. गोड, थंडगार पाणी, ते अमृतमय जल प्राशन करून खिंड न्याहाळली

वाट अरुंद, अवघड! (किंबहुना वाट नाहीच.) खिंडीच्या तोंडाशी एक उंच कडा आहे. पावसाळ्यात येथून प्रचंड वेगाने पाणी वाहात असणार. हा ओढा केमरुणवाडीस उतरत जाऊन त्याला कासारी नदीचे स्वरूप पुढे आलेले आहे. या खिंडीत उभे राहून वरच्या बाजूने येणाऱ्या शत्रूशी लढणे तेथील परिस्थिती पाहता अशक्यच वाटते. घोडखिंडीसबंधी ज्या एकमेव एक्क्याण्णव कलमी बखरीतून उल्लेख आहे, तो सध्या प्रचलित असलेल्या पावनखिंडीच्या भौगोलिक परिस्थितीशी जुळलेसा वाटत नाही. तेव्हा झुंज झाल्याची खिंड नेमकी हीच का असा संभ्रम येथे आल्यावर प्रत्येकाच्या मनात निर्माण होईल असे वाटले. हा वादाचा

मुद्दा सोडला तरी ती अविस्मरणीय झुंज याच परिसरात गजापूरचे घाटी झाली हे निश्चित.

शके १५८२ च्या आषाढातील वद्य प्रतिपदेला झालेल्या त्या बाजीप्रभूंच्या अविस्मरणीय झुंजीचा प्रसंग मनाच्या गाभ्यातून काही काळ वर उफाळून आला. हिंदवी स्वराज्य प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णू करण्यासाठी बाजीप्रभू देशपांडे पायातील पत्थर बनले. अमर झाले !


सपाटीवरून गजापूरच्या दिशेने निघालो. मनात असं आलं की खरोखरच ही रणभूमी प्रत्येकाने पायी न्याहाळली पाहिजे. गजापूरचा मोहरा दिसल्यावर सखुबायला निरोप दिला.

बरेच खाली उतरल्यावर कासारी नदी ओलांडली आणि केंमरुणवाडी–विशाळगड रा. प. ( एस. टी. ) रस्त्यावरून गजापूरला श्री. गणपतराव सिनकराकडे दाखल झालो. दऱ्याखोऱ्यातून पायी भटकंती करून विशाळगडाकडे जाणाऱ्यांनी खुशाल गणपतरावाच्या घरात पाऊल ठेवावे. तिथे अशा वीरांसाठी सदैव स्थान असते.


त्यांचा पाहुणचार घेऊन गजापूर सोडले आणि ३ किलोमीटर अंतरावरील विशाळगडाकडे मोहरा वळविला. गडाचे दर्शन मात्र लांबून होत नाही हे याचे वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. सूर्यनारायण मावळतीकडे झेपावत होता. सावल्या लांबत चालल्या होत्या. त्यामुळे थकल्याभागल्या पावलांनीच झपाझपा चालून विशाळगडासमोरच्या पठारावर आलो आणि थोड्याच वेळात गडाच्या अक्राळविक्राळ कड्याचे दर्शन घेत, मधली खोल दरी एका चिंचोळ्या वाटेने ओलांडून, पन्हाळगड ते विशाळगड ही सुमारे ५० किलो मीटर अंतराची वाटचाल पायी पूर्ण करून गडात प्रवेश केला.

आकाशात चांदण्या डोकावू लागल्या होत्या. भगवंतेश्वराचे पुजारी श्री. हर्डीकर यांच्याकडे सामान उतरवले. दिवसभराच्या

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६१५
२३२७०
२८।८।८९



पन्हाळगड—तीन दरवाजातील गवाक्ष



विशाळगड — मलिकरहानाचा दर्गा
व ही दुर्दशा बाजी प्रभू देशपांडे व फुलोजी देशपांडे यांच्या समाध्यांची



श्रमाने सगळे शिलेदार थकले होते. त्यामुळे देवळात अंग टेकताच निद्रादेवीने हलकेच पाखरूण घातले. गाभाऱ्यातील समईच्या शांत प्रकाशात सगळ्यांच्या चेहऱ्यावर झळकणारे अतीव समाधान तेवढे जागे होते.

सह्यगिरीच्या घाटमाथ्यावरील घोंघावणाऱ्या वाऱ्यामुळे नवीन दिवसाची चाहूल लागली. विशाळगडच्या कडेकपाऱ्या मराठ्यांच्या पराक्रमाचा सुगंध धुक्याच्या लाटांबरोबर चहूकडे उधळू लागल्या.

' संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग ! ' विशाळगडचे वर्णन करण्यास शिवछत्रपतींचे एक प्रधान रामचंद्रपंत अमात्य यांच्या आज्ञापत्रातील हे वाक्य पुरे आहे.

विशाळगडचे जुने नाव ' खेळणा ' होते. सह्याद्रीच्या मुख्य रांगेत कोल्हापूर–रत्नागिरी रस्त्यावरील आंबा गावापासून एस. टी. ने १९ कि. मी. अंतरावर हा दुर्ग अतिशय प्राचीन काळापासून १०२१ मीटर उंचीवर खडा आहे. नावाप्रमाणेच विशाल असलेला हा गड आपल्या धारदार खोल कड्यांनी डोळ्यांना पाताळाचा वेध घ्यायला लावतो. चारही बाजूंनी तितक्याच उंचीच्या पठारांनी वेढलेला असल्यामुळे विशाळगड एखाद्या निसर्गनिर्मित तुरुंगासारखा भासतो. पूर्व-पश्चिम बाजूनी हा चिंचोळ्या वाटांनी बाहेरच्या प्रदेशाला जोडला गेला आहे. या वाटा रोखल्या तर गडावर कोणीही शिरणे अशक्यच ! एरवीदेखील इथल्या सह्याद्रीचे रौद्रसौंदर्य मोहून टाकते तर जलधारांच्या वर्षावात याचा डौल कसा खुलत असेल, याची कल्पनाच करावी.

या गडाचे ऐतिहासिक महत्त्व फार मोलाचे आहे. याचा काल जवळजवळ १० व्या शतकापर्यंत जातो. शिलाहार राजा भोज व यादव राजे यांच्या साम्राज्यानंतर मोगलांकडून इ. १६५९ मध्ये शिवाजी राजांच्या समशेरीने या गडाला आपलासा केला आणि

पुन्हा वर्षभरानेच सिद्दी जोहरच्या तावडीतून सुटून राजे पन्हाळ्याहून आले ते थेट इथेच. रामचंद्रपंत अमात्य यानीही हुकमतपनाह ही विरुदावली इथूनच सार्थ केली. इ. १७०२ च्या जूनमध्ये औरंगजेबाने ६ महिन्यांच्या वेढ्यानंतर मोठी रक्कम देऊन हा गड हस्तगत केला. या लढाईत व नतर झुझार मराठ्यानी आणि इथल्या धुंवाधार पावसाने मुघलाची अशी धुळदाण उडवली की त्याला तोड नाही. मराठी दुर्गाचे धारदार पाणी औरंगजेबाला विशाळगडानेच दाखवले.

सांप्रत गडावरच्या वास्तूची फार दुर्दशा झाली आहे. गत-इतिहासाचे सोनेरी दिवस पाहणारे हे रखवालदार भग्नावस्थेत आहेत.

सती अंबिकाबाई भोसले (राजाराम महाराजाच्या पत्नी) याच्या समाधीचे दर्शन घेऊन पिशव्या पुन्हा पाठीवर चढवल्या. आज सफरीचा तिसरा दिवस.

विशाळगडाचे ऐतिहासिक पाश मागे सारून मन सिंधुसागराकडे धाव घेत होते. पश्चिम टोकावर येताच आजूबाजूच्या भीषण कड्यातून, समोरच्या पठारावरील झाडीतून माचाळकडे वळणे घेत धावणारी अन् चढणारी तांबडी सडक वाट दिसत होती.

खाली उतरून विशाळगड आणि माचाळचे पठार यामधील खिंडीत प्रवेशलो आणि गडाची हद्द ओलांडून रत्नागिरी जिल्ह्यात प्रवेश केला, खिंडीपुढचा कडा बेभानपणे चढल्यावर पठाराचा माथा आला आणि आमची तुकडी माचाळकडे वळली. माचाळला पोहोचलो तेव्हा सूर्य माथ्यावर आला होता.

माचाळला लागूनच असलेल्या एका शिखरावर मुचकुंद गुहा आहे. माचाळपासून या ठिकाणचे पडके बांधकाम दिसते. एका ओढ्याच्या काठाने तासाभरात मुचकुंद गुहेसन्निध आलो. तळ-कोकणचे दर्शन होताच पश्चिमी वारा अंगाला स्पर्श करून गेला.

भन्नाट वाऱ्याने थकवा फुंकरीसारखा उडून गेला.

मुचकुंद गुहेचे स्थान रम्य आहे. गुहेच्या एका बाजूस ऐसपैस जागेवर जांभळांची गर्द सावली आहे. तर दुसऱ्या बाजूस कोकणात कोसळणारा खोल कडा आहे. गुहा पुरुषभर उंच असून, बाहेरील बाजूस वरती घुमट आहे. मुख्य द्वारातून गुहेत उतरण्यास जाण्या दगडाच्या भक्कम पायऱ्या आहेत. गुहेला तीन तोंडे आहेत. गुहेच्या मध्यभागी देवतारूपी वाटोळे दगड व एक घंटाही आहे. कर्नाटकातले कर्नाड स्वामी या गुहेत पूर्वी तप:साधना करीत असत असे सागतात. गुहेसंबंधी स्थानिक लोक महाभारतातील कृष्णावतारातील मुचकुंद ऋषी, कालयवन व श्रीकृष्णाची कथा सागतात.

त्या गुहेवरच्या घुमटापाशी उभे राहून कोकणदर्शन घेतले. क्षितिजापर्यंत पसरलेले निळेभोर आकाश, धूसर झालेले कोकण आणि शेते, डोंगरातून निघणारे धुराचे लोट याची झालेली सरमिसळ एक सुरेख लय साधत होती. खाली असलेली पायवाट आमच्यासमोर दूरदूर गेलेल्या दांडावरून साखरप्याकडे रवाना झाली होती. तीच वाट आता आम्हाला उतरायची होती. खाली उत्तरेकडे खोलवर काजळी नदीचे खोरे दिसत होते. विशाळगडचे आठवणीने किंचित मागे वळून पाहिले. दूरवर अजूनही तो दृष्टीस येत होता.

गुहेच्या दक्षिण बाजूने खाली उतरण्यास सुरुवात केली. वाट अगदी बारीक! डावीकडे खोल दरी तर उजवीकडे मुचकुंदाचे उत्तुंग शिखर! अशा वाटेने काही काळ जाताच काजळी नदीचे खोरे दृष्टीस आले. देवडे, किरवेट, भोवडे अन् कितीतरी गावे खाली पसरलेली दिसत होती. डावीकडे साखरप्यापर्यंत गेलेला डोंगराचा दांड दिसत होता. उभ्या खडकातला एक कडा उतरलो,

पण तो फारसा अवघड गेला नाही. मात्र आमच्यातील एकाच्या एअरबॅगने खांद्यावरून असा काही सुंदर गोता खाल्ला की देखते रहना !

शिडी उतरून डोंगराच्या नाकाडावर आलो. मानवी नाकाला जर अनंत मोठे केले तर ते जसे दिसेल तसेच हेही डोंगराचे नाकाड दोन्ही बाजूंनी खोल दऱ्या आणि अत्यंत तिरकस कोनातील निमुळती वाट. यातच जोराच्या वाऱ्याने झोक जात होता. वाट उतरती तर होतीच, पण घसरडीपण होती. त्यामुळे घाऊकपणे सर्वांनी तिथे आपटी खाल्ली. कोणी गडगडले नाहीत हेच नशीब. पन्हाळ्याहून निघाल्यापासून इतक्या डोंगरदऱ्या पार केल्या, पण सह्याद्रीचा अवघडपणा जास्त जाणवला तो येथेच.

जवळजवळ तीनशे मीटर खाली उतरून मागे न्याहाळून पाहिले. मुचकुंद शिखर अस्मानात भाल्याच्या फाळाप्रमाणे घुसले होते. आम्ही आलो ती वाट कुठून चढत होती कोणास ठाऊक ? कोकणात दूरवर पसरलेल्या रांगा पाहून असे वाटत होते की सिंधु सागराच्या ओढीने जाणाऱ्या आम्हाला सह्यगिरी हात पसरून आशीर्वाद देतोय, " थाबलास का तू, चल पुढे ! चल पुढे ! "

तिरकस डोंगरावरची सर्कस संपवून सरळवाटेने निघालो अन् थोड्याच वेळात वाट जरा उजवीकडे खाली वळली. मुचकुंदाचे शिखर नाहीसे झाले. एकामागून एक कितीतरी दांड मागे पडले. कापूस-कोंड्याची गोष्ट जशी अनंत काळाची आहे तसेच आमचेही डोंगर ओलांडणे चालले होते.

पक्षिगण घरट्याकडे परतू लागले आणि आम्हीही ' भडकंबे ' गावावरून सुजलेले पाय आणि मळलेले कपडे अशा अवस्थेत रखडत यंत्रवत पावले टाकीत साखरप्याच्या एस. टी. स्थानकावर पोहोचलो. मी सहजच, तसेच पुढे रत्नागिरीला चालत जाण्याचा

बेत माडला. ( साखरपे- रत्नागिरी ४८ कि. मी. आहे ) पण पाचजणाच्या संयुक्त घेरावाने माझा बेत विरून गेला. रत्नागिरीची गाडी निघाली आणि मुचकुंद शिखर लुप्त झाले. पण आठवणी— त्या कशा जातील ?

रत्नागिरीत पोचलो तेव्हा रात्र झाली होती. नानासाहेब पंडित वकिलाच्या दारात पाऊल ठेवले त्यांनी खास रत्नागिरी शैलीत केलेल्या स्वागताने तिथेच मुक्काम केला हे पुन्हा सागणे नकोच.

तांबड्या मातीच्या व आंबे—फणसाच्या संमिश्र सुवासात पहाट फुलली. सफरीच्या चौथ्या दिवशी सकाळी रत्नागिरीत फेरफटका मारून दुपारी गणपति—पुळ्याकडे कूच करायचे होते.


सावरकर, टिळकानी वास्तव्य केलेली, हापूस आंब्याने भूष- विलेली कोकणच्या खाणीत अपूर्व तेजाने झळकणारी रत्नागिरी ! थिबा राजवाडा, बंदर, दुर्ग रत्नागिरी, भगवती बंदर व इतर मंदिरे सकाळी न्याहाळली.

पायपिटीची हौस अजून भागली नव्हती त्यामुळे दुपारच्या करकरीत उन्हात पुन्हा सामान पाठीवर चढवले.

साखरतर गावात बसने उतरून होडीने खाडी ओलाडली (आता इथे पूल बाधला आहे.) कासारवेलीच्या भूमीवर पाय ठेवला. होडीचे भाडे होते पैसे दोन फक्त नौकाबाधणीचे काम पाहून कूच केले.

रत्नागिरी ते गणपतिपुळे हे अंतर गाडीरस्त्याने सुमारे ४८ कि. मी आहे. तर सागर किनाऱ्याने ते अवघे १९ कि. मी. पडते. या वाटेने जाण्यात जो काही आनंद आहे तो आगळाच. पुळ्याला जाण्याची जुनी वाट हीच. वाटेत कोकणातल्या पद्धतीप्रमाणे ' पाखाड्या ' बांधलेल्या आहेत.

कासारवेलीची हद्द संपल्यावर दोन रस्ते फुटले. इथेच झाडा-


०
२ किमी
गणपतीपुळे
सिंधुसागर
निवळी
भंडारपुळे
नेवरे
वारे
आरे
काळबादेवी
मिऱ्या
सारवरत्तर
उ.
रत्नागिरी

खाली पाथरदेव आहे. फुलाऐवजी इथे दगडच वाहतात. एक वाट बसणी, सडये, पिरंदवणे, नेवरे या गावावरून पुळ्याकडे जाते. पण हा मार्ग लांबचा व चढाटीने म्हणजे डोंगरातून जाणारा. आम्ही डावीकडची म्हणजे खलाटीची दर्याकिनाऱ्याची वाट धरून काळबादेवी गावात आलो. दर्याभवानीचा मंत्रघोष ऐकू येऊ लागला. वाटेवरच्या सगळ्या वाड्याच्या परसातच सागर उसळी घेतोय. काळ्या पण घट्ट आणि तापलेल्या वाळूतून उजवीकडे चालू लागलो. वाड्या इतक्या जवळ आहेत की भोवारी गाव मागे पडून 'आरे' गावात थडकलो.

इथपर्यंतचा प्रवास किंचित रूक्षच. कारण दर्याभवानीचे दर्शन घडले नव्हते. आरेपाशी पुन्हा तर ओलाडली. आता घाटी लागली. डोंगरातून जाणाऱ्या मार्गास कोकणात घाटी म्हणतात. बेताचा चढ, रुंद फरसबंदी. वाटले, झटकन वर पोहोचू. पण करवंदाची मोहिनी आड आली. वाटेच्या दोहो बाजूंना करवंदाच्या जाळ्याच जाळ्या होत्या. करवंदे चांगली टप्पोरी, काळीभोर अन गोड ! कोकणी माणसाच्या स्वरात याचाच गोडवा भरला आहे की काय न कळे.

घाटी चढलो आणि पाठीमागे दृष्टी फेकली. चार क्षण सगळ्याच्या स्तब्धतेतच गेले. निसर्गाशी शब्दवीण संवाद सुरू झाला. देह भान विसरायला लावणारे ते विलोभनीय दृश्य ! कोकणची भूमी आणि सिंधुसागर दोघेही भव्यच. या दोघांच्या मीलनातून एका विलक्षण सौंदर्याने आकार घेतला होता. खालच्या बाजूस नारळी-पोफळींनी लपेटलेले 'आरे', दूरवर दौडत गेलेला पांढऱ्या शुभ्र रेतीचा पट्टा अन् त्यावर उसळी घेणारा निळाभोर सागर. तासन्-तास स्तब्ध पाहात बसले तरी समाधान व्हायचे नाही. कॅमेऱ्याच्या निर्जीव काचा हे सौंदर्य किती म्हणून टिपणार !

कातळावरून पुढे पाथरदेव टाईप घोडपदेव मार्ग गेला आणि पठार उतरू लागलो. सूर्यनारायण सागराकडे जाऊ लागला होता त्यामुळे डावीकडे समुद्राचे पाणी चमचम करीत होते. त्या धुंद अवस्थेत, त्या बेहोशीत वारे, ढोकमळे गावे मागे पडली. ढोकमळे हे साहित्यसम्राट न. चिं. केळकरांचे गाव. पाच वाजले असतील. नेवरे गावातून एक तर ओलांडून घाटी चढलो. पुन्हा एकवार देखणे दृश्य सामोरे आले. क्षितिजावर एकाच ठिकाणी काही प्रखर प्रकाश निर्माण असा झाला होता की डोळे दिपून गेले. जणू काही सूर्याने आपल्या तेजाचा हंडा क्षितिजाच्या घळीत रिकामा केला होता.

नेवऱ्याची घाटी उतरून पुळणीत वसलेली मुसळपुळे किंवा भाडारपुळे व वीरपुळे ही गावे मागे टाकली. आणखी एक घाटी चढताच गणपतिपुळयाचा गणेश प्रतीकात्मक डोंगर दिसू लागला. रविकिरणे आरक्त होऊन गणेश डोंगरावर तांबड्या फुलांचा अभिषेक करू लागली होती आणि संध्यासमयीची ती गहिरी सृष्टी निरखत पुळणीच्या मैदानातील वाळूत आम्ही आमची पावले उमटवली.

रात्री क्षेत्रोपाध्ये हेरंबराव बापट यांच्याकडे मुक्काम करून प्रात - काळी गजाननाच्या चरणी विनम्र झालो. मराठेशाहीतील अतिरथी, तेजस्वी पतिव्रता, शूर राज्यकर्ते श्रींच्या चरणी लीन झाले आहेत. अण्णाजी दत्तो, चिमाजी अप्पा, नानासाहेब पेशवे, रमाबाईसाहेब पेशवे इथे येऊन गेल्याची इतिहासात नोंद आहे.

मांगल्याने पुनीत होऊन सकाळच्या पुळे-रत्नागिरी गाडीने निघालो. सफरीचा पाचवा दिवस होता. जाकादेवी नाक्यावर जयगड–देवरुख गाडी आणि निवळी फाट्यावरून रत्नागिरी–चिपळूण रस्त्याने ' संगमेश्वर 'ला ११ वाजले. डांबरी रस्त्याने कसबा संगमेश्वर गावात प्रवेश केला. चहूबाजूंनी डोंगरदऱ्यांनी वेढलेल्या या निसर्ग-

रम्य गावात एक देखणे वैभव लपलेले आहे—कर्णेश्वर मंदिर. तिथले शिल्प पाहताच पायपिटीची खंत कुठेच निघून गेली.

कर्णेश्वर मंदिराची बांधणी, त्याचे शिल्प, रचना सगळे कसे डौलदार आहे. मला वाटते सबंध रत्नागिरी विभागात इतक्या उत्कृष्ट शिल्पांनी सजलेले मंदिर नाही. कोल्हापूरच्या अंबाबाई देवळा-सारखेच कोरीव काम अप्रतिम आहे. मंदिर फार प्राचीन. त्याचे शिल्पच त्याची उमर सांगते. चालुक्य राजा कर्ण याने हे बांधले.

या पूर्वाभिमुखी मंदिराला तीन बाजूंनी प्रवेशद्वारे आहेत. प्रवेशद्वारावर घोटीव कोरीवकाम केले आहे. मुख्य प्रवेशद्वाराच्या चार कोपऱ्यात चार खांबांवर शिवपार्वती, गणेश—सरस्वती अशा सुबक मूर्ती आहेत. प्रवेशद्वाराच्या छतातील वर्तुळात दशावतार कोरलेले आहेत सभामंडपाच्या दारावर शेषशायी विष्णू तर मंदिरा-च्या सर्व बाजूंनी नृत्यांगना, किन्नर, गजराज असे समूह शिल्पद्वारे जिवंत केले आहेत. मंदिरात दोन शिलालेखही आहेत.

मुख्य रस्त्यापासून ( मुंबई—गोवे राजमार्ग ) जवळ असूनही हे सुंदर मंदिर उपेक्षित मात्र आहे. शास्त्री पुलाजवळील फाट्यावर या मंदिरासंबंधी फलक लावला तर रसिकजन इकडे वळतील.

कर्णेश्वरापलीकडे नदीच्या पात्रात उन्हाळी, उष्णोदक पण आहेत. इतर अनेक मंदिरे या गावच्या वेशीत आहेत.

ऐतिहासिक दृष्ट्याही संगमेश्वराचे महत्व आहे. इ. स. १६८९ च्या जानेवारीच्या शेवटी छत्रपती संभाजी महाराज रायगडाला जाताना विश्रांतीसाठी संगमेश्वराला सरदेसायाच्या वाड्यात उतरले होते. ( या वाड्याच्या काही खुणाच आता शिल्लक आहेत ) दुर्दैवाने १ फेब्रुवारी १६८९ रोजी औरंगजेबाचा सरदार शेख निजाम उर्फ मुकर्रबखान याने संगमेश्वरावर चढाई केली. मराठी सैन्याचा परा-भव होऊन संभाजीमहाराज नावडी बंदरात कैद झाले. पुण्यानजीक

कर्णेश्वर मंदिर — सगमेश्वर



बद्दल त्यांचा अमानुष वध करण्यात आला. त्या धर्मवीराचे स्मारक म्हणून एक स्तंभ गावकऱ्यांनी उभारला आहे.

धर्मवीर संभाजीमहाराजांचे स्मरण, कर्णेश्वर मंदिराचे शिल्प-सौंदर्य हृदयावर कोरून संगमेश्वराचा निरोप घेतला.

एस. टी. ने चिपळूणला पोचलो तेव्हा काळोख झाला होता. शेतकी अधिकारी श्रीनिवासराव कुर्णे यांच्याकडे पथाऱ्या टाकल्या पाच दिवसांच्या सतत प्रवासाने अंग मोडून निघाले होते. पटापट झोपी गेलो.

सहाव्या दिवशी पहाटेच कूच करून वाशिष्ठी नदी ओलांडून परशुरामाच्या पावनतीर्थी प्रवेश केला. याच डोंगरावरून परशु-रामाने बाण मारून कोकणभूमी निर्मिली अशी कथा आहे. श्रीमंत थोरले बाजीराव व छत्रपती शाहू महाराज यांचे गुरु ब्रह्मेंद्रस्वामी यांनी या क्षेत्राचा जीर्णोद्धार केला. काळ्या दगडातील या मंदिराची तीन शिखरे झाडीमुळे वेगळीच शोभा देतात. गाभाऱ्यातील काळ, काम, परशुराम यांच्या काळ्या पाषाणातील मूर्ती सुंदर आहेत. वाशिष्ठीच्या खोऱ्याचा देखावा पाहून चिपळूणास परतलो ते पुण्याच्या ओढीनेच.

गाडीबरोबर पुण्याकडे धावणारा आमचा प्रवासमार्गही डोळ्या-समोर सरकला. पन्हाळ्याहून निघाल्यापासून ६ दिवस झाले होते. शंभराच्यावर किलोमीटर अंतर पायी चाललो होतो. कितीतरी कडे, डोंगर, घळी, दऱ्या, ओढे ओलांडले होते. अनेक गावचे कडूगोड पाणी तसेच चविष्ट रानमेवा चाखला होता. उन्हातान्हातून दम-दारपणे भटकलो होतो हे सर्व दृष्टिपथाआड होणार होते पण मन चक्षूंसमोर तरळणारही होते.

मला वाटते सह्याद्रीच्या कडेकपाऱ्यात, कोकणच्या तांबड्या मातीत, रानोमाळ पसरलेल्या दगडाच्यात, पन्हाळगड विशाळगड

कर्णेश्वर मंदिर — सगमेश्वर





जाधवगढीतील
लाकडी कलाकुसर

जाधवगढीतील भिंती चित्र



यांसारख्या दुर्गांच्यात, सिंधुसागराच्या अथांग जलात अमृताची गोडी नि:संशय भरली आहे. व ही गोडी ज्याने एकदा चाखली त्याला ती पुन्हा चाखण्याचा मोह नाही झाला तरच नवल ! आणि ही गोडी पुन्हा चाखण्यासाठी त्याची पावले या प्रदेशाकडे पुन्हा पुन्हा वळतील.

टीप – चिपळूणजवळ गोवळकोट आणि गणपतीपुळे इथून जयगड दुर्ग व बंदरही जवळ आहे मात्र भटकंतीतील एक दिवस त्यामुळे वाढेल.

# दिवे घाटातील ऐतिहासिक वास्तू :
# जाधवगढी

अठरावे शतक म्हणजे मराठ्याच्या इतिहासातील वैभवशाली अन् देदीप्यमान असा कालखंड. स्वराज्याच्या रोपट्याची चागली जोपासना करून पहिले बाजीराव पेशवे यानी मराठी सत्ता झपाट्याने महाराष्ट्राबाहेर रोवली आणि मराठी भीमथडी तट्टानी अरबी घोड्यांना बाजूला सारून आपल्या टापानी हिंदुस्थानावरची मुघलाची मगरमिठी सोडविली ती याच कालखंडात. रणधुरंधर पहिले बाजीराव व त्यांच्यासारखेच अनेक रणवीर उदयास आले तेही याच कालखंडात ! शिंदे, होळकर, पवार, भोसले अन कितीतरी ! यातच एक मोठे पराक्रमी, शूर आणि आणि जिकडे तिकडे दरारा निर्माण करणारे सरदार होते-पिलाजीराव जाधवराव.

वाघोलीचा हा वाघ आपल्या पराक्रमाने शाहू छत्रपतींच्या नजरेत भरला नि दिवे गावाजवळील मोठ्या जमिनीच्या इमानाचा मानकरी झाला. वाघोलीच्या कुशीतील ' पिलाजी ' दिवे घाटातील माळरानावर आपली ' गुहा ' बनवून ' राव ' बनले ! वाडी बसविली गेली. आणि सरदार पिलाजीरावाच्या कल्पनेतून इ. १७०७ ते १७१२ च्या दरम्यान एका भव्य नि बळकट वास्तूने आकार

घेतला. तीच ही जाधवांची गढी !

पुणे–सासवड रस्त्यावरील दिवे घाटाची सुंदर वळणे घेत एस. टी सासवडकडे धावू लागते, अन गाडीतील प्रत्येकाची नजर ही गढी वेधून घेते. तिबेटमधील 'पोटाला पॅलेस' सारखी भासणारी जाधवाची गढी दिसू लागताच एकदम मनात येते की पाहावे जाऊन गढी म्हणजे काय प्रकार आहे तो ! अनेकजण तसेच पुढे सासवड – पुरंदरला फक्त जातात आणि इतक्या जवळ असलेल्या सुंदर गढीकडे फिरकतच नाहीत.

जाधववाडी स्टॉपपासून पुणे-सासवड रस्ता सोडून एका चागल्या गाडीरस्त्याने गढीच्या दिशेस जाताच, आजूबाजूची शिवारे नुसती फुललेली दिसतात. ही सर्व जागा पिलाजीरावाना प्रथम घोडे चारावयास मिळाली होती ट्रॅक्टर वगैरे साधनानी चाललेली यंत्रसज्ज शेती पाहून बरे वाटते. शेत संपल्यावर पुढे गढीजवळ येताच तिच्या तटाची भव्यता मन थरारून सोडते.

खरे म्हणजे गढी दिसते एखाद्या भुईकोट किल्ल्यासारखी, पण भुईकोट किल्ला आणि गढी यात बराच फरक आहे.

भुईकोट किल्ला म्हणजे एखाद्या सपाट प्रदेशातील सर्वांत महत्त्वाचे लष्करी ठाणे. लष्करी दृष्ट्या तो भक्कमात भक्कम केलेला असतो त्या दृष्टीने त्यातील निवासस्थाने ही केवळ लष्करी शिपायाची घरटी असतात, सुखसोयीचा भाग त्यात कमी असतो. याउलट गढी म्हणजे राहण्याचा वाडा ! यास सरक्षणासाठी बाजूने तट उभारलेले असतात. यामुळे गढी ही ज्या त्या सरदाराच्या श्रीमंतीनुसार सुखसोयींनी युक्त पण संरक्षित अशी उभारलेली असते

जाधवरावाची गढी मुख्यत. राहण्यासाठी बाधलेली असली तरी ती अतिशय मोक्याच्या जागी आहे. व येथून दिवेघाट नजरेच्या

टप्प्यात असल्यामुळे त्याची नाकेबंदी येथून करणे सहज शक्य होत असे. येथून मल्हारगड, पुरंदर हे किल्ले जवळ आहेत. याच गोष्टीचा फायदा हिंगणगावच्या दमाजी थोरातानी ही गढी बळकावून पुरंदरची मोर्चेबंदी करण्यासाठी घेतला. त्यानी पुरंदर ते पुणे हा सर्व प्रदेश मारून काढलाच, इतकेच नव्हे तर बाळाजी विश्वनाथास सुप्याकडे जात असताना पकडले होते.

आणि म्हणूनच पुढे छत्रपती शाहू महाराजानी याचा उल्लेख पुण्यास पेशवे शनवारवाडा बांधत असताना त्याना विरोध करण्यासाठी दरबारात असा केला.

" पूर्वी पिलाजी जाधव वाडा बांधीत होते, तेव्हा आम्ही मनाई करीत होतो. परंतु राजश्री चंद्रसेन जाधवराव थोराताची पाठ राखीत. यामुळे वाडीस कोट जाला. ( म्हणजे जाधवगढी ) शेवटी राजश्री बाळाजीपंत वरिले तेव्हा तीच वाडी पुरंदरास मोर्चा जाहला व मुलुख हैराण जाहला. आम्ही सांगत होतो ते न ऐकिले. शेवटी त्याच गोष्टीस आले तसेच हेहि कर्म आहे."

दरेवाडी, तासगाव, सांगली, कऱ्हाड येथेही अशाच प्रकारच्या गढ्या आहेत. पण जाधवरावाची गढी ही सर्वांत जास्त बळकट आणि सामर्थ्यशाली आहे, याची साक्ष आपल्याला तिच्या भव्य दरवाज्यात पाऊल टाकताच पटते. सुमारे २२५′–२००′ अशा काटकोनाकृती असलेल्या या गढीला बाहेरची एक व आतील एक अशा दोन तटबंद्या आहेत. अशी रचना दुसऱ्या कोणत्याच गढीला नाही. ७०′ ते ८०′ उंचीचे भक्कम तट आणि त्यातील ठिकठिकाणी, बंदुकांचा मारा करण्यासाठी असलेल्या जंग्या पाहून एका शक्तीचे, आव्हानाचे, सामर्थ्याचे आणि मराठ्याच्या विजीगिषू वृत्तीचे दर्शन आपल्याला घडते.

गढीचा मुख्य दरवाजा पुण्याच्या शनिवारवाड्याप्रमाणे नगार-

खान्याने सुशोभित झाला आहे. दरवाज्यातून आत पाऊल टाकताच तिथल्या वातावरणामुळे आपण एकदम इतिहास--काळात जातो. दोन्ही बाजूंना दोन अशा पहारेकऱ्यांसाठी देवड्या येथे आहेत. दरवाज्याला एक जुन्या पद्धतीचे कुलूप आहे.

दरवाज्यातून आत जाऊन डावीकडे वळून पायऱ्या चढल्या की सुरेख अंगण लागते. समोरच्च तटाला लागून दक्षिणोत्तर दिशेत अनेक मोठमोठ्या खोल्या आढळतात. याच्यावरही अशा अनेक खोल्या आहेत. खोल्यांच्या तुळ्यांना लाकडावर सुरेख नक्षीकाम केलेले आधार दिलेले आहेत. त्यावर दोन कमळे व इतर पान-फुलांची नक्षी आढळते.

उजवीकडे दुसरा दरवाजा लागतो. आणि त्यानंतर पायऱ्या चढून जाताच पूर्वाभिमुख असलेल्या तिसऱ्या दरवाज्यात आपले पाऊल पडते.

हवेली खरोखरच अतिशय देखणी आहे. या तीन मजल्याची भव्यता आणि बांधणी आकर्षून घेते, यात वादच नाही. दरवाज्या-तून आत जाताच एक उघडा चौक लागतो या भागात हवेलीचा एक मोठा भाग होता. पण दुर्दैवाने भाऊबंदकीच्या भांडणात त्याची राख होऊन गेली. या चौकाच्या चारी कोपऱ्यात एकएक टाके आहे. यात पावसाचे पाणी साठते. एक वृंदावनही आपले लक्ष वेधून घेते.

भिंतीतल्या जिन्याने वरती गेल्यावर दोनतीन दालने लागतात. यातील भिंतीतून असणारे कोनाडे विशिष्ट प्रकारचे असून त्यात सुरेख आकृत्या चितारल्या आहेत. तसेच श्रीराम, श्रीकृष्ण इ. देवादिकांची चित्रे व इतर चित्रे चितारलेली आढळतात.

यावरच्या मजल्यावरची दालने म्हणजे अस्मानी महालच म्हटले पाहिजेत. भिंतीवरील हिरव्या रंगातील फुलाफुलांची सुंदर नक्षी

आणि दोन दालनामधील भिंतीत बसविलेली मोर कोरून काढलेली लाकडी जाळी प्रेक्षणीय आहे. याच दालनात एक कारंजे पण बसविले आहे. इतक्या उंचीवरच्या दालनात कारंजे करण्याची कल्पना मोठी नामी आहे. शिवछत्रपतींनी रायगडावरील आपल्या राजप्रासादातील मनोऱ्यातून कारंज्याची अशीच योजना केलेली दिसते. पण त्याचा उत्कृष्ट नमुना म्हणजे हा जाधवगढीतील होय. इथे दालनाच्या छताशी एक टाकी तयार केलेली आहे. त्यातून नळी काढून ती भिंतीतून नेऊन कारंज्यास जोडलेली आहे. अशा रीतीने वक्रनलिकेच्या तत्वावर उडणारे हे कारंजे, गवाक्षातून येणारा आल्हाददायक वारा, बाहेर दिसणारे आसमंताचे सुरेख दृश्य. सायंकाळचा वेळ रम्यपणे घालविण्यास आणखी काय पाहिजे ? दालनाला जोडूनच असलेल्या सज्जातून बाहेरचे दृश्य तर आल्हाद देतेच पण भिंतीवरील अप्रतिम व नावीन्यपूर्ण रंगीत नक्षी बघुनही मन प्रसन्न होते. या दालनाच्या शेजारच्या खोलीत एक पाण्याचे टाके आहे. पावसाच्या पाण्याला चुन्यातील नळावाटे यात वाट करून दिली असे सांगतात. पण पाण्याची ही योजना अभ्यास करण्याजोगी आहे खरी !

यानंतर दादऱ्याने म्हणजे भिंतीतल्या जिन्याने वरती गच्चीत जाताच चौफेर प्रदेश दिसतो. ही गढीतील सर्वांत उंच जागा. अशा रीतीने चारपाच मजले चढून येथे येईपर्यंत गढीच्या वास्तू शिल्पीने पहिल्या दरवाज्यापासून एका पाठोपाठ एक अनेक संरक्षक फळ्या उभ्या करून गढी लष्करी दृष्ट्या बळकट केली आहे. त्यामुळे इथे येईपर्यंत आपण चक्रावून जातो.

पूर्वेकडे दिसणारा मल्हारगड, आग्नेयेस जेजुरी, साधारण दक्षिणेस पुरंदर, वज्रगड, उत्तरेकडे दिसणारी दिवेघाटाची रांग पाहून गढीच्या मोक्याच्या जागेची यथार्थ कल्पना येते. बाजूचे हिरवेगार

शेत आणि कऱ्हेपठारावरचा भन्नाट वारा आपल्याला काही वेगळाच आनंद देतो.

गढी पाहण्यास जाणाऱ्यानी देवघर तर अवश्य पाहिलेच पाहिजे. विष्णू, अंबिकादेवी, याच्या गारेच्या मूर्ती व इतर अनेक मूर्ती येथे आहेत. या मूर्तीची घडण उत्तर हिंदुस्थानी पद्धतीची आहे. सरदार पिलाजीराव उत्तरेस वारवार जात असत. तेव्हा परत येतेवेळी अंबिकेची सुबक मूर्ती त्याच्या नजरेस पडली. आणि त्यानी तात्काळ त्या मूर्तीच्या भारंभार सोने मूर्तिकारास देऊन तिला इकडे आणली, आणि अंबिकादेवी जाधवरावाच्या देवघरात विराजमान झाली. असे सागतात. माळशिरस जवळील ' आमळे ' गावचे सरदार खंडेराव दरेकर याना तर निरनिराळ्या मूर्ती आणण्याची विलक्षण आवड होती. उत्तरेतून त्यानी बऱ्याच मूर्ती इकडे आणल्या. दरेकर आणि जाधवराव हे तर एकमेकाचे अतिशय जवळचे आणि त्यामुळेच दरेकरानी विष्णु-मूर्ती जाधवरावाना अर्पण करून त्याच्या देवघरात ती स्थापिली असावी. देवघरातच काही जुने ताम्रपट, शिक्के, जुनी शस्त्रे व पोथ्या ठेवलेल्या आहेत.

सरदार पिलाजीराव हे पाडुरगाचे भक्त होते. हे त्याच्या शिक्क्या-वरून दिसते. त्याचा शिक्का असा.

श्री. पाडुरग चरणी

दृढभाव । चागोजीसुत

पिलाजी जाधवराव


पंढरीच्या पंढरीरायाबरोबरच त्याची समशेरीवरही फार भक्ती होती असे दिसते. बाळाजी विश्वनाथ, तसेच पहिले बाजीराव याच्याबरोबरीने अनेक लढायात त्यानी तलवार गाजविली. त्रिंबकराव दाभाडे, दामाजी थोरात इत्यादींचा त्यांनी बीमोड केलाच, पण १७२९ मध्ये उत्तर हिंदुस्थानात महमदखान बगषा यांच्याशी

झालेल्या लढाईत त्यांनी खूप पराक्रम गाजविला. जाधवराव झाले ते यावेळेस. 'राव' हा किताब त्याना मिळाला. सन १७६० मध्ये निधन झाल्यानंतर 'वाघोली'स त्याची समाधी बांधली गेली.

असे हे पिलाजीराव, देवघरातील मूर्ती आणि गढीच्या रूपाने चिरंजीव झाले आहेत.

गढीच्या मागील बाजूस एक गणेशमंदिर व मोठे तळे आहे. गणेश मंदिराचे खांब यादवकालीन धाटणीचे आहेत. गढीच्या पुढील बाजूस एक विठ्ठलमंदिर आहे, यातच एक चोवीस हाताची गारेची महिषासूरमर्दिनीची मूर्ती आहे. हिचे शिल्प आणि भाव सुरेख आहेत. ही मूर्तिही दरेकरानीच दिली असावी. गढीच्या पूर्व बाजूस व तटाबाहेर एक विहीर आहे. जाधवरावाच्या घरातून या विहिरीत एक भुयारी मार्ग आहे.

टीप– सांप्रत ही गढी रजनीश आश्रमाच्या ताब्यात आहे. गढी पाहण्यासाठी त्याची पूर्वपरवानगी आवश्यक आहे. गढीतील देव-घर श्री. जाधवराव यांचे घरीच आता पाहण्यास मिळेल.



रोहिडा शिखले बुरुज

शिवनेरी शिवाई देवी




# एका मेघाळलेल्या दिनी मुऱ्हा रायरेश्वर

— पुण्यनगरीच्या नैऋत्येस असणारे नीरथडीचे ' भोर ' अन् त्याहीपलीकडचे रोहिड खोरे तसे इतिहासप्रसिद्धच ! उन्हाळ्यात काहीसा रूक्ष भासणारा हा प्रदेश, इथल्या डोंगरमाळा पर्जन्याचे आगमन झाले की पालवतात, शेताशेतातून भाताची डवरलेली रोपे अन् तिळाची पिवळी फुले हिरव्या, पोपटी पार्श्वभूमीवर चमकून दिसतात आणि मग एखादा मेघाळलेला दिवस उगवतो, पावसाचे थैमान अन् रौद्र निसर्गाचे दर्शन घडवतच. त्यातच मुऱ्हा रायरेश्वराचे पठार म्हणजे मेघराजांचे लाडके खेळगडीच !

— सह्याद्रीचा पहाड चढून मेघ ह्या रायरेश्वर पठारावर येतात आणि शंभू-महादेवाचे अवाढव्य पठार पाहून उन्मादाने धावू लागतात, खदखदा हसतात ! तांडवनृत्य करतात ! बेभान वारे त्यांच्या बेछूटपणाला साथ देतात अन् मग बरसणारे मेघ सारे रायरेश्वर धुंद करून टाकतात. कड्यावरून जलप्रपात कोसळतात, अन् सगळे वातावरण कसे भीतिदायक बनून जाते.

— अशाच वेळी एखादी छानशी सुट्टी येते अन् आमची पावले रपरप वाजत भोरमधून निघतात. तब्बल २४ मानव ! तिघे




पुण्याचे तर शेष मुंबईनगरीचे! मुंबई 'गिरिविहार'च्या नेतृत्वाखाली 'रायरेश्वर' न्याहाळायला!

— भोरपासून १९ कि. मी. अंतरावरील आंबवड्यात उतर-ल्यावर कसे प्रसन्न वाटले. खळाळून वाहणारा फेनधवल ओढा, त्यावरचा तो झुलता पूल आणि पलीकडे झाडीतून डोकावणारे नागेश्वर मंदिर! जोत्यावर हत्ती अन् कमळे तर स्तभास्तभावरून नागाचे सुरेख शिल्प जडावले आहे. मंदिरासमोर पंचगंगा कुंड आहे – यात्रिकाना पुरेपूर समाधान देणारे!

— आंबवड्यास पंतसचिव शंकराजी नारायण यांची समाधी आहे. तर कान्होजी जेधे याचे कारी गाव अन् समाधीही येथून जवळच आहे.

हुडहुडी भरवणाऱ्या गारठ्यात चहाचे कप फस्त करून आम्ही

रायरेश्वराच्या वाटेला लागलो. पाऊस उघडला होता. शेतें पाण्याने गच्च भरली होती रस्त्यावर ओढे आडवे येत होते. आमचे बूट त्यात विसळले जात होते, पण पुढच्याच पावलाला परत चिखलाचा साज चढत होता. पर्वतरांगावरून धुके टक्करा देत होते.

—वडतूवी गाव मागे गेले आणि आमची नजर डोंगररांगातल्या हिरव्या खिंडीवरून, गवतावरून अन् रस्त्यावरच्या गुडघाभर चिखला-वरून भिरभिरत स्थिरावली नी 'कोरले' गावावर - रायरेश्वराचा पूर्व पायथा.

— समोरचाच केळंजगड धुक्याच्या पडद्यातून डोकावतोय न डोकावतोय तोच अचानक नजर धूसर झाली. पाऊस वेड्यासारखा कोसळू लागला. अन् आम्ही नखशिखात भिजलो.

— कोरलच्या देवालयाशेजारूनच भरपावसात रायरेश्वराची चढण सुरू केली.

रायरेश्वराचा माथा गाठायचा म्हणजे सहा प्रमुख वाटा. उत्तर बाजूने वाघासारखी पावले टाकीत चढतात तो 'वाघदरा' धान-वली या गावचा. रायरी गावचा 'साबरदरा' लांब पावले टाकीत चपळाईने चढावा लागतो. कारीचा 'लोहदरा' कान्होजी जेध्याच्या पोलादी मनाची आठवण करून देतो. ईशान्येचा वडतुंबीचा 'गणेशदरा' गणेश मूर्तीजवळ नतमस्तक करणारा. तर दक्षिण दिशेचा 'सूण अथवा श्वानदरा, एखाद्या डाण्याकुत्र्यासारखा गरगरा डोळे फिरवणाऱ्या दरीतून चढावा लागतो. पूर्वीचा 'गायदरा' मात्र गायीसारखा शांत अन् धिमा—सर्वांना उपयुक्त.

—याच गायदऱ्याने आमची तुकडी चढू लागली. पावसाच्या हैराण करणाऱ्या माऱ्यातून पायतळीची वाट सटकत होती. सोंडा ओलांडत अन् चढत एका झाडाशी विसावा घेतला.

—केंजळगड अन् रायरेश्वर जोडणारी डोंगररांग धुक्यात लपे-

टली होती. कोरलची कौलारू घरे दूर कुठेतरी कोपऱ्यात दिसत होती. सर्वच पसरलेले नाजूक सायीसारखे हिवाळं गवत, तुरळक झाडीतून वाहणारे ओढे ! प्रमाणबद्ध बांधामुळे दिसणाऱ्या तपकिरी रेषा ! वा ! गारठवणाऱ्या थंडीतही मनाला ऊब मिळाली आणि मग पुढची चढण काही जाणवलीच नाही. एका मस्त धबधब्या-खालून ओढा पार केला आणि माथा गाठला

—कपड्यानी पाणी साठवण्याचा उच्चांक गाठला होता. थंडी-वर जोरदार वारा मीठ चोळत होता. अन् मग ती जीवघेणी पठारी वाटचाल सुरू झाली. बेभान वारा अन् पाऊस यातून जवळजवळ चार कि. मी. ची पठारी वाटचाल संपून आम्ही रायरेश्वर मंदिरात पोचलो. आंबवड्यापासून तब्बल पाच तासाची वाटचाल संपली होती.

—सॅक्स मोकळ्या केल्या. ओले कपडे काढून वाळत टाकले. ( वाळणे शक्यच नव्हते म्हणा ) कॉफीचे गरम घोट घशात ओत-ताच हुशारी आली. सहज मनगटावर नजर गेली, काळाचे भान ठेवण्यासाठी ! काळ पुढे गेला होता पण घड्याळ बिचारे गारठून गेले होते

—धुनीतील तांबड्या ज्वालाचा प्रकाश मंदिरात पसरला आणि गायनाचे गोड स्वर आसमंत धुंद करू लागले. मल्हार, नंद, भूप, भैरवी रागाचे निनाद भारून टाकू लागले अन् जणू त्याला साथ देण्यासाठीच निसर्गही जास्तच बरसू लागला.

—जलसंगीत अन् रागसंगीताचे स्वर हृदयाला भिडत होते. अंत.चक्षूसमोर दिसू लागले ते तीनशे वर्षांपूर्वीचे मंदिर !

—अशीच ती रात्र! किर्र झाडीतून रानकिड्याचा आवाज घुमत असेल! मंदिरच्या गर्भगृहातील ती गंभीर शांतता ! समईचा शांत प्रकाश महादेवाच्या पिंडीवर पडलेला आहे कोंडाळे करून उभी

असलेली ती कोवळी पण दाणगट पोरे–उत्सुकतेने बघणारी! त्यातूनच डोकावणारे ते एकदोघे करारी अन् काटक वृद्ध! आणि मग ..त्या तेजस्वी तरुणाची काळजाला हात घालणारी शब्दस्फुल्लिंगे –'हे हिंदवी राज्य होणे हे तो श्रीची इच्छा! आम्हाला या शंभू–महादेवाची आण. तो आम्हास यश देईल!' डोळ्याची पापणी लवायच्या आत समशेरीने त्याच्या बोटाचा छेद घेतला आणि करारी मुद्रेने रक्ताचा अभिषेक तो डोळ्यात साठवू लागला. कोण होता हा तरुण! शिवाजी! हो! राजश्री शिवाजी राजे भोसले!

—वरील प्रसंगाबाबत नेहमी प्रमाणेच इतिहास मात्र अजून चाचपडतोय! केवळ शके १५६७ वै. शु. १ चे पत्रच काय तो अधुकसा किरण!


श्री

राजश्री दादाजी नरसप्रभु देशपांडे व कुळकर्णी त॥ रोहिर खोरे वेलवंड खोरे यासी प्रती शिवाजी राजे सु॥खमस अर्बैन अलफ ...श्री रोहिरेश्वर तुमचे खोरियातील आदिकुलदेव तुमचा डोंगरमाथा पठारावर शेंद्रिलगत स्वयंभू आहे. त्याणी आम्हास यश दिल्हे व पुढे तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे.. राजश्री दादापंताचे विद्यमाने बावाचे व तुमचे व आमचे श्रीपासी इमान जाले ते कायम वज्रप्राय आहे...हे राज्य व्हावे हे श्रीचे मनात फार आहे ...२॥ छ २९ सफर बहुत काय लिहिणे (मोहर).


—परंतु हे नक्कल पत्र. शिवाय 'स्वराज्य' हा शब्दप्रयोगही मूळचा वाटत नाही. अन् यामुळेच अस्सल पुराव्या अभावी, शपथ घेतल्याबद्दल इतिहासकार ठाम मत व्यक्त करीत.

—कदाचित शपथ प्रसंग घडलाच असेल तर तो रायरेश्वरलाच. कारण 'रोहिडेश्वर' असे स्थान या भागात कुठेही नाही.

—रायरेश्वरच्या देवस्थानची व जंगमाची व्यवस्था मात्र शिवाजी



आबवडे – कारी
नागेश्वर मंदिर



होळकर गढिचे
प्रवेशद्वार

# होळकरांची गढी

इतिहासकालीन मराठी वास्तुशिल्पींना ऐटबाज दिखाऊ वास्तू बांधण्याचे फारसे ज्ञान दिसत नाही. पण भक्कम प्रशस्त वास्तू त्याही तत्कालीन लढायांना तोंड देऊ शकतील अशा बांधण्याचे तंत्र मराठ्यांना चांगलेच अवगत होते. अशीच एक भक्कम वास्तू पुणे जिल्ह्यात वाफगावला आहे—होळकर वाडा.

वाड्यापेक्षा त्याला गढी म्हणणेच उत्तम. नैसर्गिक परिस्थितीचा योग्य उपयोग करून ही बांधलेली आहे. वेळ नदी व एक ओढा यांच्या संगमावर ही असल्यामुळे दोन्ही बाजूच्या पात्रांचा खंदका-सारखा उपयोग झाला आहे. गढीचे प्रवेशद्वार नेहमीप्रमाणे उत्तरे-कडे तोंड करून आहे. ते भव्य तर आहेच शिवाय अजूनही उत्तम स्थितीत आहे. दारावर लोखंडी खिळे आहेत. वर नगारखाना मात्र नाही.

गढीच्या चार कोपऱ्यात चार बुरुज आहेत. त्यांपैकी एका बुरुजावर पूर्वी शत्रूचा समाचार घेण्यासाठी सज्ज असलेल्या तोफा आजमितीस मात्र जमिनीत तोंड खुपसून पडल्या आहेत. आणखीही काही पंचधातूच्या तोफा इथे होत्या. पण त्या आता अन्यत्र नेल्या आहेत असे सांगतात.

प्रवेशद्वारातून आत नेले की बाह्य तटबंदीच्या संरक्षणात उभार-

लेले दोन प्रचंड वाडे डोळ्यासमोर येतात.

त्यातला पहिला वाडा पूर्वेस तोंड करून आहे. जिथे आता रयत शिक्षणसंस्थेचे यशवंतराव होळकर विद्यालय आहे. ह्या वाड्या-लाही बाहेरून तट आहे. प्रथम मोठा चौक अन् त्यामागे वाडा. वाड्याचा तळ मजला उत्तम लाकडी कमानदार स्तंभांनी सुशोभित आहे. अर्थात विशिष्ट पेशवेकालीन दिवाणखान्यासारखा !

पहिल्या मजल्यावरचे छत सुरेख नक्षीने शोभित आहे. त्या-वरती माथ्यावर चुनेगच्ची इथून गढी संपूर्ण नजरेत येतेच शिवाय बाहेर असलेले वाफगावही. वाड्यातच गरूडवाहन असलेली संगम-रवरी विष्णू मूर्ती आहे. वाड्याच्या भिंतीवर गणपती शिव अशी चित्रे रंगवलेली आहेत, पण आता त्यांचे रंग फिकट झाले आहेत. अंतर्भागातील चित्रे व नक्षी मात्र आता दिसत नाही.

ह्या वाड्याखेरीज दुसरा वाडा अधिक भव्य आहे. हत्ती-अंबारीसह जाईल असे उंच दार त्याला आहे. दुर्दैवाने आतला वाडा मात्र पडला आहे, तरीही एका भिंतीवरील चुन्यात कोरलेले शिल्प लक्ष वेधतेच.

एवढ्या मोठ्या वाड्याला पाण्याची सोय हवीच व ती केली आहे. ईशान्य बुरुजाच्या माथ्यावरून डोकावले तर डोळेच फिरतील अशी खोल एक विहीर आहे बुरुजातूनच दादऱ्याने तिथे उतरता येते. याला खरी वाट प्रवेशद्वारापासून संपूर्णपणे तटबंदीतून होती. ती आता बुजलेली आहे. याशिवाय वाड्यात एक बांधीव विहीर आहे.

पाण्याच्या व्यवस्थेबरोबर परमेश्वरी अधिष्ठानही वाड्यात आहे. कचेरीसमोरच विष्णू मंदिर आहे. मूर्ती गंडकीशिळेची. नास्तिकासही भक्तीचा उमाळा यावा असे ते ध्यान आहे. होळकरांच्या तलवारी-पुढे मान लववणाऱ्या एका रजपूत राजाने ही मूर्ती त्यांना भेट

दिली म्हणून सांगतात. काळ्या रंगातही मूर्तिकाराने अतोनात सौंदर्य ओतले आहे. याखेरीज पितळेच्याही सुबक मूर्ती पाहण्यास मिळतात.

गढीच्या पश्चिमेला आणखी एक तटबंदी घातलेली आहे. तिथे घोडेपागा होती असे म्हणतात. याशिवाय गावच्या ईशान्येकडील टेकडीवरही पागा होती, जिथे साप्रत एक बांधीव लहान तलाव आहे. या स्थानावरून गढी व तिचा परिसर उत्तम दिसतो.


पुणे–नाशिक मार्गावरील राजगुरुनगरपासून ८ कि. मी. अंतरावर ही गढी असल्याने पर्यटकांना इथपर्यंत जाणे फारसे अवघड जाऊ नये आणि वाफगावात शिरताच गाववेशीचा थोरला दरवाजा आपल्या अंगावरचे हत्ती शिल्प पुढे लेवून होळकरांच्या गढीकडे खेचून नेतोच नेतो.

# हौशी प्रवाशांचे आनंदवन होऊ शकणारा माळशेज घाटानजीकचा हरिश्चंद्रगड

'दुरून डोंगर साजरे' अशी एक म्हण आहे खरी! पण दूर अंतरावरून दिसणाऱ्या पर्वत शिखरावर आरोहण केले आणि गर्द दऱ्यातील वाटा अन् खिंडींतून भटकती केली की डोंगराची जवळी-कही तितकीच सुखदायी असते हे पटते. याचा प्रत्यक्ष अनुभव ज्यांनी घेतला त्यांना तर हे मनोमन जाणवले असेलच आणि अशा डोंगरदऱ्याशी एखाद्या प्राचीन मानवाचे नाते जडले असेल, त्याच्या कर्तृत्वाने तिथे इतिहास घडला असेल तर अशी जवळीक म्हणजे अमृतयोगच!

असाच एक सुरेख पर्वत आहे. नगर, पुणे आणि ठाणे या जिल्हा – त्र्यांच्या सीमेवर, माळशेज घाटानजिक! याचे नाव हरिश्चंद्रगड! चांगदेवासारख्या महान योग्याच्या स्मृतीची साक्ष येथील लहानमोठ्या गुहा देत आहेत. अनेक नाथपंथीय योगी हरिश्चंद्रेश्वराला साकडे घालतात. 'कोकणकडा' नामक एक प्रचंड शैलकडा तिथे असून येथूनच मंगळगंगा ही पवित्र नदी वाहते.

प्रताप मुझुमदार या सोबत्यासह एके सकाळी मी हरिश्चंद्र-




गडाची मोहीम काढली. पुणे-जुन्नर गाडी जुन्नरमध्ये शिरली आणि लगोलग आमच्या लक्ष्याकडे मोर्चा वळविण्यासाठी ' मढ ' गावच्या ९-१५ च्या गाडीत जागा मिळविणे आम्हाला क्रमप्राप्त झाले.

कुकडी नदी ओलांडली. शिवनेरी दुर्ग व लेण्याद्रीही मागे गेला आणि ' बनकर फाटा ' आला. मढला जाण्यासाठी सुमारे २५ कि. मी. च धाव घ्यावी लागते. त्यापैकी अर्ध्या अंतरावर भेटतो तो

हा ' बनकर फाटा ! ' इथून नगर-मुंबई या नवीन राजमार्गावरून माळशेज घाटाअलीकडच्या ' मढ ' या बाजारपेठी आम्ही दाखल झालो.

हरिश्चंद्रगडाला जाण्यासाठी चारपाच वाटा आहेत खिरेश्वर, बेलपाडा, पाचनई लव्हाळी, कोथळे या गावाच्या पासून सुरू होतात. हरिश्चंद्रगड ज्या पर्वतरांगेत आहे ती रांग नगर जिल्ह्यातील सर्वांत दक्षिणेकडील आणि सर्वांत मोठी आहे. म्हणजे सुमारे १९० किलोमीटर थेट बालाघाटपर्यंत धावणारी !

मढ गाव म्हणजे शिंदीच्या झाडाची वसाहतच म्हणा ना ! अन् याच झाडीतून आम्ही पाठीवर लष्करी पिशव्या चढविल्या व खिरेश्वरकडे मोर्चा वळविला सहज समोरच्या पर्वतरांगेकडे नजर टाकली आणि झाडींने झाकलेली खिंड दृष्टीस आली.

## खिरेश्वराच्या वेशीत

खिरेश्वराला जायचा जीप रस्ता लावून खुबी गावावरून जातो खुबी गाव ओतूर-मढ-माळसेज घाट-कल्याण या मार्गावर आहे. गाडीने खुबीला उतरणे श्रेयस्कर. कोल्हेवाडीकडची नजिकची वाट धरली. तारामती अन् हरिश्चंद्र ही शिखरे न्याहाळत खिरेश्वरच्या वेशीत पावले टेवली ती अवघ्या दोन तासात. महादेव अन् ठाकर लोकाची प्रामुख्याने वस्ती असलेल्या खिरेश्वरात नागेश्वराचे जुने देऊळ उठून दिसते. गाभाऱ्याच्या छतावरील शिल्प अन् दारावरील शेषशायी विष्णूचे शिल्प पाहून कौतुक दाटते.

मंदिर व गुहा पाहून वाडीत प्रवेश केला. चार पोरेटोरे आणि काही बापये गडी गोळा झाले. इकडच्या तिकडच्या गप्पा करताना वरती दाट जंगल असल्याचे कळले पण काही सैनिक मंडळी पुढे गेल्याचे कळले व मनाला धीर आला.

वाटाड्याचा विडा सोमाजी भवारले या किरकोळ पण काटक देहाने उचलला.

खिरेश्वरहून गड सुरु करण्यासाठी दोन मार्ग आहेत. एक टोलार खिंडीतून छान रुळलेला ! आणि दुसरा गावच्या पश्चिमेकडील दाडापलीकडच्या चहाळातून जाणारा ! ही वाट सोपी नाही. नळीसारखी एका वळीतून चढणारी. 'राजमार्ग' म्हणतात याला ! गडावर जाण्याचा जुना मार्ग हाच. याच्या पायथ्याला राजघर म्हणून एक घरटे व वरती जुन्नर दरवाज्याचे अवशेष आहेत.

प्रताप मुझुमदाराला डोंगर नवखे ! तेव्हा राजमार्ग सोडून टोलार-खिंडीची चढणच आम्ही चढू लागलो. डाव्या बाजूने गडाचा कडा आमच्याकडे आ वासून पाहत होता. तप्त उन्हाने दाह होत असलेल्या आमच्यावर थोड्याच वेळात गर्द झाडीतून शीतल सावली आली. कड्याच्या कमरेवर मेखलेसारखी शोभणारी एक निसटती वाट पार केली आणि गर्द झाडीने व्यापलेल्या टोलार खिंडीत प्रवेश केला तेव्हा तीन वाजले असावेत.

शहरी संस्कृती विसरून खुशाल लोळण घेतली. सभोवारहून येणाऱ्या वाऱ्याच्या झुळका मनाला सुखावत होत्या. दोन्ही बाजूच्या उंच दरडीतून मुळा नदीचे खोरे अन् दऱ्या यांचे दृश्य प्रसन्नता आणीत होते.

टोलार खिंडीत एका दगडावर वाघाचे चित्र कोरलेले आहे. जणू रात्रीचे त्याचे आगमनच शिल्पकाराने सूचित केले आहे. या व्याघ्र-राजाजवळून मुळा खोऱ्याची वाट सोडून डाव्या बाजूस वळलो आणि आम्ही गडाच्या छाताडालाच भिडलो. वर पाहताच शिरस्त्राण गळून पडले. उंच कडा आमच्याकडे पाहात होता. प्रतापने सोमा-

जीस विचारले, " आता ही वाट कोनची ? " ' ह्यो काय, ह्या कड्यानन तर वर जायाच! " सोमाजीच्या या तत्पर उत्तराने प्रतापच्या कपाळावर धर्मबिंदु जमा झाले. कडा फारसा अवघड नाही. पण पाठीवर बोजा असताना खडकातल्या पायठण्यात पाऊल ठेवण्यासाठी कसबच पाहिजे. नाही तर पुढे.

कडा दहा-वीस मीटर असेल नसेल पण चढल्यावर हायसे वाटले. दुर्गाची तटबंदी सामोरी आली, पण तोरण काही दिसेना ' एकदाचे माचीवर आलो. अवाढव्य दुर्गमाथ्यावरून आमचे डोळे भिरभिरत होते. पण हरिश्चंद्रेश्वर यात नेमके कुठे आहे, याचा शोध घेणे कठीणच होते ! या ईश्वरापाशी जायलाहि दोन मार्ग ! एक उजव्या अंगाने पण लांबून दाडादाडांना वळसे घालत जाणारी तर दुसरी जवळची. पण पूर्व-पश्चिम पसरलेल्या दाट जंगल पट्ट्यातून अन् अवखळ मुलासारखी टेकड्यावरून उड्या मारत जाते. आम्ही अर्थात हीच वाट पत्करली.

चढण चढून बालेकिल्ल्याच्या अथवा हरिश्चंद्र शिखराच्या उजव्या अंगाला आलो. आमच्या डोळ्यात ते अस्ताव्यस्त पठार मावत नव्हते. प्रतापने संशयित आवाजात सोमाजीला विचारलेहि की आपण अंधाराच्या आत मुक्काम गाठणार की नाही ? सोमा एकदम मानावर आला अन् म्हणाला, " वा ! ह्यो काय, ह्यो म्होरला वहाळ दिसतो ना ? अग तिथला तो दरा, त्याच्या पल्याडल्या वहाळात तर हाय राऊळ ! "

त्याच्या नजरदिशेस आम्हीहि नजर फेकली. पण हिरव्यागार वनश्रीने भरलेल्या दऱ्या, ओढ्याच्या खोगळीशिवाय होते काय तिथे ' लांबवर तारामती शिखर तेवढे वर डोकावत होते.

सोमाच्या इशाऱ्याबरोबर आम्ही पुढे कूच करून झाडीत शिरलो. ऊंचावर जाऊन एकमेकात मिसळणाऱ्या वृक्षाच्या पोटात कारवीच्या

गच्च रानाने अन् वेलींनी आश्रय घेतला होता. दोन्ही हातांनी त्यांचे पाश बाजूला सारावे, तेव्हा कुठे वाट भेटत होती. कसेबसे जंगलातून निसटलो.

असेच दोन ओहोळ पार केले आणि आम्ही अतर्क्यात बुडालो. पुढचाच ओहोळ होता मंगळगंगेचा. हरिश्चंद्रेश्वर त्यातून डोकावत होते. डोंबाच्या देवळाशेजारून सप्ततीर्थाशी आलो. कसे सुंदर स्थान! गंभीर! आतल्या मानवी आवाजाच्या अनुरोधाने आम्ही मंदिराच्या प्राकारात उतरलो. सैनिकाच्या ऐवजी तिथे होते 'मुंबई गिरिविहार'चे शिलेदार, म्हणजे आमच्या वेडात मुंबईकरहि सामील झाले होते तर! या वेळपर्यंत गडावर संध्याकाळ झाली. आजू-बाजूचे डोंगर गडद झाले होते. गिरिविहारकराशी गप्पाटप्पा होतायत तोवर गुहामधून काळोख पसरू लागला होता. थोड्याच वेळात काळोखाचे साम्राज्य सर्वत्र पसरले.

येथे बरीच वर्षे वास्तव्य असलेल्या गोपालनाथ पीरप्यारेनाथ बावा यांनी धुनी पेटविली. या धुनीच्या सान्निध्यात सहभोजनाचा आस्वाद घेतला. आणि थकलेल्या देहाना विश्रांतीची साथ दिली.

**योगी चांगदेवाचे महास्थान**

मध्यरात्र! मी जागा झालो. गुहेतून हलक्याच पावलांनी मी बाहेर आलो. बाहेर लख्ख चांदणे पसरले होते. भव्य नंदी आपल्या तितक्याच भव्य स्वामीकडे पाहात बसला होता. मंदिराच्या शिखरा-तून अन् शिल्पातून चांदणे झिरपत होते. शिखराची गडद सावली पडली होती.

हेच ते महास्थान जिथे योगी चांगदेव नांदला. योगसामर्थ्याने निरनिराळे चमत्कार करणारा चांगदेव! वाघाला वाहन करून ज्ञानियाच्या राजाला जिंकू पाहणारा अन् तरीहि कोरडा अगदी

एखाद्या शैलकड्यासारखा कोरडा राहणारा चांगदेव ! ज्ञानेश्वराच्या महासमाधीनतर विमनस्क स्थितीत हरिश्चंद्रेश्वरापाशी आलेला तो चांगदेव ! आणि नतर

हरिश्चंद्र नाम पर्वतु । तेथ महादेओ भक्तु
सुरसिद्धगणी विख्यातु । सेविजे जो ॥
हरिश्चंद्र देवता । मगळगंगा सरिता ।
सर्वतीर्थ पुरविता । सप्तस्थान ॥

अशी ओवी आपल्या ' तत्त्वसार ' ग्रथात त्याने लिहिली तीहि याच गुहातून ! शतकानुशतकाच्या राजवटीत भक्तगणानी येऊन गायलेल्या भक्तिगीताचे सूर अजून येथे निनादत आहेत.

पहाटभाटाच्या किलबिलाटाने भानावर येऊन गुहेत गेलो. प्रताप मुझुमदार अस्वस्थ मनाने अथरुणावर बसला होता. कदाचित त्याचे स्वप्नात व्याघ्रराजाची स्वारी आली असावी. तोवर सोमाजीहि उठला अन् म्हणाला, " उजाडल न्हव ! मजी कोकणकड्याकडे जायाला व्हीवं ! " ज्या कड्याचे कौतिक अनेक दिवस ऐकले होते त्याचे नाव ऐकताच प्रताप टणकन् उडी मारून उठला.

लगबगीने विश्वामित्राच्या घुमटी शेजारून कोकणाकडे निघालो. कोवळे ऊन अन् आजूबाजूला सृष्टीचा अफाट पसारा त्यात न्हायला होता. दोन ओहोळ पार करीत तारामती शिखराला वळसा घातला अन् खोकर तळ्यात आलो. छोटासा तलाव चढलो आणि आम्ही अवाकच झालो. आमच्या पायाबरोबर आमच्या शब्दानाहि त्या लक्ष्मणरेषेने जागच्या जागी खिळवून टाकले. आम्ही कोकणकड्या-वर उभे होतो. जवळजवळ अर्धा किलोमीटर परिघाचा अर्धवर्तुळा-कृति अतर्वक्र असा हा काळाकभिन्न कडा अवघ्या सह्याद्रीत अजोड आहे. कड्यावर उभे राहून खाली दृष्टि वळविण्याचे धारिष्ट्य नस-ल्याने कड्यावर निजूनच त्याची उंची आम्ही डोळ्यान साठवू



हरिश्चंद्रगड कोंकण कडा



भैरव गड

लागलो. कड्याची सरळ धार ४५०-५०० मीटर सहज भरेल.

### कोकणकड्यावर 'इंद्रवज्र'

या कड्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे 'इंद्रवज्र'. १८३५ साली कर्नल साईक्सने हा अजब सृष्टीचमत्कार न्याहाळला. दरीतून धुके वर आले होते. कर्नल साहेबाची स्वारी कड्यावर उभी होती. सूर्य त्याच्या पाठीमागे होता आणि समोर त्याना आपली छाया व त्याभोवती सप्तरंगी वर्तुळे दिसू लागली. हेच इंद्रवज्र.

अतीव समाधानात डुबून माघारी वळलो अन् हरिश्चंद्रेश्वर मंदिराशी आलो. एव्हाना स्वच्छ सूर्यप्रकाश मंदिरावर पडला होता.

### हरिश्चंद्रेश्वराचा शिलालेख

हरिश्चंद्रेश्वराची स्थापना खूपच जुनी. मंगळगंगेच्या प्रवाहावरून प्राकारात प्रवेश होतो. तोरणापाशी दोन व्याघ्रमुखे. दोहोबाजूच्या भिंतीवर दोन शिलालेख. त्यातील—

'चक्रपाणी वटेश्वर नन्दतु तस्य सुत. विकट देऊ' हे लेख्य-शब्दच योगी चांगदेवाच्या येथल्या वास्तव्याचा भक्कम पुरावा दिग्दर्शित करतात. पायऱ्या उतरून गेल्या की मध्यभागी हरिश्चंद्रे-श्वर शिवलिंग. त्याच्यावर ऊंच मंदिर. द्वारावर शिल्पाकृति आहेत. पश्चिम व दक्षिण बाजूंना सिद्धासाठी खोदलेल्या गुहा. यात विठ्ठल-रुक्मिणी, गणेश, देवी, नृसिंह अशा वेगवेगळ्या मूर्ति आहेत. प्राकाराबाहेर यावे तो उजवीकडे सर्वतीर्थ. या भोवतालच्या कोना-ड्यातून विष्णूच्या विभिन्न मूर्ति आहेत. असे सांगतात की जीर्णो-द्धारकर्त्यांना या तीर्थात दोन पोती नाणी मिळाली. पण अज्ञानाने ती वितळविण्यात आली. इतिहासाचे दुर्दैव ! दुसरे काय !

मंगळ गंगेच्या प्रवाहाजवळून जरा वरच्या बाजूला गेले की

तारामती शिखराच्या पोटाशी ९ लेणी आहेत. यातील एकात पुरुष-भर उंचीची गणपतीची मूर्ति आहे. या उलट हरिश्चंद्रेश्वरापासून खालच्या बाजूला गेले की केदारलिंग म्हणून अप्रतिम गुहा लेणे आहे. मध्यभागी पुरुषभर उंचीचे शिवलिंग व पिंडीभोवताली कमर-भर उंचीचे अतिशय थंडगार पाणी आहे. याहि लेण्यात दोन शिलालेख आहेत.

निसर्गप्रेमी प्राचीन लेख, गुहा, मंदिरे यांचे अभ्यासक भाविक व गिर्यारोहक या सर्वांना आकर्षण ठरले आहे हे स्थान !

हरिश्चंद्रगड पूर्ण न्याहाळायचा म्हणजे दोन दिवस पुरले नसते. पण वेळे अभावी आम्ही परतीची वाट धरली. गडावर तारामती हे सर्वोच्च शिखर. ( १४२४ मीटर ) पण गडाचा बालेकिल्ला किंवा हरिश्चंद्र शिखर गडाच्या आग्नेय भागात आहे. बांधकामाची पडझड झाली आहे. दोन पाण्याची टाकीहि येथे आढळतात. हे अवशेष इतिहासाबद्दल मुग्ध आहेत. त्यामुळेच पर्वताची दुर्गमता तट बांधून प्रथम कोणी वाढविली हे समजत नाही.

गडाच्या नावावरून पुराणातरीच्या राजा हरिश्चंद्राची कथा येथे घडल्याचे सांगतात. पण ही कथा नंतर कोणी तरी येथे प्रसृत केली असावी. प्रत्यक्षात इ. स. १७४७-४८ मध्ये पेशव्यांनी मुघलांकडून हा दुर्ग मराठ्यांकडे आणला अन् कर्णाजी शिंदे हा तेथे नामजाद झाला तर १७७५-७६ मध्ये संताजी सावंत येथे हवालदार होता, अशी नोंद इतिहास करतो याशिवाय इतर अधि-काऱ्यांपैकी एक म्हणजे हरिश्चंद्रगडकर' या घराण्यासंबंधी आख्या-यिका कळते ती अशी—सात आठ पिढ्यांपूर्वी या घराण्याचा मूळ पुरुष विष्णूपंत जोशी हा रत्नागिरी जिल्ह्यातील साखरप्याचा ब्राह्मण-पुत्र. लहानपणी नाशिक जिल्ह्यातील आपल्या बहिणीकडे हा आला मोठा झाल्यावर नशीब काढण्यासाठी फिरताना या हरिश्चंद्रगडाच्या

पायथ्याशी तो आला. या वेळी गडावरचा किल्लेदार मृत्यू पावला होता. "गडाचा कडा जो चढेल त्याला किल्लेदारी मिळेल" अशी दवंडी श्रीमंत पेशव्यानी पिटविली होती. विष्णुपंत जिवावर उदार होऊन कोकणकडा चढून गेला आणि किल्लेदारीच्या मानाचा मंदिल विष्णूपंताला मिळाला हरिश्चंद्रगडकर घराणे उदयाला आले ते असे. पुढे मे १८१८ च्या लढाईत कर्नल साईक्सने हा गड जिंकला. विष्णूपंताना वीरोचित मरण आले. त्याची पत्नी गडावरच सती गेली.

परतीची वाट धरली तरी डोळ्यासमोर तो कोकणकडाच दिसत होता. दिसत होता तो योगी चांगदेव, ते हरिश्चंद्रेश्वर! अन् म्हणून वाटत मंगळगंगा सरितेच्या तीरावरील हे सप्तस्थान नुसतेच 'सुरसिद्धगणी विख्यातु' न राहता पर्यटकामध्येहि विख्यात व्हावे. प्रवाशाचे आनंदवन व्हावे!

६९५
23270


# शिवथरच्या गिरिकंदरी

गिरीकंदरी सुदर वन ।
सुंदर वाहाती जीवन ।
त्यामध्ये सुदर भुवन ।
रघुनाथाचे ॥
कडे कपाटे दरे दुर्कटे ।
पाहो जाता भयचि वाटे ।
ऐसे स्थळी वैभव दाटे ।
देणे रघुनाथाचे ॥

समर्थ रामदासांच्या ' सुदर मठा'चे हे ओवीबद्ध वर्णन ' दास-नवमीला हा सर्व परिसर समर्थ भक्तानी गजबजतो. या सुंदर भुवनास भेट वायची म्हणजे वरंधा घाटानेच जायला हवे पुण्याहून कोकणात महाडास जाण्याचा हा जवळचा मार्ग.

भोरच्या पुढे हिरडोशीजवळ दुर्गादेवी शिखर नेहमीच खुणावते; तर ऐन घाटात वाघजाईच्या वरची नवटाकी अन् कधी कावळ्याचा दुर्ग, दरीत लपलेली शिवथरघळही वाट पाहते. वरंधा घाटातून बऱ्याच वेळा गेलेलो. पण मनाजोगते हुदडणे झाले नव्हते. मग एके दिवशी पहाटेच्या पुणे–चिन्हेरे गाडीने हिरडोशीत आलो.

राष्ट्रीय रसायन शाळेतला साठे, अभियंता भंडारी, आकाशवाणी




निवेदक भिडे तर राष्ट्रीकृत पेढीतला दाते असे सोबती माझ्याबरोबर हजर होतेच.

बऱ्यापैकी कोवळ्या उन्हातून एक किलोमीटरच्या चौंड्याशी नीरा नदी ओलांडली. उजव्या अंगाला वळवडची वाडी महाड रस्त्याला लगट करीत होती. अस्वल खिंडीचा ओहोळ डावीकडे

उनाडक्या करत होता अन् तांबडी पाऊलवाट संथपणे वर दुर्गाडी कडे चढत होती.

दुर्गा शिखराच्याच एका डोंगर सोंडेवर दुर्गाडी गावाने ठाण माडलय. अगदी छोटेसे गाव! 'पोळ' घराणी बरीच. रोहिड-खोऱ्यातले देशमुख, खंडोजी खोपडे या दुर्गाडीत पोळांच्याकडे मोठे झाले म्हणे. असो.

तापलेल्या भरपूर वाटा पुढे होत्या. एका वाटेचे शेपूट पकडले. तोंडाजवळ गेलो तेव्हा एक खिंड आली होती. पलीकडे शिरगाव दिसत होते. पाठीमागे रायरेश्वरचे नाकिंदा टोक; अस्वल खिंडही दृष्टी टाकत होती.

खिंडीतून चढण सुरू झाली. उंच वाढलेली कारवी! दोन तीन टप्प्यांत शिखराचे डोकेच तेवढे पुढे राहिले होते. उभा खडक! त्याच्या पोटाशी हिरव्या जंगलाचा दाटवा! त्यावर तांबडपानांनी रांगोळी रेखली होती.

उजवीकडच्या वाटेने जंगलात घुसलो. अप्रतिम झाडी. रानची वाट संपली तो उजवीकडे शिरगावची वाट ओठंगून आली होती. डावीकडे दुर्गा पहाड. अन पलीकडे कोकण. शिखराच्या पश्चिम अंगाला आलो अन् कांगोरीगडाने दर्शन दिले. तोच डावीकडची वाट आम्हाला वर घेऊन गेली.

माथा! समुद्रसपाटी आमच्यापासून १२२५ मीटर खाली राहिली. तोपर्यंत कालचक्र बारावर सरकले होते. जेमतेम आडोसा देणारे दुर्गेचे मंदिर पुढे उभे होते. आत देवीची मूर्ती—विशेष जुनी नसावी. देवीचे टाक न्हाहाळतोय तोच पलीकडे कळशी दिसली अन् मग पाण्याची शोधाशोध! देवीजवळच पाण्याची टाकी आहेत. मात्र शोधावी लागतात.

तेवढ्यात भंडारी वरच्या टोकावर गेला होता. त्याने सर्वांना

हाकारले. गवताच्या गचपणातून वर पोचलो. पाणी नाही, पण दूरवर मधाचे दोन थेंब होते. मकरंदगड ! अल्याड प्रतापगड महा-बळेश्वर. आणखी अलीकडे पूर्व दिशा धुंडाळली तर रायरेश्वराचे प्रचंड पठार नजरेस आले. त्यापलीकडेच रोहिडा अन् क्षितिजावर पुरंदर.

कोकणात कांगोरीगड तर वायव्येला वरधा घाटात 'कावळ्या' शेवटी नजर स्थिरावली ती तोरणा-राजगड या जोडगोळीवर.

पाणीपिशव्या रित्या झाल्या. दुर्गाचा सागावा घेतला. कमरे-एवढ्या उंच गवताने भरलेल्या वाटेने खाली उतरलो तर समोर शिरगावची घरकुले दिसू लागली. नीरा नदीच्या पाण्यातून तिच्या उगमाकडे निघालो. नदीचे मूळ शोधू नये म्हणतात. पण डोंग-राच्या गचपणातून अन् रानातून शेवटी 'नीरवावी' शोधून काढला.

बऱ्यापैकी रम्य स्थान ! एक कुंड बांधून काढलेले. आत एका कोनाड्यात सप्त नद्यांचे प्रतीक दर्शविणारा पत्र्याचा मुखवटा आहे. कुंडाच्या जवळच एक शिवपिंडी आणि एक चौकीची इमारत. वरधा घाटाने वर येणाऱ्या मालावर इथे जकात भरावी लागत असे. नीरा नदी इथून लांब प्रवास करीत नीरा–नरसिंगपूरजवळ भीमेला मिळते.

झाडीतून वाट काढीत पंढरपूर महाड रस्त्यास मिळालो, अन् एकदम चित्र पालटले. वरंधा घाट अन् कोकणचे दृश्य समोर आले. पूर्वी कधीकाळी कुणी या स्थानाला 'द्वारमंडप' म्हणून टाकलंय त्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच.

मग सुरू केली ती जीवघेणी रपेट ! कडकडीत ऊन ! पाया-खाली डांबरी सडक–पूर्ण सहा किलोमीटर. वाघजई देवीची घुमटी आली. प्रचंड काळा कातळ अन् त्याखाली पायस्थाना घाटातून

सुखरूप पोहोचवणारी देवी. रस्त्यापलीकडेच जंगलात कोसळणारा कडा ! घाटातून प्रवास करणारी प्रत्येक गाडी या वाघजईला दंडवत घातल्याशिवाय, इथली सृष्टी निरखल्याशिवाय पुढे जात नाही वाघजईच्याच वरच्या डोंगरात पाण्याची नऊ टाकी आहेत हे फारच थोड्या जणाना ठाऊक असेल !

वाघजईच्या थोडे पुढे गेले की ईशान्येला दरीत डोंगराच्या पोटाशी शिवथरघळीचा मठ दिसतो. पण क्षणभरच ! भागडी खिंडीत पुणे जिल्हा संपतो. एक वळण घेऊन घाट कुलाबा जिल्ह्यात प्रवेशतो.

ह्या खिंडीच्याच उजवीकडे जी डोंगराची सोंड कोकणात घुसली आहे तिच्यावर आहे ' कावळ्या दुर्ग '. इतिहासात अप्रसिद्ध, पण डोंगर भटक्याना ओळखीचा ! खिंडीसमोरच्या पाऊल वाटेने आम्हाला सरळ ' कावळ्या 'वर नेले. गड चिंचोळा पण लांबच लांब नाकासारखा. वरती थोडीशीच झाडी. अवशेष शोधावेच लागतात. वरंधा घाटावर नजर ठेवणाऱ्या शिबंदीस पुरेल एवढीच एक चौकीची इमारत आढळते. अर्थात जोतीच ! गडावर पाण्याचा टिपूस कुठे आढळत नाही.

कावळ्याच्या टोकावर उभे राहून चौफेर नजर फिरविणे हा एक आगळा अनुभव. सरळ तळात पारमाची गाव चित्रातल्यासारखे दिसते. पण तिथल्या मानवाचा गलका मात्र कानावर स्वच्छ पडतो.

संध्याछाया पडली होती. अजून घाट उतरून शिवथर घळीत पोहोचायचे होते. कावळ्यातून पूर्वेला शिवथर घळीची कपार दिसत होती. त्या अलीकडचा सुळका लक्ष वेधून घेत होता. पारमाचीत या अंगाने एक वाट उतरते.

कावळ्या इतिहास काहीच बोलत नाही. तेव्हा परत रस्त्या-वरच्या खिंडीत मुकाटपणे आलो इथूनही पश्चिम अंगाला एक

' बोचेघोळ ' नामे वाट कोकणात उतरते. पण अंधारात घोळ न घालता आम्ही सरळ घाटाच्या रस्त्याला लागलो. हा घाट १८५७ साली सव्वा लाख रुपये खर्च करून बांधलेला आहे. माझेरीची वाट सोडून कावळ्याला वळसा घालून पारमाचीत आलो तो रात्रीचे नऊ वाजले होते.

पारमाचीत मोरे घराणी बहुत. त्यांच्याकडची एक तलवार पाहून घेतली. शिवथर घळ जेमतेम तासाच्या अंतरावर असताना पारमाचीत राहणे कसे रुचणार ? मग लख्ख चांदण्यात रस्ता हुडकीत दरीवर आलो. पाठीमागे कावळ्याचे टोक प्रचंड डेऱ्यासारखे पुढे आले होते. समोर भयाण शांतता. सुंदर मठातला दिवा तेवढा लुकलुकत होता.

घळीशी पोचताच दिवसभराचे श्रम कधीच विरले. मोठ्या कड्याखाली कपार ! कडेने धबधबा ! त्या नीरव शांततेत चांदण्यात मिसळलेले पांढरे तुषार आम्हाला प्रसन्न करून टाकतात. मग घळीतच निद्राधीन होण्याचा बेत ठरतो. डोळे मिटले तरी जाणवते ते योगीराज रामदासांचे आनंदवनभुवनाचे स्वप्न—अत्यंत तरल आणि निर्मळ, डोळस श्रद्धा अन् समर्थ कृती यांनी भारून गेलेला समाज चितारणारे !

शके १५९७–९८ मध्ये समर्थ शिवथरच्या गिरिकंदरातील या सुंदर मठात राहिले असावेत. दासबोधाचे काही लिखाणही त्यांनी इथे केले आहे. दत्ताजी त्रिमलानी दिवाकर गोसावींना लिहिलेल्या पत्रात शिवछत्रपती आणि समर्थ यांच्या सुंदर मठातील भेटीचा उल्लेख केला आहे.

रामदासी श्री. म्हसवडे यांच्या आरतीने जागे केले. आज सह्यघाट चढून परत हिरडोशीस जावयाचे होते. शिवथर घळीच्या वरच्या डोंगरात चंद्रराव मोऱ्यांच्या वाड्याचे अवशेष आहेत. त्या

शेजारच्या टाक्यावर येऊन ठेपलो. एक देऊळही नजीक आहे.

शिवथर खोऱ्यातून देशावर जायला बरेच घाटमार्ग आहेत. हे खोरे सह्य पहाडानी पूर्ण वेढलेले आहे. खोऱ्यात कसबे, आवे अन् कुंभे–शिवथर ही प्रमुख गावे आंबेनळी, गोप्या घाट, सुपेनाळ, ह्या मार्गाने राजगड-तोरण्याकडे जाता येते, तर खुंट्याच्या वाटेने हिरडोशीस जाता येते.

चंद्रराव मोऱ्यांच्या वाड्याशी तर पोचलो. पण खुंट्याची वाट कुठून शोधायची ? पश्चिमेला दूरवर कावळ्या अन् वरंधा घाट तर उत्तरेला गोप्या घाटाचा 'व्ही' आकार ओळखीचा होता. पण खुंटा ?

मग मनसोक्त ओरडा केल्यावर शेतातला एक बाप्या गडी भेटला. चऱ्हईबाडीतून त्याने वाटेला लावून दिले. शिवथर खोरे खोल गेले अन् आम्ही घाटावर आलो. उजवीकडच्या वहाळातून शिळिंबकडे जाणारी वाट सोडून डावीकडे 'कुंड'ची वाट पत्करली. समोर उत्तरेला भाटघर धरणाच्या निळसर पार्श्वभूमीवर तोरणा–राजगड माना उंचावून न्याहाळत होते. कावळ्या गड मात्र आता अगदी न ओळखण्याएवढा लांब गेला होता.

उन्हं तापली अन् मोहिमेतले रसाळ काव्य रखरखीत बनले. मग शिरगाव रस्त्यावरची रपेट ! तप्त धुळीचा रस्ता एका उंबर झाडाशी सोडला. झाडीमुळे डोंगरचढण जाणवली नाही. खिंडीत आलो आणि धूम लांब पळत गेलेले खोरे सामोरे आले. अगदी शेवटी पत्र्याची छपरे हिरडोशीची जाणीव करून देत होती.

दुर्गादेवी शिखर परत दर्शन देऊन गेले. रायरेश्वरचा डोंगर डोळ्यांत मावत नव्हता. खिंडीच्या पुढची वाट थेट तळात घेऊन गेली. चिंचोळ्या ओढ्यात झाडी अन् थंड पाणी होते. पोटपूजेला याशिवाय सुरेख जागा कुठे आढळणार !


त्या ओढ्याच्या कडेवरची धमाल वाट हा हा म्हणता आम्हाला हिरडोशीत घेऊन गेली. दुर्गा, नीरवावी, वाघजई, कावळ्या, शिवथरघळ अशा शिवथरच्या गिरिकंदरातील वैभव पाहत आम्ही परत हिरडोशीस पोचलो. राज्य परिवहनाची महाड–पुणे गाडीही लगोलग भेटली. देणे रघुनाथाचे! दुसरे काय!

# शिवसागराच्या पैलतिरी दुर्गम दुर्ग वासोटा !

रातराणीने दिनकराला सुगंधी साद घातली होती. त्याच्या अर्धोन्मीलित नेत्रांतून सख्या हळूच डोकावली, आणि त्या प्रचंड खोऱ्यावर तिची गडद छाया पसरली. उन्हाळ्याच्या उंबरठ्यावर पावसाळा उभा होता. समोरच्या अफाट जंगलाच्या पार्श्वभूमीवर आकाशातील कृष्णमेघ अधिकच काळे भासत होते. आज वळि-वाचा रंग दिसत होता. आणि रात्र काढण्यासाठी धनगराचे एक खोपटेच आमच्यासाठी तिथे उभे होते. त्या शेजारच्या कारवीचे छप्पर असलेल्या ओवरीत तर जोराच्या पावसात टिकाव लागला नसता !

अभ्यकराच्या चदूने कुकरीने झाडाच्या फांद्या तोपर्यंत तोडून आणल्या होत्या आणि ओवरीत झकास पर्णशय्या तयार केली होती.

लांबवर धनगराची आकृती दिसली आणि निःश्वास सोडला दहा मैलाच्या टापूत हा गडी एकटा रहातो म्हणे. आणि आज आम्ही त्याच्या सोबतीला आलो होतो. खरे म्हणजे आम्हा तिघानाच त्याची सोबत होणार होती




हा प्रदेश तरी कसा ! सह्याद्रीपासून पूर्वेकडे पसरलेला. दोन प्रचंड डोंगर रांगा. त्यामध्ये घुसलेले कोयनेच्या शिवसागराचे खोल पाणी. सभोवती जंगल ! आणि या जंगलाची भेदकता वाढवीत हिंडणारी अस्वले, गवे व रानडुकरे !

यातच एक वाघही फार काळापासून दबा धरून बसला आहे— व्याघ्रगड ! अर्थात वासोटा !

धनगराचे खोपटे छोटेसे ! त्यातच म्हशींचा गोठा ! खाली वाकून म्हशींची मर्जी सांभाळीत कशीबशी पाकशाला (?) गाठली. चुलीवरच्या पातेल्यात खेकडे रटारटा शिजत होते. आणि शेजारीच चदू अन उषा छानशी पाकसिद्धी करीत होते. धूर कोंदला तसा धोंडवाला घेऊन बाहेर आलो.

धोंडबाचे नाव रामू धाऊ ढवळे. हा पलीकडच्या कादाट खोऱ्यातला. गुरं चारायला म्हणून इकडे येऊन राहिला.

धोंडबा ! उद्या आम्हाला नागेश्वर वासोटा किल्ला दाखवायला यायला पाहिजे, हं तुला ! " मी म्हटलं.

" अहो दादा, पर माझी गुरं ! " त्या आढेवेढ्यांनी माझी दाणादाणच उडाली. दिवसभराचे श्रम वाया जाणार की काय !

पहाटेच साताऱ्याहून निघालो होतो. पावसाने राज्य परिवहनाची गाडी थंडावली होती. तेव्हा कासची २० कि. मी. ची वाट आमच्या पायांनी कमी होऊ लागली. यवतेश्वरपाशी दूधगाडी भेटली. आणि कास तलवाशी घेऊन गेली. कासचा निळा जलाशय बाजूला टाकला तो ट्रकने. आणि फळणीला ट्रक सोडली. ती एका मोठ्या उतरणीवरून ' बामणी देवाची ' पाशी उतरलो. शिवसागराने दर्शन दिले.

तो प्रचंड जलाशय होडीने पार करून खिरकंडीतील पाटलाकडे आम्ही थडकलो तेव्हा दुपार झाली होती. वासोट्याच्या रानात बंदुकीविना येण्याची कुणाची तयारी होईना. शेवटी बारकू कुंभार अन लक्ष्मण जाधव ह्यांना घेऊन आमचे त्रिकूट निघाले घरधनिणीने अजूनही आयशीच्या मायेने दिलेल्या नाचणीच्या भाकरीचा आठव मनात आहे. [ महाबळेश्वरहून गाडीने तापोळे, पुढे सरकारी नावेने खिरकंडी हा मार्ग आता सोयीस्कर ]

## दुर्ग-दर्शन

खिरकंडीहून वासोट्याला दोन मार्ग. एक वाशिवटे गावाकडून नदीकिनाऱ्याने जातो-पण लांबून ! दुसऱ्या मार्गाच्या पहिल्या टप्प्यावर आलो तेव्हा आम्ही खिरकंडीमागच्या डोंगरमाथ्यावर होतो. पुढे कोंड्याचा धनगरवाडा गेला आणि वासोट्याचे दुर्ग दिसू लागले

डोंगरसोंड डावीकडे उतरलो तेव्हा वासोट्याच्या खोऱ्यात

आमचा प्रवेश झाला होता. शिवसागराचे पाणी पार तळाला गेले होते आणि त्याच्या पावसाळी फुगवट्यातील तांबडमातीतून आमचे पाय रोवले जात असताना मेट इंदवलीच्या धनगरवाड्याने आम्हाला न्याहाळले होते.

गोठ्यात झोपणे शहरी मनाला मानवण्यासारखे नव्हते तेव्हा बाहेर ओवरीतच पथाऱ्या टाकल्या.

चांदण्यात तुरळक ढग कुठे कुठे चमकत होते. समोर पश्चिमेला वासोट्याचे दोन दुर्ग शांत उभे होते. त्याआधी सर्वत्र पसरले होते अरण्य–वृक्षांचे अन काळोखाचे !

चिंता होती, उद्या हा सर्व वृक्षसागर पार करून गडावर पोचण्याची.

**वासोटा मोहीम**

पावणे दोनशे वर्षांपूर्वी अशीच चिंता पडली होती एका पेशवेकालीन सेनानीला !

" डोंगर, झाडी मनस्वी, अडचण बहुत ! किल्ला बहुत बाका ! सात कोस, अडीच मास झाडी तोडली तेव्हा मार्ग जाला." सरदार बापू गोखले इ. स. १८०७ च्या वासोटा मोहिमेत असताना एका पत्रात इथल्या झाडीचा उल्लेख करतो तो असा !

दुसरे बाजीराव पेशवे आणि औंधकर पंतप्रतिनिधी यांच्यात वैमनस्य निर्माण झाले आणि पेशव्यांनी बापू गोखल्यांची नियुक्ती प्रतिनिधींचा मोड करण्यासाठी केली. अनेक ठाणी, खुद्द प्रतिनिधींसह, बापू गोखलेने काबीज केली तेव्हा वासोट्यासारख्या अडचणीतल्या दुर्गावर त्यांच्या बायका आश्रयाला जाणे साहजिकच. त्यातच ताई तेलीण ही रखेली होती. तिच्या नावे वासोट्यावरून प्रतिकार सुरू झाला.

ही वातमी कळताच बापू गोखले कृष्णा तीरावरील तळ सोडून साताऱ्याजवळील मेढे गावी आला. तेव्हा श. १७२९ चा कार्तिक महिना चालू होता. बापू गोखले कळवितो की, "किल्ला वासोटा येथून तेलिणीने जमाव करोन प्रांतात प्रजेस उपद्रव बहुत केला आहे यामुळे लष्करसुद्धां दरमजल जाऊन पोचलो. किल्ले वासोटया-कडील जमेत अलीकडे तीन कोसावर होती. इकडील लोक बामणोलीस होते, त्याची लढाई होऊन त्याजकडील लोक पळोन वासोटयास गेले. दीपवाळीचे सुमुहूर्ते येथून कूच वासोटयाकडे होईल."

सातारा–मेढे–बामणोली–तांबी–इंदवली मेट असा मार्ग पूर्वी वासोटयास जात असे. यातील तांबीपाठोपाठ दस्तुर खुद्द बापू गोखलेने मेट इंदवली हा वासोटयाचा पायथाही ताब्यात घेतला. व तेलिणीची, रेडे घाटातली चौकी घेतल्यावर, तिवरे या कोकणा-तील गावाकडून होणारी रसद बंद झाली किल्लेदारांनी मग मकरंदगडाच्या मधाचे बोट लावून कोरडी बोलणी चालू केली. पण पुसाचा महिना उलटूनही वासोटा वाकला नाही.

## जुना वासोटा

दाट जंगलामुळे सरळ चढाई अडचणीची होती. तोफाही रानामुळे गंजत पडल्या होत्या. अर्थात दुर्गानजिकची एखादी उंच टेकडी हस्तगत करणे हा त्यावर उपाय! बापूंनी ही गोष्ट अचूक हेरली आणि "मोर्चे किल्ल्यापासोन जवळ अर्धगोळीचे मारणीत गेले. जुने वासोटा म्हणोन मोठा पर्वत नजिक आहे. तेथे स्वामी चरणांचे स्मरण करोन महत्प्रयासाने तोफ तेथे चढविली. तेथून गोळे किल्ल्यात जातात."

फाल्गुनाच्या महिन्यात गडावरील सदर, वाडा व ४०–५० घरे

आगीत भस्मसात झाली. तरीही शके १७३० मधील ज्येष्ठातील पाचवी तीथ उजाडली तेव्हा कुठे ताई तेलीण बापूने कैद केली व वासोटा पेशव्याकडे आला.

श्रीमंत पंतप्रतिनिधींचा हा अजिंक्य किल्ला वासोटा। ताई तेलीण मारी सोटा, बापू गोखल्या संभाळ कासोटा॥ ह्या गमतीदार आर्येमुळे ताई तेलिणीचे शौर्य अमर केले खरे पण खुद्द बापू गोखले ही आर्या ऐकून हसत असे आणि इतिहासतज्ज्ञही ती हसण्यावारीच नेतात. कारण ताई तेलीण स्वत लढवय्या तर नव्हतीच पण तिच्या शूरत्वाचे प्रमाण दाखविणारी दुसरीही कोणती कथा उपलब्ध नाही. तिच्या नावाने हा दुर्ग लढविला गेला इतकेच !

माझी नद्री भगली ती पावसाच्या आवाजाने वासोटा केव्हाच काळोखात गुडूप झाला होता. मराविमं इथे कोठून येणार !

पहाट फुलली ती पावसाळी गारठ्यात. समोर सह्याद्री धुकट्याने वेढला होता.

धोंडबा धनगर मजकडे पाहून चक्क हसला. मी विदूषक वगैरे दिसतोय की काय हे हळूच पाहून घेतले व विचारले, " कार बाबा हसतोस ? "

" ते तुमच्या कंबरेच पातं हो ! तेचा कायबी उपयोग नाही पघा. अस्वाल काय साद जनावर हाय होय हा माझ्यावाणी मोठा इळाच पाहिजे. "

एकदम पटले. खरे म्हणजे बरोबर बंदुकच असायला हवी होती अस्वल हे तसे खुळे जनावर ! वेधडक जीव झोकून देणारे ! आणि त्यामुळेच कटीवरच्या कुकरीवरचा हात इंदवलीचे गावठाण मागे जाऊन चढण सुरू झाली तरी बाजूला गेला नव्हता !

इंदवलीचा धनगरवाडा सोडला आणि मग रानच रान ! वाटेतले जुने गावठाण धरणग्रस्ताच्या सुस्कार्‍याने उजाड झाले आहे. वहर-

राने दुर्गाचा दुर्गमपणा गहिरा केलाय.

गडावर झाडी महामूर आहे. दरवाजा नाही. एक चंडिकेचे वा महादेवाचे देऊळ अन् काही मजबूत इमारती. याशिवाय उत्तरेला गडाची एक माची आहे. त्यावर जायला एक चिंचोळी वाट आहे. हा भाग गडापासून किंचित अलग वाटतो. काळकाईचे ठाणे हे त्याचे नाव. पण वासोटयाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे बाबूकडा किंवा बाबूखाड.

दक्षिण पश्चिमेला असलेल्या त्या कड्यावरून भीषण दरीतील धुके आम्ही न्याहाळत होतो. खोलवर दगडगोट्यांची रास पडलेली. कड्याची सरळ धार पाचशे मीटर सहज भरेल. महाबळेश्वरचा ऑर्थर सीट, हरिश्चंद्रगडचा कोकण कडा आधी पाहिलेला; पण या कड्याची रौद्रताही विलक्षणच आहे !

नजर तळात नीट पोहोचलीच नाही. आणि समोर दरीपलीकडे प्रचंड डोंगरावर स्थिरावली. त्यालाही वासोट्यासारखाच हुबेहूब कडा ! प्रतिबिंबच ते !

" त्या डोंगरावर काहीतरी बांधकाम दिसतय ! " चंदू दुर्बिणीतून पहात म्हणाला. वारकूने त्याचे नाव जुना वासोटा असे सांगितले. हे नाव का ? तर त्याला उत्तर नाही. केवळ परंपरा !

ह्या जुन्या वासोट्यावरून वासोटा तोफेच्या माऱ्यात आहे. यामुळेच पूर्वीपासून एखादी लष्करी चौकी इथे असावी. वासोटा जिंकण्यासाठी ज्या दोन लढाया झाल्या त्या वेळी जुन्या वासोटयाचाच तोफा डागण्यासाठी उपयोग केला गेला आहे.

हा वनदुर्ग वासोटा इंग्रजांनी जिंकला तो स. १८१८ मध्ये. ७ एप्रिलला. अर्थात त्यासाठी त्यांना जबर झुंज द्यावी लागली कारण, वासोटयाला परंपरा स्वातंत्र्याची ! शिलाहार राजा भोज याने हा दुर्ग बांधल्यावर, हा मोरे व शिर्के या घराण्याकडेच होता.

फार अल्पकाल विजापूरच्या आदिलशाही तख्ताची मोर्तब त्याच्यावर होती. आणि शके १५८२ च्या ज्येष्ठात तर तो शिवछत्रपतींनी जिंकला होता व नामकरण केले ' व्याघ्रगड '. ह्या वाघाचा प्रसाद म्हणूनच की काय, शके १६०१ च्या आश्विनात चार घागरी मिळून २६००० रुपये मिळाले. यानतर स. १८१८ त इंग्रजाशिवाय कोणीही ह्या वाघाला बंदिस्त करू शकले नाही.

**तोफखाना धडाडू लागला !**

हंटर, मॉरिसन हे इंग्रज अधिकारी, याशिवाय साताऱ्चे राजे प्रतापसिंह यांचे आप्तही त्यावेळी व्याघ्रगडावर कैदेत होते. यामुळे वासोट्याच्या मोहिमेत ब्रिगेडियर जनरल प्रिझलरसमवेत ग्रॅण्ट डफ, एल्फिन्स्टन यासारख्या मातब्बरांनी पुढाकार घेतला होता. मेढे, ताबीवरून इंग्रजांनी इंदवलीचे मेटही घेतले. जुन्या वासोट्यावरून तोफखाना धडाडू लागला आणि हत्तींकरवी जगलात रस्ता बनू लागला तरी गडकरी भास्करपंत मराठे नमला नाही. पण दारू कोठार व वाडे जळाल्यावर मात्र युनियन जॅक गडावर चढला. जुन्या वासोट्यावर काही इंग्रजी तोफा अजूनही आहेत.

आम्ही तळ्यावर परत आलो आणि लगेच वासोट्याला अच्छा केले. जंगली जीवनाचे खरेखुरे ' थ्रिल ' अनुभवण्यासाठी दुर्गावर रात्री मुक्काम हवा. पण अस्वलामुळे उघड्यावर झोपणे धोक्याचे आहे हे निश्चित.

शासकीय पर्यटन खात्याने वा एखाद्या गिर्यारोहण संस्थेने वासोट्यासारख्या दुर्गांवर निवाऱ्यासाठी साधी पण मजबूत झोपडी जरी बांधली तरी डोंगर भटक्यांची चांगली सोय होईल.

सह्याद्रीवर उभे राहिले की पश्चिमेला जी अद्भुत सृष्टी दिसते ती म्हणजे कोकण. देशावरील डोंगर हिंडून सह्याद्री उतरून

कोकणात सफरीचा शेवट करणे म्हणजे गोड जेवणानंतर पानाची लज्जत अनुभवणेच होय! अन म्हणूनच वासोटयाच्या अर्ध्या उतरणीवर उजवीकडे आडवी वाट पकडली.

धोंडबा धनगराशिवाय आम्ही रेडे घाटात पोचू शकलो नसतो इतका ताप ह्या आडव्या वाटेवर झाला. अर्थात ही सर्व जंगलाचीच किमया! वासोटा खोऱ्यातून माळदेव खोऱ्यात जाण्यासाठी हा रेडेघाट.

अस्वलाचे अगदी ताजे ठसे आणि झाडावरचे ओरखडे पाहून धोंडबा एकटा परत न फिरता आमच्या बरोबर थेट माळदेवपर्यंत आला. वासोट्याहून रेडेघाट एक तास अन् तिथून पुढे माळदेव एक तासाचा रस्ता. माळदेवला चार वाजले.

माळदेव हे तिवरे घाटाचे देशावरील गाव. तिवरे घाटातून पूर्वी नारळ, तांदूळ, काजू वगैरेंची आयात देशावर होई. माळदेवला आता दोनच घरे आहेत. जुनी विहीर सोडली तर गाव उठलंय!

माळदेवहून एक वाट कलावंतिणीच्या डाकेवरून सापिर्लीत उतरते तर एक वाट तिवऱ्या घाटाने तिवऱ्यास कोकणात उतरते पण घाटाची वाट लांबची, तेव्हा दीड तासाच्या मर्यादेत सह्याद्री उतरणारी ' सरी 'ची वाट आम्ही पत्करली हे सांगणे न लगेच!

संध्याकाळच्या वेळी तिवरेकरांना आमचे आगमन अनपेक्षित वाटले. वासोटयाच्या जंगलात हिंडून आलो, हे कळताच १०-१२ थोरली मंडळी आपुलकी दाखवून गेली. तिवरे गाव हजार एक वस्तीचे. गावातले वाघजाईचे देऊळ प्रेक्षणीय. जत्रा फार मोठी असते म्हणे!

तिवरे एस. टी. बंद झाली होती. आणि त्यामुळे शिंद्यांकडील आतिथ्य अनुभवून, सकाळी तिवरे सोडले ते कळकवण्यास चिपळूण गाडी पकडण्यासाठी!

# हेळवाकची रामघळ

समर्थ रामदासांनी महाराष्ट्राला त्यांच्या हयातीत तर जीवन समर्थपणे जगण्याची संजीवनी दिलीच, पण त्यानंतरही आज-तागायत, त्यांनी ज्या ज्या स्थानी वास्तव्य केले होते त्या प्रत्येक ठिकाणी त्यांच्या स्मृतीतून ती लाभत आहे. तसे नसते तर वरंधा घाटातील अवघड कड्यातील राने तुडवीत शिवथरघळीला लोक गेले नसते. सज्जनगडसारख्या उंच डोंगराची चढण वृद्धांनी कधीच पार केली नसती व अरविंद मफतलालासारख्या उद्योगपतींना चाफळच्या सर्वांगीण विकास करण्याची स्फूर्तीही लाभली नसती.

कोयना खोऱ्यात असेच एक संजीवन पण जनतेला अपरिचित असे स्थान आहे. कऱ्हाड-चिपळूण मार्गावरील कोयना धरण प्रत्येकजण न्याहाळतोच. त्यामागचा शिवसागराचा निळा जलाशयही दिसतो. पण हेळवाकच्या डोंगराचे त्यात पडलेले प्रतिबिंब फार आढळत नाही. या हेळवाकच्या डोंगरातील वहाळात एक नैसर्गिक कपार रामघळ म्हणून ओळखली जाते. कुंभार्ली घाटाच्या अलीकडे हेळवाक खेड्याच्या दक्षिणेला झाडींची वस्त्रे पांघरून रामघळीचा डोंगर उभा आहे.

हेळवाकहून नदी ओलांडून मेंढेवर गावातून चढण सुरू होते एक तासात माथ्यावर कोंढावळ्याचा धनगरवाडा दिसतो. चढताना

कोयना नदीचे संपूर्ण खोरे नजरेत येते. पूर्वेला सुंदर, गुणवतगड-पर्यंत तर पश्चिमेला कुंभार्ली घाटापर्यंत.

वनगरवाड्याच्या पुढे राम ओढा लागतो. ओढ्याच्या उगमाकडे चढण सुरू झाली तरी जवळ गेल्याशिवाय उभ्या कड्याच्या पोटातील घळीचे अस्तित्व जाणवत नाही.

रामघळीचे पहिले दर्शनच प्रसन्न आहे. २० मीटर उंचीचा सरळ अर्धवर्तुळाकृती कातळ अन् त्यावरून कोसळणारा प्रपात. चिंतनासाठी याहून अधिक चांगली जागा कोणती?

रामघळीची बाहेरची लांबी जवळजवळ ३० मीटर आहे. गुहेचे मुख आग्नेयेस आहे. घळीत दोन चौथरे आहेत. शिवछत्रपती आणि रामदास त्यावर बसत असे सांगतात.

समर्थशिष्य विठ्ठल गोसावी हे शके १६०४ मध्ये दिवाकर गोसावी यांना लिहितात—

...उपरी आनंद संवछरी श्रीसमर्थ हेळवाकीचे घळयेस होते. च्यातुर्मास तेथे क्रमिले. सीतलाई बहुत जाली म्हणून उष्णदेशासी चाफलाकडे आले..

शके १५९६ च्या आषाढापासून कार्तिकापर्यंत समर्थांच्या रामनामाने हा परिसर मंतरला होता. वेदमूर्ती रघुनाथभट यांना घळीच्या व्यवस्थेवर नेमून ते चाफळला गेले.

भर उन्हाळ्यातही विसावले असता जिथे हिवाळ्यातील थंडपणा असतो, तिथे समर्थांनी ऐन पावसाळ्यात कसे दिवस काढले असतील?

घळ एका बाजूला बरीच लांबवर पोखरलेली होती, असे सांगतात. पण आता पडझड झाली असल्याने फक्त सरपटतच आत जाता येते. कोंढावळे गावचे ग्रामस्थ तिथे उत्खनन करण्याचे प्रयत्नात आहेत.

घळीबाहेर उभे राहिले की तांबड्याहिरव्या खोऱ्यावरून पाटण-जवळील सुंदर ऊर्फ दातेगडापर्यंत नजर पोचते. घळीच्या पश्चिमेला ८-१० कि. मी. अंतरावर सारंग ऊर्फ बहिरवगड आहे. त्याला घळीपासून वाट जाते.


घळीवरून वाहणारा रामओढा बारमाही आहे. तो जिथे माळावर उतरतो तिथे एका दगडावर रामाच्या पादुका आहेत. दंडकारण्यात असताना या घळीतील वास्तव्यानंतर परतताना भक्तेच्छेसाठी श्री रामचंद्राने आपली पावले येथे उमटवली अशी श्रद्धा आहे.

कोंढावळेकर ग्रामस्थ उत्स्फूर्तपणे रामघळीचा जीर्णोद्धार व पादुकावर राममंदिर उभारणार आहेत. हेळवाकपासून रस्ता करण्याची योजना त्यांनी आखली आहे.

## मुळशीच्या मावळतीकडे !

लोणावळे स्थानक ! रात्रीचे दोन वाजलेत. फलाट एकदम मोकळा. बाकड्यावर तीन मंडळी पहुडलेली ! रक-सॅकही अस्ताव्यस्तपणे पडलेल्या. मुंबई–पुणे मंदगती रेल्वेची गती कुठेतरी खुंटली असावी नाहीतर एव्हाना ती फलाटावर यायला पाहिजे होती. दोन मुंबईकर मोहिमेत सामील व्हायचे होते. तीन दिवसात चार पाच डोंगर भटकायचे झाले की हे असे मध्यरात्रीच कुठेतरी जाऊन पहुडावे लागते. गाडी आली आम्ही खडबडून उठलो. प्रा. मोघे, त्याच्या पाठोपाठ वास्तुशिल्पी लेलेही होते. आता आम्ही पाच झालो. रेल्वे फलाटावरून सुटलो आणि आमची दहा पावलेही स्थानकाबाहेर पडली. पहाटेचे चार ! चंद्र मावळला ! लोणावळे धरणाजवळ दाट काळोख. उजवीकडची अजस्र भिंत मागे गेली अन इंद्रायणीच्या उजव्या तीरावर आम्ही आलो–दूर पश्चिमेला आय. एन्. एस. शिवाजी केंद्र होते. तिथल्या विद्युत्–दिव्यांचे प्रतिबिंब विलोभनीय तासाभरातच आरमारी नळानजिकच्या चढणीवर पहाटेची झुळूक सुखावून गेली. वर साखर पठारावर आलो.

मातीचा फुफाटा आणि अधार एकमेकात मिसळलेले होते. अजून १९ कि. मी. वर पहिला टप्पा होता. मावळातल्या कोरीगड घनगडाना मुजरा ठोकून कोकणच्या सुधागड, सरसगडना दंडवत




घालायचे होते. कलिकाळापासून हे डोंगर उभे होते. कितीही वेळा त्यावर आरोहण करा ! मात्र पुनःपुन्हा आवतण द्यायला ते विसरत नाहीत.

खरे पाहिले तर मुळशीचा टाटा तलाव इकडच्या दुर्गांना खेटून आहे. मुळशी गावापासून पहाटे व दुपारी जाणाऱ्या नौका याना नेहमीच भिडतात. पण अर्थात अनियमितपणे ! एस. टी. ची

आबवणे गाडीही फक्त उन्हाळ्यात अन गैरसोईची ! तेव्हा टाटा-सागर पार करण्यापेक्षा लोणावळ्यापासूनची पायपीट अधिक सोईची.

सह्यमाथ्यावरचा तो बैलगाडीचा रस्ता झपाझपा पावले टाकीत असता उजव्या बाजूस अचानक एक उंच सुळका लक्ष वेधतो. भंडारी आणि उषा मिडे धावतच तिकडे जातात. मधली खोल दरी दिसेपर्यंत आम्ही खाली उतरतो.

हा सुळका मोराडीचा. त्या समोरची माणगावची घरे अजून सह्यसावलीतच आहेत. सुळक्यापलीकडची दरी उंबरखंडाची. त्यामागे वाघदरी आणि दूरवर नागफणी टोक.

परत रस्त्यावर आलो. टेकाडावरून रस्ता ओघळून परत चढलाही आणि डाव्या अंगाला पवनासागर दिसू लागला. पार्श्वभूमीवर लोहगड–विसापूर ही जोडगोळी आणि उजवीकडे तुंगगडाचे तीक्ष्ण शिखर ! पाण्यावरच्या लाटा बांबू, फणस, आंब्याच्या झाडांशी विरत होत्या. नजीकचा आतवणे गाव उभे होते.

घुसळखांबची वस्ती मागे टाकली आणि कोरीगड दिसू लागला. शिवकालात कोरबारसे नावाचा प्रदेश होता त्यातला हा कोरीगड. कुणी त्याला कोराईगड, कुंवारगड असेही म्हणतात

तुरळक झाडी संपली अन् कोरीगड परत सामोरा आला मध्ये होत्या घळी अन ओढे नाले. पलाशवृक्ष त्यात उठून दिसत होते. नारिंगी, तांबड्या रंगाच्या फुलांनी बहरलेले ते पर्णहीन वृक्ष !

डावीकडे नादगाव आणि उजवीकडे आबवण्याची वाट सोडली. ओढेनाले पार करून पेठ शहापूर आले. इथून दुर्ग एखाद्या प्रचंड डेऱ्यासारखा दिसतो. बुरजावरून आरोळ्या आल्या. ही आमची बिनीची तुकडी.

दुर्गाच्या पूर्व बाजूला असलेल्या घळीतून वर पोहोचणे फारसे

अवघड नव्हते. वाटेत उजव्या बाजूला एक दुघई गुहा आणि गणपतीची मूर्ती आहे. दरवाज्याचे नाव ' गणेश दरवाजा.' दरवाज्याची रचना लढाऊ. वाटेत आजूबाजूला अनेक टाकी. आत जाताच दोन तोफांनी स्वागत होते.

कोरीगड दक्षिणोत्तर पसरला आहे. गडाची सपाटी सर्व बाजूंनी तटबद्द केली आहे. दोन मोठी तळी, खडकातली टाकी यामुळे पाणी विपूल. गुहेतून वस्तीची सोयही व्हायला हरकत नाही.

कोराई देवी ही गडाची देवता. मूर्ती भव्य अन् तेजस्वी. तिची शस्त्रे म्हणून ६ तोफा अजूनही गडावर आढळतात. त्यातल्या सर्वांत मोठ्या तोफेचे नाव ' लक्ष्मी '. सह्यमाथ्यावर असल्यामुळे या तोफाना कोकण व देश दोन्हींकडे नजर ठेवणे सोपे होते. त्यामुळेच कोरीगडासाठी ६–७ लढाया या इतिहासात आढळून येतात.

हा दुर्ग कोळ्याकडून १४८६ मध्ये निजामशाहीकडे गेल्यानतर १६४६ मध्ये हा शिवछत्रपतींच्या ताब्यात आला होता. पुढे मुघल सलतनीच्या ताब्यातून १७०० मध्ये पंत-सचिवानी हा जिंकला.

बाळाजी विश्वनाथाना पेशवाई मिळण्यात कोरीगडचा मोठा वाटा होता. आरमार प्रमुख कान्होजी आंग्रे यानी १६९२ मध्ये हा गड घेतल्यावर शाहू छत्रपतींनी बहिरोपंत पिंगळे पेशवे त्यावर पाठवले. पण पिंगळे स्वत:च कैदी बनले. बाळाजी विश्वनाथानी युक्तीने आंग्र्याना इकडे वळवून कोरीगड घेतला.

सन १८१८ तर सर्वच दुर्गांचा कर्दनकाळ. लेफ्टनट कर्नल प्रॉथरने तीन दिवसात कोराईचा दारूसाठा उडवून विजय मिळविला.

गडाचा उपयोग कैदी ठेवण्यासाठीही होत असे. सन १७५१

ते १७८० या काळात खंडेराव काकडे याच्या हवाल्यात कैदी होते.

कोरीगडच्या पश्चिम बाजूसही एक दरवाजा आहे. या समोरचे तीन चिलखती बुरूज प्रेक्षणीय आहेत. कोरीगडच्या स्वतंत्र हवेत श्वासोच्छ्वास करून आवणे दरवाज्यातून बाहेर पडण्यापूर्वी आम्ही अवती भोवती निरखण्यास विसरलो नाही. गडावरून तोरणा, मुळशी तलाव, लोणावळ्याचे नागफणी टोक, कोकणात माथेरान, प्रबळगड, कर्नाळा. माणिकगड, हे डोंगर दिसत होते. कोरीगडची उंची आहे ९२० मीटर! पायथ्याचे आंबवणे गावी शंकराचे देऊळ मुक्कामाला चांगले. तेथून सव घाटाने कोकणात माणगाव खोऱ्यात जाता येते. कोरीगडहून आंबवण्यानजिकच्या वाड्यावर उतरलो. समोर नैऋत्येला सालतरची खिंड दिसत होती. वाटेतल्या अनेक चढउतारांनी सालतर खिंडीत पोहोचायला चार वाजले. खिंडीच्या अलीकडेच सालतर गाव आहे. खिंडीची वाट झाडीने भरली असली तरी पलीकडे मात्र संपूर्ण जंगलतोड झाली आहे. त्या वैराण पार्श्वभूमीवर समोरची दरी अधिकच राकट दिसते. रुंदी जेमतेम पन्नास मीटर व पूर्व-पश्चिम लांबी दोन किलोमीटर भरेल. दरीच्या पश्चिमेला सुधागड आणि दक्षिणेला घनगड आहे. घाटावर तेलबैल्याचा दुर्ग डोंगरही या दरीला शोभा देतो.

सालतर खिंडीपासून घनगडानजिकच्या 'भाबुर्डे' गावात पोहोचायला संध्याकाळ झाली. मुळशीहून यायचे झाल्यास लाँचने बार्पे गावापाशी उतरून अर्ध्या तासाच्या वाटेने भाबुर्डे गाठता येते कोरीगडला जायचे झाल्यास 'तिसकारी' गावाशी उतरावे लागते.

भाबुर्ड्यात एक बहिरोबाचे मोठे देऊळ आहे बाहेरच बल-भीमाची मूर्ती राखणीला आहे. एक शाळा आहे. गावही सहृदय! माझ्याची सोय तांबडतोब झाली. मग भोजनाचा कार्यक्रम झाला.

घनगड डोंगरभटक्यापैकी फारसा कुणीच पाहिला नव्हता पावसाळ्यात शेवाळलेल्या, निखळत्या कड्यांमुळे तो काहींना दुर्लभ वाटला होता. कोणत्याच नकाशातही त्याला कुणी टिपलेला नाही. पण पेशव्यांचा कैदखाना म्हणून इतिहासात त्याला महत्त्व.

घनगडाखालचे जगल गहन ! ती देवराईच येकोला गाव इथून थोडे खालच्या अगाला आहे. घनगड आहे छोटासा, पण विविधतेने नटलेला ! माथा गाठायचा म्हणजे उंच चढत जावे लागते. तळात दाट झाडी. पोटात खोदीव गुहा अन् माथ्यावरून डोळे दिपविणारी सृष्टी. मुख्य डोंगर अन् यामध्ये खिंड. याकडे जाताना वाटेत गारजाई देवीचे देऊळ आहे. देवीच्या वरील बाजूस एक शिलालेख आहे. तो असा––

श्री गार
जाई माहा
राजाची व की
ले धनगडची

खिंडीत पोहोचल्यावर पलीकडे नजर जाते ती ५०० मीटर खाली कोकणात. कड्यावरचा पहारेकरी खडक पाहण्यासारखा आहे. इथून धनगडाची उभीच्या उभी भिंत चक्रावते. खाली दिसणाऱ्या बुरजांकडे मात्र वाट व्यवस्थितपणे जाते. बुरजामधील पडक्या दरवाज्यातून आत गेले की उजवीकडे एक प्रचंड शिळा दिसते. तिच्याखाली कोनाड्यात वाघजाईची मूर्ती आहे.

हा माचीचा भाग अगदी छोटासा. दोन–चार गुहा आणि पाण्याची टाकी हीच इथली संपत्ती आहे.

यातल्याच खिंडीच्या बाजूकडील टाक्यापाशी गडाच्या माथ्यावर जाण्यासाठी वाट आहे. ही एक पाच मीटर उंचीच्या कड्याने बंद केली आहे. त्यातील मधला टप्पा जरासा अवघड. पण पुढे एका

साध्या चढणीने वरच्या प्रवेशद्वारातील पायऱ्या ओलांडून गेल्यावर तुफान वारा सामोरा येतो.

धनगडची उंची ८५५ मीटर! आकार त्रिकोणी. पूर्व बाजू सोडली तर इतर सर्व बाजूंना मजबूत कडे. माथ्यावर वाड्याची जोती आणि पाण्याचे एक टाके. खिंडीत डोकावणारा बुरूज नेटका आहे.

कुर्डु उर्फ विश्रामगड, सुधागड, सरसगड, तेलबैला दुर्ग या बरोबरच पूर्वेचा डोंगराचा गराडा इथे कैदेत असणाऱ्यावर किती दडपण आणीत असेल याची कल्पनाच होत नाही. पेशवाईत इथे काही महत्त्वाचे कैदी ठेवले होते. सुखनिधान तोतया कनोजी ब्राह्मण किल्ले धनगडावर कैदेत होता. गडाच्या हवालदारीत उमाजी हणंगभोर व अर्जोजीराव ढमाले हे बराच काळ होते. १८१८ मध्ये कर्नल प्रॉथरने कोरिगडापाठोपाठच धनगडावरही युनियन जॅक चढवला.

धनगड उतरून आलो तेव्हा येकोल्यात दहा वाजले होते. इथून कोकणात दोन वाटा आहेत. एक धनगडाच्या पश्चिमेकडून नाणदाड घाटाने खडसांबळ्यास व दुसरी पूर्वेकडून घुटक्याहून खडसवळेवरून पाच्छापूर गाठून सुधागडला जाता येते. पण तेल-बैल्याचा दुर्ग बघण्यासाठी आमचा मोर्चा आम्ही तिकडे वळवला.

येकोले-तेलबैला हे अंतर एक तासाचे! तेलबैल्याचा डोंगर वैशिष्ट्यपूर्ण-प्रस्तरांच्या दोन प्रचंड भिंती एकमेकाशी जवळजवळ काटकोनात खड्या आहेत. त्यामधील खिंडीत वहिरोबाचे देऊळ आहे.

यातील गावाकडील भिंत अद्याप कोणी चढू शकले नाही दुसरी भिंत मात्र अती अवघड मार्गाने चढता येते. यांच्या मध्यात पाण्याची टाकी आहेत.

हे प्रस्तर एका बाजूने भिंतीसारखे तर एका बाजूने एकचएक स्तंभासारखे दिसतात. जनता याला कावडीचा डोंगरही म्हणते.

खिंडीतील टाक्याचे पाणी चाखत सुधागड आम्ही पाहात होतो.

' ह्यो, समोर राहिली वाग्जाई अन् कडलाच सवाष्णी ! ' इति तेलबैल्याचे पाटील श्रीपतराव मेणे. ते आम्हाला कोकणात उतरण्याच्या घाटाची नावे देत होते. सवाष्णी घाट, धोंडसे गावाला उतरतो. सखाराम हरी गुप्ते घनगडास अटकेत होते. त्याची पत्नी त्याना भेटून परत तेलबैला घाटाने जात असता घाटात मृत्यू पावली आणि घाट ' सवाष्णी ' या नावाने पावन झाला. सुधागड पेटा आणि मावळ याना जोडणारा हा महत्त्वाचा दुवा !

घाट म्हणजे सर्वसामान्याची वाट ! आम्हाला घाटाचे वळसे घेत जाणे पसंत नव्हते. मेणे याच्या चिरंजीवास सांगाती घेऊन आम्ही सरळ कड्यातून उतरणाऱ्या नाळेची वाट पकडली. सुधागड भोरप्याचा किल्ला म्हणून अधिक प्रसिद्ध ! तेव्हा या नाळेचेही नाव ' भोरप्याची नाळ ! ' सह्यमाथ्यावर आम्ही दीड वाजता उभे होतो. सुधागडवरचे भोराईचे देऊळ स्पष्ट दिसत होते त्याच्या डावीकडच्या घळीतून वाट वर जाते म्हणे ! गड सह्याद्रीपासून रुसून बाजूला झाला आहे. त्यामुळे एक भलीमोठी खिंड निर्माण झाली आहे. तिकडे ही नाळ उतरते असे मेणे यानी सांगितले. त्याच्या इशाऱ्याबरोबर आम्ही वाटेवर पाऊल टाकले. पण डोंगरावरून ओघळणाऱ्या ओहोळातल्या वाटा नेहमीच उंडारतात. त्यात झाडीच्या गचपणात शिरले की गुंगारा देण्यात पटाईत आहेत. अर्थातच दोन तास निकराची झुंज दिली तेव्हा तळात पोहोचलो. डावीकडे कडा ठेवून लगटून जाणाऱ्या ओढ्यातूनच वाट ! इतर ठिकाणी आत्महत्या !

तळात पोहोचल्यावर ओढ्यातूनच पश्चिमेकडे वळलो. डावीकडे ती धोंडसे गावाकडून येणारी रुंद दगडी वाट भेटली. एक पडके शिवमंदिर अन् पाठोपाठ हनुमंताची मूर्ती इथे पूर्वी कासारपेठ होती. झाडीतील चढण जाणवत नाही. तान्हाजी टाके मागे गेले की दोन दरवाज्याच्या पहाऱ्यातून महादरवाज्यात पोहोचता येते. रायगडाच्या महादरवाज्याची ही प्रतिकृतीच ! याला कोरा दरवाजाही म्हणतात. पुढची दगडी वाट भोराईच्या टप्प्यावर नेते.

गडमाथा गाठल्याची सुखद जाणीव झाली पायांना अन् मनानाही ! पश्चिमेला सरसगडामागे संध्याकाळ हळूच वर येत होती. एक गूढ, मंगल वातावरण. उत्तरेला दरीपलीकडे तेलबैलाच्या दुर्गापासून थेट लोणावळ्याच्या नागफणीपर्यंत, पूर्वेला घनगडापर्यंत, दक्षिणेला विश्रामगडापर्यंत सृष्टी अंधारात होती. भिऱ्याच्या टाटा विद्युतकेंद्रावरचे दिवे चमकत होते. अशीच एक इथल्या आदिलशाही राजवटीतील संध्याकाळ होऊन गेली होती. सन १६४८ ! पाच्छापूर व कोरा असे दरवाजे रोखले की भोरप्याच्या अजस्र भिंतींशी कोण टक्कर देणार यात आदिलशाही पहारेकरी निवांत होते.

- पण त्यावेळी एक सूर्याचा तेजस्वी किरण जागा झाला होता. शिवछत्रपतींच्या मावळ्याच्या रूपाने तो गडाचे साखरदऱ्यात शिरला होता.

' साखरदऱ्यात मालवजी नाईक कारके यानी माळ लाविली... सरदार मालोजी भोसले, हाताखाली जाधव आणि सरनाईक, हे प्रथम किल्ल्यावर चढले. या धारकऱ्यास उभे करून त्याचे पाठीवर हैबतराव चढले. त्यास संभाजीराव पुढे जाऊन माथा गेले... पंच-विसाने पुढे जाऊन गस्त मारिली, बोकडसिलेचा पहारा मारला राघोजी गौळी यानी हाती चांगला भाला होता तो खलबलविला...

पुढे श्री भोराईच्या टप्प्यावरी गेले... तो सदरेतून किल्लेदार, लोक धावून आले.. हाणाहाण जाहली ते समयी किल्लेदार कामास आले. उपरातिक जाऊन सदर काबीज केली."

महाराजाच्या रसिकतेने भोरप्याला 'सुधागड' नाव बहाल केले. या दुर्गाला भेट दिल्यावर ती रसिकता जाणवल्याशिवाय राहत नाही.

सुधागडच्या इतिहासातील महत्त्वाची व्यक्ती म्हणजे पतसचिव शंकराजी नारायण. याचे वडील नारो मुकुंद गाडेकर हे शिवछत्रपतींच्या हाताखाली सबनीस होते. त्याच्याच पुत्राने स्वराज्याचे 'पतसचिव' हे मानाचे पद मिळवून भोर संस्थानची मुहूर्तमेढ सुधागडावर करावी ही कौतुकास्पद कामगिरी.

निसर्गप्रेमींना सुधागड अमृतमय असूनही तो उपेक्षितच आहे. सह्याद्रीच्या सान्निध्यामुळे गडाच्या तळात अन माथ्यावर विपुल झाडी! अंबारखाने, दारूकोठारे यासारख्या चिरेबंदी वास्तू! भोराई, शिव ही मंदिरे. एक मोठा तलाव! प्रतिध्वनी देणारा बोलका कडा आणि रौद्र असे टकमक टोक. दक्षिणोत्तर अशा पठारावरील मऊशार गवतामुळे विलोभनीय वाटणारी सृष्टी. गडाखाली ३ कि. मी. वर 'नाडसूर' गावी एम. टी.ची गाडीही दोन-तीन वेळा भेटून येते. गडावरचा एक वाडाही पुरेसा संरक्षण देणारा! पण हा वाडा ढासळून चालला आहे.

अगणीच्या फुलारलेल्या वृक्षाचा मंद सुगंध घेत निद्रादेवीने मोठा सुरेख आशीर्वाद दिला.

मोहिमेचा तिसरा दिवस भोराई देवीच्या मंदिरात जाऊन आलो. सदरेची इमारत न्याहाळली. या देवीचा उत्सव वीस-पंचवीस वर्षांपूर्वी नियमित चालत असे. देवीचे मंदिर हेच सर्वांत उंच ठिकाण. उंची ५८९ मीटर. गडात याशिवाय एक नीरव शिवमंदिरही आहे. कोऱ्या दरवाज्याखेरीज एक चोरवाट व पाच्छा-

पूर दरवाजा गडाला आहे. पाच्छापूर दरवाज्याने बाहेर पडण्यासाठी किलोमीटरभर सपाटी चालावी लागते. वाटेत दुसरे तळे व प्रचंड जोती दृष्टीस पडतात. दक्षिण टोकावर चिलखती बुरूज आहे. इथून पूर्वीचा २५० मीटर उचीचा ' टकमक ' कडा व त्यामागची दरी भेदक दिसते. या बुरजापासून जवळच पश्चिम बाजूला दरवाजा आहे. खाली तळात दिसणाऱ्या पाच्छापूर गावात पोचायला फार वेळ लागत नाही.

मुघल सत्तेचा भावी वारस मराठी सत्तेपुढे लीन झालेला या गावाने न्याहाळलाय. छत्रपती संभाजी आणि औरंगजेब पुत्र अकबर याची भेट इथे झाली होती. बादशहाचा माळ, घोड्याचा माळ, झेंडाक्षाठी ही ठिकाणे त्याची आठवण ठेवून आहेत. ' नाडसूर ' हे एस. टी. चे गाव उत्तरेला तीन कि. मी. वर. तेव्हा पालीला जाण्यासाठी रामवाडीची वाट पत्करणे इष्ट.

डोंगरातून भटकताना जाणवत नाही पण कोकणातल्या रस्त्यांवरून चालणे नेहमीच जिवावर येते. पण उन्हाचे चटके खाणे आमच्या भाळी नव्हते. एक दुधाचा ट्रक आम्हाला वेगाने पालीत घेऊन गेला. एरवी अडीच तासाशिवाय सरसगडचा पायथा दृष्टीस पडणे शक्य नव्हते.

देऊळवाड्यात श्री. भाटे याच्या घरी सामान ठेवले अन लगेच निघालो.

उची अवघी ४४४ मीटर. पण सरसगड म्हणजे भिंत आहे. वाटा दोन ! देऊळवाडयाची दक्षिणेकडून व उत्तरेकडून रामआळीची !

जुन्या वाडयात दादरा असतो तसा ५० मीटर उंचीच्या घळीत दगडी जिना/खोदला आहे. अर्धा मीटर उंचीच्या ९६ पायऱ्या चढाव्या तेव्हा दरवाज्यातून माचीत प्रवेश होतो. साबाच्या पिंडी-

प्रमाणे पुन्हा ५० मीटर उचीची उभ्या प्रस्तराची अधित्यका मध्यभागी आहे. याच्या पोटात अनेक गुहा व मोठाली टाकी आहेत. एकात व्यायामशाळाही आहे. प्रदक्षिणा घालताना उत्तरेच्या बाजूला एक दरवाजा आढळतो. समोरून अधित्यकेवर वाट चढते. माथा अगदी छोटासा. शाहपीर व तळ्याकाठचे शिवमंदिर येथील वास्तू. बद्रुद्दीन दुर्ग, माणिकगड, कर्नाळा, नागफणी, कोरीगड, तेलबैला घनगड, सुधागड, भिसेखिंड असा चौफेर देखावा अन् अंबानदी-काठची शेती पाहत बसणे हा स्वर्गानंदच. खोदीव गुहावरून हा बराच प्राचीन असावा असे वाटते. शंकराजी नारायण याचे वडील नारो मुकंद यानी सरसगड घेताना जो पराक्रम केला त्याचे बक्षिस म्हणून त्याना याही गडाची सबनिशी मिळाली होती व दुरुस्ती-साठी २०० होन मिळाले होते. दुर्ग एकुटा असल्याने लष्करी-दृष्ट्या बळकट, पालीतील देवळाच्या संरक्षणासाठी इथून धारकरी पाठविणे व कैदेत गुन्हेगार ठेवणे हे याचे काम. सरसगड व सुधागड दोघेही इंग्रजांना न लढताच मिळाले. तीन दिवसात न्याहाळलेला प्रदेश माथ्यावरून दृष्टीस येत होता. या रम्य भटकंतीसाठी परत उदंड वेळ मिळो अशी प्रार्थना बल्लाळेश्वर गणेशाला करण्यासाठी आम्ही उतरू लागलो.

# भीमा तटाकी, पेडगावी

'वेड पांघरून पेडगावला जाणे' अशी एक म्हण आहे. पण असेही पेडगाव आहे, जिथे रसिकतेचे वेड आपोआपच पांघरले जाईल. मात्र यासाठी वास्तु-शिल्प सौंदर्य न्याहाळण्याची हौस हवी.

हे पेडगाव भीमा तटाकी नगर जिल्ह्यात आहे. दक्षिण-मध्य रेल्वेवरील दौंडहून काष्टीमार्गे राज्य परिवहन मंडळाच्या गाडीने पेडगावी दीड तासात पोचता येते. पुणे-करमाळा ही गाडी यामार्गे धावते.

## माणिक झाकलेलेच राहते

मात्र गाडीतून भरपूर धक्के खात पेडगावी उतरल्यावर प्रसन्न तर मुळीच वाटत नाही. उलट बाभळीच्या झाडाशेजारी तग धरून उभी असलेली उद्ध्वस्त घरे यामुळे उदासवाणेच वाटावे. आणि मेख इथेच आहे.

सिद्धटेक गणेशाच्या दर्शनाला जाणारे भाविक-पर्यटक यामुळेच गावच्या तोंडावळ्याला नाके मुरडत पुढे जातात व गावच्या मागील-दारी असलेले माणिक तसेच झाकलेले राहाते.

त्याचा शोध घेण्यासाठी गाव ओलांडून 'बहादूरगड' नामे उद्ध्वस्त भुईदुर्गात प्रवेश करावा लागतो. आणि मातीच्या ढिगाऱ्या-

तून उठून दिसतात दोन मंदिरे. पेडगावचा खजिनाच हा. याला पार्श्वभूमी लाभलीय संपन्न भीमानदीची आणि लक्ष्मीनारायण व बाळेश्वर महादेव या नावानी ही देवळे ओळखली जातात याची निर्मिती झाली इसवी सनाच्या बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात. कलाकाराच्या हस्तकौशल्यावर परकीयांचे आघात इथेही झालेले आहेत. पण तरीही देवळाच्या मूलत्वाला धक्का पोचलेला नाही हे विशेष. यातील पश्चिमाभिमुखी आहे ते ' लक्ष्मी-नारायण ' मंदिर अर्थात वैष्णवोपासकांचं ! ५४′ × ३५′ अशा आकाराच्या या देवळाला साप्रत शिखर नाही. मंदिराचे सभामंडप व गाभारा असे दोन विभाग आहेत. या सभामंडपाला तीन प्रवेशद्वारे आहेत. तिन्ही दारापुढील सुशोभित मुखमंडप आता मोडकळले आहेत.

## छिद्रित भिंती

दारांच्या चौकटींना गाभाऱ्याच्या दारापेक्षा सफाई कमी. पण तरीही त्याच्या खांबावरची नक्षी विविध तऱ्हेची आहे. दोन्ही बाजूंना द्वारपाल व त्याच सहाय्यक कोरलेले आहेत. सभामंडपाच्या भिंती छिद्रित आहेत. छिद्रित करताना त्याना विविध आकार देऊन कलात्मक दृष्टी दाखविली आहे. अर्थात यामागचा मुख्य उद्देश भरपूर उजेड आत यावा हाच

सभामंडपात प्रवेश केला की मंडपाचे चार स्तंभ मन विस्मित करतात. त्याची रचना अत्यंत सुबक आहे. त्याची चकाकी अशी की, शिल्पकार त्यावरून नुकतेच हात फिरवून गेले आहेत असे वाटते. ह्या प्रकारचे स्तंभ प्रामुख्याने गुजरातमध्ये आढळतात. स्तंभ आकाराने चौकोनी. तळ भागावर चारी अंगाना उभ्या देवता मूर्ती कोरलेल्या. त्यावर मध्यभागी कलश व चार झुंबाळ्या खोदलेल्या. कलशाभोवती नाजुक नक्षीदार पट्टी आहे. हे मांगल्याचे प्रतीक

प्रत्येक देवळात असते, पण इथले वेगळे व वैशिष्ट्यपूर्ण आहे. स्तंभांच्या अष्टकोनी पट्टीवरही छोट्याशा आठ मूर्ती आहेत.

स्तंभशीर्षापाशी चार हाताचे 'कीचक' खाली डोकावताना चारी अंगाना पाहण्यास मिळतात. तर त्यावर छतात चारी कोपऱ्यात कीर्तिमुखे जडविलेली आहेत. गाभाऱ्याचे प्रवेशद्वार बारीक नक्षी, वेलबुट्टी व अनेक मूर्ती यांनी सजविलेले आहे. माथापट्टीपाशी पाच फडाचा नाग, तर चौकटीच्या दोही अंगास द्वारपाल व सहाय्यक आढळतात. उंबऱ्यास दोन कीर्तिमुखे आहेत. दुर्दैवाने गाभाऱ्यातील मुख्य मूर्तीचा पत्ता नाही.

मंदिराचे बाह्यभाग असेच कोरीव आहेत.

तळापासून माथ्यापर्यंत विविध मूर्तींनी हे मदिर सजविलेले आहे तळापाशी गजथर, त्यावर अश्वथर आणि त्यानतर नर थर. हत्ती आणि घोडे अशा रीतीने कोरलेले आहेत की एखाद्या युद्धासाठी त्यानी पवित्रा घेतल्यासारखा वाटतो. अश्वथर हा क्वचित आढळणारा प्रकार इथे पाहण्यास मिळतो. वरच्या मानवी आकृती प्रामुख्याने वादक, नर्तक-नर्तिका याच्या आहेत. शिवाय विष्णूचे २४ प्रकार व दशावतार कोरलेले आहेत. या सर्वच मूर्ती प्रमाणबद्ध व स्पष्ट आहेत तीन मोठ्या कोनाड्यांपैकी दक्षिणेला वराह अवतार, तर उत्तरेला वामनअवतार मूर्ती आहे. पूर्वेला खाली एक भग्न गणेशमूर्ती पण आहे. लक्ष्मी-नारायणाच्या समोरच पूर्वाभिमुखी बाळेश्वर महादेवाचे देऊळ आहे. याचा सभामंडप पूर्णपणे पडला आहे. मात्र नक्षीदार मोकळे स्तभ पूर्ववैभवाची चुणूक दाखवितात.

गाभाऱ्याला सर्व बाजूंनी कोन असून तो खचलेला आहे. याचे प्रवेशद्वार लक्ष्मी-नारायण मदिराच्या दाराहून रेखीव आहे. विशेषत: मुक्तहस्त रेखाटन कलेचा वापर मुक्तपणे व सफाईने केलेला आहे. पेडगावची ही दोन मुख्य मंदिरे. याखेरीज इथे मल्लिकार्जुन, रामेश्वर,

भैरवनाथ ही प्राचीन देवळेही आहेत. विशेषत. भैरवनाथाच्या देवळाचे कोरीव काम प्रेक्षणीय आहे. पण रंगरगोटी करून भाविकांनी त्याची रया घालविली आहे. पेडगावात एक शिवकालीन विठ्ठल मंदिर व भीमा-सरस्वती संगमावर महानुभावाचे देऊळ आहे. या सर्व अवशेषावरून पेडगाव हे पूर्वी फार प्रसिद्ध व पवित्र ठिकाण असावे

ज्या गडाच्या प्रागणात साप्रत ही देवळे आढळतात तो गड औरंगजेबाच्या सरदाराने १७ व्या शतकात बाधला पण त्याहीपूर्वी ५०० वर्षे बाधलेली ही मदिरे भीमेच्या विशाल पात्राच्या पार्श्व-भूमीवर पुनः पुन्हा आपल्या शिल्प-सौंदर्याची जाणीव करून देतात.

# दुर्ग लिंगाणा, एक बेभान साहस

गडाचा महाराजा अन् महाराजाचा गड—दुर्ग रायगड म्हणजे दुर्ग भटक्याची पंढरी ! विशेषत: पुण्याकडून पदमार्गाने रायगडवारी करण्याचे एक सुरेख वेड महाराष्ट्रात सध्या रुजलं आहे. सुट्ट्या पडल्या की वेल्ह्याच्या गाडीत अवजड पिशव्या सांभाळत चढणारे एखादे तरी तरुण टोळके हमखास भेटते. त्यात काही वेळा काही सुकन्यादेखील असतात. वेल्ह्यावरून पुढे ही मंडळी कोदापूर, गेवंढे, वाघ्याचा धनगरवाडा, हरपुडचा धनगरवाडा, सिंगापूर नाळ अथवा निवी, घिसर, रायदंड, खानूचा डिगा-बोचेघोळी नाळ या मार्गावरून थेट रायगड गाठतात. फक्त ३०–४० किलोमीटरचा हा प्रवास ! याच मार्गात थोडी अनगड वाट पत्करून सह्याद्रीच्या कड्यात शिरलं तर एक उंच सुळका लक्ष वेधतो—अगदी हुबेहुब शिवलिंग ! याला च तीनशे वर्षांपूर्वी शिवछत्रपतींनी तट बांधून अधिकच गहिरा केला आणि नामकरण केलं—दुर्ग लिंगाणा !

रायगडवारी करणाऱ्यांनी अवश्यमेव न्याहाळावं असं याचं वैभव ! अर्थात यासाठी वेल्ह्यावरून पुढे हरपूड धनगरवाडे मागे गेले की जननी देवीचा कौल घ्यावा, नजरेसमोर रायगड अन् त्या अलीकडेच एक काळ्या रंगाचा सुळका दिसतो—हाच लिंगाणागड !

आम्हीही असेच त्या कडक दुपारी तिथे थबकलो होतो—

सह्याद्रीचे अजस्र कडे न्याहाळत ! डावीकडच्या वाकणातल सिंगापूर गाव अन् सिंगापूर नाळेचा ओढा उसासा टाकत होता कदाचित त्याला बगल देऊन ' मोहरी ' नाळेने घाट उतरण्याचा आमचा मनसुबा त्याच्या कानावर आला असावा. अवघड म्हणून या नाळेची ख्याती ! दूरवरून तोरणा अन् राजगडची शिखरे पाठिंबा देत होती. त्यामुळेच जननी देवीच्या आशीर्वादाने मोहरी गावात प्रवेश केला. तळहातावर मोहरी ठेवावी तद्वत हे गाव सह्याद्रीने आपल्या पश्चिमेला उघडलेल्या हातावर वसवलं आहे. या हाताचे बोट धरूनच पुढे लिंगाणा खडा आहे.

## दोनशे मीटर उचीचा कडा

मोहरीत दहा-पंधरा घरे ! एकमेव कौलारू घर मोऱ्याचं. विठू अन् बारकू हे घरधनी. बारकूला सागाती घेऊन मोहरी सोडली डोंगरसोंडेच्या डाव्या कडेची वाट आम्हाला बोराटा खिंडीत घेऊन गेली. खिंड पार करून पुढे जातो तो टेकडीच्या डाव्या अंगाला लिंगाण्याचा सुळका समोर आला. धावतच कातळ गाठला अन् पाठोपाठ कडाच !—अवर्णनीय दृश्य ! या ' रायलिंग ' टोकावरून वाकून पाहणे धाडसाचेच काम. सरळ दोनशे मीटर कडा ! अगदी डोकावणारा ! निजून न्याहाळलं तो एक खिंड दृष्टीस आली. लिंगाणा अन् सह्याद्री यामधील हा दुवा ! समोर जेमतेम ६०–७० हातांवर काळाकभिन्न लिंगाणा छाती फुगवून खडा होता. त्याच्या राकट छातीवरचे ते लाव्हारसाचे थर अन् अगदी टोकाकडच्या गुहा तो मिरवताना दिसतोय. लिंगाण्याचं शिखर न्याहाळताना उंचावलेली नजर काळ खोरे पार करून रायगडावर नतमस्तक होऊनच स्थिरावते. त्यावरील नगारखाना, जगदीश्वर ह्या इमारती स्पष्ट कळतात अगदी तळात लिंगणमाचीची चिटुकली धरठाणी झाडीतून डोकावत होती

कडेचा ओढा त्रिशूलाकार भासत होता.

लिंगाणा शिखराची समोर दिसणारी धार पकडूनच शिखर गाठता येते. पण घसारा आणि ठिसूळ कडे यामुळे हे धाडस नवख्यानी करू नये लिंगणमाचीतून ह्या सुळक्याला उजवीकडून प्रदक्षिणा घालीत ह्या धारेवर यावे लागते. बऱ्याच वर्षांनंतर प्रथमच दोन वर्षांपूर्वी मुंबईच्या हॉलिडे हायकर्सचे आरोहक यावर चढले.

मन्त्रमुग्धावस्थेतच आल्या पावलाने परतलो ते बारकूभाऊने एका खिंडीवर आम्हाला उभे केले. एक ओढा खोल उतरत गेला होता. बोराटा नाळेची सुरुवातच ही अशा मोठे धोंडे असलेल्या ओढ्यातून ! पावसाळ्यांत ज्याचे दर्शनही भयप्रद अशा ओढ्यात ठेचा खात, दगडा-वरून कसरत करीत आम्ही उतरू लागलो. दोहों बाजूंचे कडे माथे दोन-एकशे मीटर उंच गेले अन् एक कडा उतरलो तो खिंडीचा चिंचोळा भाग खतम ! ओढा एकदम तळातल्या झाडीत उडी घेत होता. डावीकडच्या अजस्त्र भिंतीवरून माझी नजर सिंगापूरच्या वहाळावर भिरभिरत होती, एवढ्यात बारकू अन् उषा भिडे पाठोपाठ आलेच.

बारकूने दाखवलेल्या वाटेवर विश्वास ठेवणे अवघड काम होते. कड्याची ती अजस्त्र भिंत होती. आणि छपराला पन्हाळ असावी तशी त्या कड्याला एक बारीक पट्टी होती ओढा सोडून त्या पट्टी-वर पावलं ठेवली. बारकू वाट दाखवून माघारा फिरला अन् तो दिसे-नासा होईतो वाट गायब झाली. उभ्या कड्याच्या वक्राकार भागावर पाटीवर १५ किलोंचे ओझे सांभाळीत आम्ही उभे होतो. हत्तीच्या कानावर जणू मुंगी ! कड्याकडे तोंड अन् दरीकडे पाठ करून घोरपडीसारख्या पकडी करत ती आडवी पट्टी आक्रमण्यास सुरुवात झाली. हॅवरसॅकने कृपावंत होऊन हिसका दिला नाही हे नशीबच ! नाहीतर दरीत उपडे फेकले जाऊन लिंगाण्याऐवजी सरळ कैलास-

लिंगच गाठण्याची वेळ आली असती. पाच-दहा मिनिटाच्या तणावा-नतर पट्टीची वाट भेटली अन् लिंगाण्याच्या खिंडीत येऊन नि श्वास टाकला. पाठीमागे दूरवर सिंगापूरचा डुबा आणि डावीकडचा लिंगाणा दोघेही कौतुकाने पाहात होते रायलिंग टोक मात्र मस्तवालपणे उभे होते अन् मग पुन्हा लिंगाण्याचा ओढा सुरू झाला. भरगच्च रानातल्या उबराच्या झाडाशी वाट ओढ्यात शिरली. आणि ओढ्यातून उतरत आम्ही पार तळात पोचलो. सध्याकाळ झाली अन् झाडीच्या टप्प्यात लिंगाण्याच्या उजव्या अंगावर खेळणारी पाऊलवाट आमच्या थकलेल्या पावलाना वेगात लिंगणमाचीत घेऊन गेली.

## जननी-सोमजाई देवीच्या कथा

पाच-पंचवीस घराची ही वाडी काळ नदीच्या वर दीड-दोनशे मीटर, लिंगाण्याच्या उत्तर पायथ्याशी वसली आहे. सामान उतरवतोय तोपर्यंत भराभरा ग्रामस्थ गोळा झाले. ज्यात ' कडू ' हे गडदेवीचे भगतही होते. जननी अन् सोमजाई ह्या त्याच्या देवता. खरं म्हणजे ह्या गडावरच्याच ! पण कोणे एके काळी त्याच्या भगताला म्हणे वर जाऊन पूजा करायचा त्रास होऊ लागला. दोघीही देवी कृपावत होऊन म्हणाल्या, " बा भक्ता ! तू आम्हाला खालीच ने कसा ! ज्या ठिकाणी आम्ही जड लागू तिथे स्थापना कर. " पडत्या फळाची आज्ञा घेऊन भगत कडूने पाठीवरून त्याना खाली आणले. माचीच्या वेशीवर जननी जड झाली. सोमजाईला घेऊन भगत खाली ' पाने ' गावास निघाला, पण ही काही जड होईना. शेवटी कटाळून भगताने तिला उतरवून चिलमीचे झुरके मारले. सोमजाई जी तिथंच आडून बसली ती अजूनही !

तोपर्यंत अर्थात निद्रादेवीही आमच्या नेत्रात जड झाली होती.

—माची जागायच्या आत आमचे पाय गडचढणीस लागले.

घसाऱ्यावरून पहिल्या टप्प्यावर पोचताना वाटेत एक पहाऱ्याची चौकीही भेटून गेली. समोरच्या सह्यशिखराना उजळून सूर्यकिरणे शिवलिंगावर अभिषेक करीत होती. खडकाच्या भिंतीच्या डाव्या कडेने पुढे जाताच (या भिंतीच्या उजव्या बाजूने गेल्यावर सुळक्याची वाट आहे.) उजवीकडे एक टाके अन् पुढे लगेच एका गुहेशेजारून वाट थेट दरीतच कोसळली. खालून येणारी ढासळलेल्या पायऱ्याची जुनी वाट डावीकडे तर उजवीकडे पाच मीटर उंचीचा कडा. तो फोडून उगवलेले ते उंबराचे झाड! दुर्गात प्रवेश हवा असेल तर ते झाडच काय तो आधार. महिपती जाधवाने एक शिडीच उचलून आणली होती. पण मग ती साहसाची अनुभूती, मजा गेली असती. थरारून त्या उंबराच्या खोडाला धरून वर चढून गेलो. झाडाचा आधार संपला, पुढे एका खडकाला वळसा घातला. क्षणभर दोन्ही पाय अतराळीच राहिले होते. श्वास रोधून ते कर्म पार पाडले. ढासळणाऱ्या पायऱ्या चढून माथा गाठला.

वरच्या सुळक्याकडे नजर गेली अन् देहभान विसरलो. त्याच्या पोटात एक प्रशस्त गुहा— सदर म्हणतात हिला. चार मोठ्या खिडक्या अन् प्रवेशद्वार. सदरेला लागूनच धान्य कोठार! कोठारातले धान्यकण वेचून बाहेर आलो ते जिभीच्या पहाऱ्यावर. लिंगाण्याचे हे पश्चिम टोक जिभेसारखे लांब पसरत गेले आहे. जननी, सोमजाईची मूळ स्थाने, काही घरटी अन् एक पाण्याचा हौद याशिवाय त्या जेमतेम २'५०० चौ. फूट गडात काहीही शिल्लक नाही. इतिहासाने नोंद केलेले हणमंत बुरूज, पहाऱ्याचा बुरूज, सरकारवाडा, प्रवेशद्वार जमिनदोस्त झालेत. ह्या जमिनदोस्तीत ताठ उभा आहे तो लिंगाकृती सुळका. ५०–६० मीटर उंच अन् सरळसोट मुद्दाम तासून काढलेला भासणारा हा सुळका म्हणजे एक आव्हान आहे. समुद्रसपाटीपासून सुळक्याचे टोक ९०५ मीटर उंच म्हणजे

**स्वराज्याचा राखणदार**

या अजिंक्यताऱ्याला पहिल बंधन शिवाजी महाराजानी इ. स. १६४८ मध्ये रायगड जिंकल्यावर घातल. स्वराज्याच्या राजधानीकडे जाणारे घाट रोखण्यासाठी हे मजबूत ठाणे त्यानी निर्माण केले. पुढे छत्रपतींतर्फे इथे पोतनीस आले. माधवराव पेशव्याना रायगड तालुक्याची सनद मिळताच फेब्रुवारी १७७२मध्ये पोतनिसाच्या येसजी चांदलेकर या हवालदाराने लिंगाणा पेशव्याच्या ताब्यात सोपवला. कैदखान्यात पडलेल्या कैद्याची सुखदु खे ऐकत मे १८१८ मध्ये रायगडापाठोपाठ लिंगाणाही कर्नल प्रॉथरच्या विजयी सैन्यास शरण गेला.

इंग्रजांनी उद्ध्वस्त केलेल्या पायऱ्यामुळे पुनश्च जिवाची कसरत करीत उंबरकड्यावरून उतरून आमची पावलं लिंगणमाचीत पोचली. सोमजाईला दंडवत करून लिंगाण्याच्या पश्चिम सोंडेला वळसा घालून काळखोऱ्यात आम्ही हा हा म्हणता पोचलो. सिंगापूर नाळेच्या पायथ्याच दापोली गाव कोकणातल्या कडक उन्हाचे चटके खात होते, त्यावेळी काळमाईच्या थाळणकोंडीत आम्ही आमचा थकवा नाहीसा करत होतो. ही अशी समोर दूरवर बोराटा नाळ खडी होती जी आम्हाला देशावरून कोकणात घेऊन आली होती. लिंगाण्याचा अवघडपणाही न्याहाळला होता. तेव्हा परत देशावर जायच म्हणजे एखादी शोभेलशी खडतर वाट आम्हाला आव्हान देणारी हवी होतीच–तिचे नाव ' फडताड ' !

रसरशीत उन्हातून बिरवाडी सादोशी रस्त्यावरील ' पणदेरी 'त पोचलो. दुपारच्या निवांत गप्पा करीत गावकरी पहुडले होते. मी सरळ मुखालाच हात घालीत फडताडची वाट विचारली. बॉम्ब पडावा

तसा हादराच त्याना बसला.

" लई बंगाळ वाट ! तुमा नाय जमाचो हे वझ घेऊन ! "

मग मी भराभर ' बोचेघोळी, सिंगापूर, बोराटा, शेवत्या मढ्या अशी सहस्त्र नामावली घेत म्हटलं, " एवढी फडताडच शिल्लक आहे बघा ! बाकी सर्व वाटा आम्ही पालथ्या घातल्यात."

" पर ह्यो वाट लईच अवघाड, उच ! आमचे चेडोपण जात नायेत ! "

ज्या वाटेने फक्त पारधीच कसेबसे जातात त्या वाटेने ही शहरी पोरे, त्यांत एक मुलगी जाणार म्हटल्यावर पणदेरीकराचा विरोध जास्तच वाढला होता. पण त्याना काय माहीत ही मुलगी हिमालयाच पाणी जोखलेली आहे ते !

शेवटी सरपचाचा ल्योक तयार झाला अन् मग त्या दगडोबा पवार अन् वसंता लाडला घेऊन पाऊण तासातच घाटपायथ्याच्या ' घोंड्ट 'च्या पाण्यावर ठेपलो.

हिप्पोपोटॅमसचा जबडा असावा तसा तीन बाजूंनी सह्याद्री गिळू पाहात होता. उभ्या कातळाचे अन झाडीचे टप्पे एकाआड एक खोखोच्या गड्यासारखे बसले होते. पाठीवरच्या सॅक्स कसल्या अन् पैस वाटेने ताराईच्या पठारावर आलो. तो ओढ्यातलं पाणी सुकलेलं, फडताडच्या निष्ठुरपणाची ही चुणूकच नव्हती ना ! दाट जगलाने फडताडाशी युद्ध घोषित झाले. त्या असंख्य वेली, ओढे-नाले दगडगोटे, खाजणाऱ्या वनस्पती, काटेरी झाडे ! बा ! सापडतील त्या अस्त्रानिशी फडताड नाळ वाट रोखीत होती. रानपट्ट्याची फळी तोडली तो काटेरी झुडपाचा घसारा. झुडपे बाजूला करीत कुसळानी अग मारवून घेत पुनश्च दुसरा जगलपट्टा ! हीही फळी पार झाली तेव्हा माथ्याची खिड दिसू लागली. आता जीवघेणी चढण सुरू झाली. खडकातली कपार लागली, पण वरती पाय टाकला तो

पाठीमागे कोणीतरी खेचलंच घाम फुटला. मागे पाहिलं तो हॅवर-सॅक कपारीत अडकत होती. कसाबसा खडक चढलो. उन्हं उतरू लागली आणि चढणीचा कोन सतत वाढू लागला. ६० अंश ७५ अंश ! त्या कड्यावर वाकूनच क्षणभर विश्रांती घेतली. माथ्यावरच्या दोन खिंडीतून ओढे सरळ ९० अंशात खाली येत होते एका वाट नसलेल्या वाटेने त्या खिंडीत पोचायचे होते.

## जिवावरचा प्रसंग

दगडूभाऊ अन् वसतही आता गोंधळला होता. सूर्यास्त जवळ आला होता. कारवी संपून कडवी सुरू झाली होती. माथ्यापर्यंत डोळे पोचेनात. पाठीमागे दृष्टी फेकण्याची हिंमत होत नव्हती. जसे वानर उभे राहतात तसेच हातात जे काय गवत मिळेल ते पकडून उभे राहणे भाग होते. त्रिशंकू अवस्थेतच रात्र काढावी लागणार अन फडताड ही झुंज जिंकणार असा रंग डोळ्यासमोर दिसू लागला.

बऱ्याच उंचावरून दगडूभाऊंची हाक आली अन मातीच्या घसाऱ्यावर पावले चढवली. एका हाताने वरच्या कड्यावर दाब द्यायचा, पायाचा गुडघा छातीपावेतो उचलून शरीर वर खेचायचे ! चार क्षण गेले अन मांडीत गोळा येऊन पाय घसरला. अन क्षणात जाणवले की सॅकचे ओझे मला खाली ओढत नेतंय ! फडताडाच्या खदखदा हसण्याचा अदृश्य आवाज दरीत घुमला अन मी भानावर येऊन सर्व शरीर त्या कड्यावर दाबून धरलं. वेळीच वसंत लाडच्या हाताचा आधारही मिळाला नाहीतर...

कमरेच्या विळ्याने पायठण्या खोदायचा प्रयत्न अयशस्वी झाला. तेव्हा ओढा गाठला. अन सरळ वर चढू लागलो. घसारा नव्हता. फक्त उभा कडा होता. उंच पायऱ्या होत्या. वरच्या खिंडीत आलो अन झुडपाच्या आधारे डगमगत पलीकडचीच फडताड खिंडहि

गाठली. बाबूच्या बेटातून वाट आम्हाला भराभरा माथ्यावर घेऊन गेली. पाण्याच्या टाक्यातलं थंड पाणी ढसाढसा पीत आम्ही आडवे झालो. मीट्ट काळोखात विजयी स्मित मात्र चमकत होते.

पाठीमागे दूरवर भयप्रद जंगल, सोबतीला शेकोटी! घाटावरची बोचरी थंडी! अन् तरीही विजयानंदात अन् चांदण्याच्या पांघरुणात रात्र सरत होती.

सूर्यरथ चौखूर उधळत आला आणि कोकणभूमीवरून आमची दृष्टी परत रायगड, लिंगाण्यावर गेली. त्याचा निरोप घेऊन फडताड माथा सोडला. जननीच्या राईतून एकल गावचा खोंड चढून कुसूर-पेठेकडे आमची विजयी पावले पडू लागली.


कुसुरपेठ आले. फडताड नाळ चढल्याचे बक्षीसही असे खास मिळाले की त्या नाचणीच्या भाकरीची अन् त्या वऱ्याच्या भाताची चव चोळवत, १५-१६ किलोमीटर अंतर पायी तुडवत वरुती, कोळवी, कानद खिंड, भट्टी या मार्गाने तोरण्याच्या पायथ्याचे वेल्हे आम्ही कधी गाठले हे कळलेच नाही.



वढू — संभाजी महाराज यांची समाधी

व्याघ्रेश्वर मंदिर,
वाघोली





एक बेभान साहस – लिंगाणा

# सिंहाच्या छाव्याने जेथे आत्मसमर्पण केले

सोळाशेऐंशीमध्ये शिवछत्रपती स्वर्गवासी झाले. त्यामुळे औरंगजेबाला वाटले की, हिंदवी स्वराज्य आपल्या मोगली पंजाखाली एका चुटकीसरशी चिरडून टाकू. पण त्याचा हा अंदाज साफ चुकला. संभाजीमहाराजांनी पुन्हा एकदा मोगलांची ससेहोलपट केली. बापसे बेटा सवाई या न्यायाने त्यांनी औरंगजेबाची धूळधाण उडविण्यास सुरुवात केली. पण शेवटी घात झाला. छत्रपती संभाजीमहाराजांना औरंगजेबाने संगमेश्वरी गिरफ्तार केले. पूर्वी औरंगजेबाच्या पोलादी पंजातून एक सिंह सुटला होता. पण आता त्याचा छावा अडकला. संभाजीमहाराजांचा औरंगजेबाने अमानुषपणे वध केला.

११ मार्च १६८९ फाल्गुन वद्य अमावास्या शके १६११ रोजी तुळापूर या गावी संभाजीमहाराजांचा वध झाला. वढू येथे त्यांचे दहन करण्यात येऊन समाधी बांधण्यात आली.

इतके दिवस संभाजीमहाराजांचे समाधीस्थान तुळापूर येथे की वढु येथे असा वाद होता. परंतु शाहूमहाराजरोजनिशीतील एका पत्राच्या आधाराने ते स्थान वढू येथेच आहे असे निश्चित झाले आहे. वढू हे गाव पुण्यापासून अवघ्या ३१ कि. मीवर आहे. वढूला जाताना पुणे-नगर रस्त्यावर पुण्यापासून १५ कि. मीवर वाघोली लागते येथे पिलाजी जाधवांची गढी असून, एक वैशिष्ट्यपूर्ण शिवमंदिर

आहे. हे मंदिर रस्त्यालगतच एका तळ्याकाठी आहे. सभोवताली अनेक वृंदावने आढळतात हे मंदिर सुंदर शिल्पकलाकृतींनी नटलेले आहे. मंदिराला तीन द्वारे असून ती सुंदर नक्षींनी शोभिवंत केली आहेत.

बाबोलीनंतर ४ किमीवर कोरेगाव लागते. कोरेगाव भीमा नदीवर असून येथे एक दीडशे वर्षांपूर्वीचा स्तंभ आहे. 'कोरेगावपासून आत ४ कि. मीवर वढू आहे. गावात शिरताक्षणीच संभाजीमहाराजांची समाधी आपले लक्ष वेधून घेते. येथे समाधीवर मेघडबरी उभारली असून समाधीची नित्यनेमाने पूजा होते.

वढूच्या परिसरातील एक ऐतिहासिक महत्त्वाचे सुंदर स्थान म्हणून भीमेच्या काठावरील फुलगावचा उल्लेख करता येईल. वढूपासुन ४ कि. मी अंतर कापून भीमा पार केली की फुलगाव लागते अथवा लोणीकंदपासून ७ किमी गाडीरस्याने गेल्यावर फुलगाव लागते. येथील वैशिष्ट्य म्हणजे भीमा नदीला पेशव्यानी बांधलेले घाट. अतिशय सुबक, प्रेक्षणीय, परंतु दुर्लक्षित असे हे घाट आहेत पेशवे येथे स्नानास येत असत. घाटाच्या मागील बाजूला पेशव्याच्या वाड्याचेही अवशेष आढळतात. हे घाट नदीच्या मध्यापर्यंत बांधलेले असून स्नानाच्या दगडाची मांडणीही वैशिष्ट्यपूर्ण आहे भीमा नदीने येथे अर्धचंद्राकृती वळण घेतल्याने येथील देखावा मोठा रम्य दिसतो.


फुलगावपासून जवळच १ किमीवर तुळापूर हे रमणीय स्थान आहे. येथे भीमा–इंद्रायणीचा संगम असल्यामुळे हे स्थान रम्य झाले आहे. संगमावर दोन शिवमंदिरे असल्यामुळे ह्या स्थानाला पवित्रता प्राप्त झाली आहे. प्रत्येक मंदिरापासून नदीच्या पात्रापर्यंत सुबक घाटणीचे घाट आहेत. तुळापूरचे मूळ नाव नागरगाव विजापूरच्या आदिलशाहाचे मुरार जगदेव नावाचे महाबलाढ्य व

धार्मिक वृत्तीचे सरदार होते. शहाजीमहाराजाच्या उपस्थितीत मुरार जगदेवानी आपला तुलादानविधी या नागरगावाला केला. सोने, रुपे वगैरे पदार्थांनी मुरार जगदेवानी आपली तुला या संगमावर केली व ते पदार्थ दान दिले. सगमावर संगमेश्वराची स्थापना आणि तेव्हापासून 'नागरगावा'चे तुळापूर झाले.

# हिरवे डोंगर ओल्या वाटा !

—अरसिकानाही भुलविणारा निसर्ग पावसाळ्यात स्वत:वरच लुब्ध होऊन अधिकच बहरतो. सुसाट वारे, आकाशात भिरभिरणारे ढग अशा आयुधांनिशी पाऊस धो धो कोसळतो. महापूर पाणी खळाळत सुटते. हे चैतन्य चार भिंतींत थबकणाऱ्या पायांनाही बाहेर खेचून आणते आणि गिरिविहारी तर हे चैतन्य शोधायला नेहमीच तयार असतात. डोंगरदऱ्याची कणखरता या चैतन्याने कोमल बनते. महाराष्ट्राच्या मावळ भागात असाच ओला दिवस पाहून मग आम्ही जमतो.

—सिंहगड ! पुण्याच्या नैऋत्येला २५ कि. मी. अंतरावर पायथ्याला आतकरवाडी घराच्या आडोशातून कुणी बाहेर डोकावत



नव्हते. अन आम्ही तब्बल चाळीस जण धबधब्या पावसात उभे होतो.

—सिंहगड राजगड-प्रचंडगड ही दुर्गत्रयी डोंगर भटक्याची फार लाडकी. गतइतिहासाच्या सोनेरी पानावर याना अढळ आहेच आणि निसर्गाने याच्यावर वरदहस्तही ठेवला आहे

—दुर्गाचा माथा दाट ढगानी वेढला होता. गडात प्रवेश पुणे द्वाराने किंवा कल्याण द्वारातून. पुणे द्वाराकडे व्यवस्थित मळली असल्याने धुकटातून वाट शोधावी लागलच नाही. तासभरात पुणे द्वारातील धुक्याशी आमची भेट झडली. वर चढताना डोंगर माथा अदृश्य तर आता वर पोचल्यावर पायथा दडी मारून बसलेला !

—कातळावर चिपकून ठिबकणारे धुके ! खडकात घट्ट रोवून बसलेले टवटवीत गवत पाहण्याशिवाय वर काही नव्हतेच !

—सिंहगडाची उची १३१७ मीटर दूरचित्रवाणी मनोऱ्याने मात्र उद्दामपणे आपले टोक गडाच्याही वर उचावले आहे. शेलार-मामाच्या तान्हाने अजरामर केलेला हा दुर्ग ह्या मनोऱ्याने अधिकच लोकप्रिय केला आहे.

—पुणेकर गिर्यारोहकाची तर याच्याशी गडद दोस्ती आहे. पण जलधाराच्या सागातीत हा बेदरकार बनला होता. झोंबऱ्या थडीचे शस्त्र पाजळवीत त्याने आमची पावले गडाबाहेर फिरवली.

—कल्याण द्वार ! जितके जपावे तितके थोडेच खडकाळ पायऱ्यावरचे पाणी नको तितक्या लवकर उतरत होते. बुरुजाखालून उजवीकडे फिरकी अन् कल्याण गावची वाट सोडून सरळ नैऋत्येच्या झुजार बुरुजाखाली आलो.

—ढगाचा पडदा नसतो तेव्हा सृष्टीचा रंगमच इथून लख्ख दिसतो. सिंहगड रांगेला समातर, सह्याद्रीपासून उमरबडा या नावाने निघणारी खेड-शिवापूरपर्यंत पसरलेली एक राग समोर दिसते. या

झुंजार बुरुजापासून समोर पुढे गेलेली नागमोडी डोंगरधार त्या रांगेला जिथे धडकते तिथे पाच-सहा मीटर उचीचे खडक एवक्याच्या पवित्र्यात उभे आहेत.


इथपर्यंत येणे ही विशेष करामत नव्हती. शिवगंगा व मुठे खोरी न्याहाळावी. क्वचित पानावर कात पसरावा तसं पसरलेले खडकवासले धरणाचे तांबडे पाणी बघावे बस्स! वाऱ्यापावसाचे लोट धार चढून मुक्तपणे धावताना तडाखे मारतातच. त्याची जाणीव कपड्यातून थेट शरीरापर्यंत होते व पाय आपोआपच पुढे पळतात.

—खडकांना डावीकडून वळसा घालून गेले की पलीकडे कानदी खोरे! आठ-नऊ कि. मी. अंतरावर कानदीचा पाणलोट भूमी कापत चालला होता. त्यामागे राजगडाचा माथा ढगात दडला होता.

—उतार आहे तीव्र! पुढचे दोन डोंगरदांड समांतर जातात ते झाडीत वसलेल्या विंझरकडे. त्यातला डावीकडचा दांड अधिक सोयीचा.

—शेतांडातील गुडघाभर चिखल अन् बांधावरील पाणलोट पायांनी उडवीत जनता विंझरात पोचली. सिंहगड-विंझर हा तीन तासांचा प्रवास. पण चाळीस जणांचा तांफा तीनाचे पाच सहज करून गेला. मुसळधार पावसात मंदिरातील बळभीम कौतुकाने बोलविता झाला अन् आम्ही मंदिरात घुसलो. काही ऑर्डिनन्स फॅक्टरी अंबरनाथमधील तर बाकीचे मुंबई 'गिरिविहार'चे सदस्य, शिवाय त्यात चार-पाच पारशी आपल्या कलत्रासह सामील झालेले. अर्थात् आतापावेतो सर्व डोंगराचा अवतार बनले होते. हे सांगायला नकोच!

—पावसाळ्यात राजगडची नाकेबंदी होते ती कानदी व गुंजवणी या नद्यांमुळे. दक्षिणेला भाटघरचा जलाशय तर तुडुंबच असतो. मुसळधार पाऊस झाला तर या सळसळत्या नागिणीप्रमाणे वाहतात.



तोरण्याची झुंजार माची

ग्रा. क
ग्रंथ, शाखा (स्थळ प्रत)

लोहगड दरवाजा



कुणी पैलतीरी जाऊ म्हणेल तर खवळून फुत्कारतात.

---यवेळी चार-पाच दिवस झालेल्या पाऊस कानंदी रूपाने वाहत होता आणि अशा पुरात मग जवळ बाळगलेला दोरही निव्वळ सूत बनतो. कबरभर पाण्यात दोराचा उपयोग होऊ शकतो. पुढे काही त्याची मात्रा चालत नाही. अशा वेळी राजगडाला जायचे म्हणजे एकतर वेल्ह्यास जाऊन ( इथे कानंदीवर पूल आहे ) वामन खिंड, पालीमार्गे ( इथे गुजवणीवर साकव आहे. )

किंवा साखरजवळ पुलावरून पलीकडे जाऊन गुजवणे मार्गे जाता येते.

यापेक्षा पाळण्यातून जाण्यात एक धमाल आहे. तेव्हा आम्ही नसरापूरकडे पाच-सात कि. मी. सरकून आसकवडीला आलो. इथून गुंजवणीतीर जवळच. त्या संध्याकाळी तिथे उभे राहणेही मौजेचे झाले. ‘ साखर ’ जवळ कानदी व गुजवणी मिसळून पुढे वाहतात. त्यामुळे खाली खळाळत वाहणारे ते मातकट तांबडपाणी पाहत पाळण्यात बसून पलीकडे जाणे हे कर्म एकूण रोमहर्षकच ! दोन्ही तीरांना जाड तार बांधून त्याला हा पाळणा लटकवला आहे. पण तो ताकद लावून ओढणे हे येऱ्याचे काम नोव्हे ! पलीकडे ‘ भगिनघर ’ला नेहमीप्रमाणे सूर्यास्त झाला. पुढे चिरमोडीला जाताना तीन तास कसे गेले हे आमचे आम्हालाच माहीत. समोर तर सगळे वेडेवाकडेच दिसत होते पण पायाखालीही चिखलात बूट बुडतायत की एखद्या ओढ्यात पाय चाचपडतायत हेही आम्हा पामरांना कळत नव्हते.

निथळल्या अंगाला कपड्यासकट पिळून दांडीवर वाळत टाकले असते तरी चालण्यासारखे होते.

चिरमोडीत पहाट उजाडली तेव्हा काहीशी उघडीप होती. हिरवी कुरणे लख्ख दिसत होती. विंझरमागची रांग धुवयाच्या शालीत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

लोहगड दरवाजा



कुणी पैलतीरी जाऊ म्हणेल तर खवळून फुत्कारतात.

——यावेळी चार-पाच दिवस झालेला पाऊस कानंदी रूपाने वाहत होता आणि अशा पुरात मग जवळ बाळगलेला दोरही निव्वळ सूत बनतो. कंबरभर पाण्यात दोराचा उपयोग होऊ शकतो. पुढे काही त्याची मात्रा चालत नाही. अशा वेळी राजगडाला जायचे म्हणजे एकतर वेल्ह्यास जाऊन ( इथे कानंदीवर पूल आहे ) वामन खिंड, पालीमार्गे ( इथे गुंजवणीवर साकव आहे. )

किंवा साखरजवळ पुलावरून पलीकडे जाऊन गुंजवणे मार्गे जाता येते.

यापेक्षा पाळण्यातून जाण्यात एक धमाल आहे. तेव्हा आम्ही नसरापूरकडे पाच-सात कि. मी. सरकून आसकवडीला आलो. इथून गुंजवणीतीर जवळच. त्या सध्याकाळी तिथे उभे राहणेही मौजेचे झाले. 'साखर' जवळ कानंदी व गुंजवणी मिसळून पुढे वाहतात. त्यामुळे खाली खळाळत वाहणारे ते मातकट तांबडपाणी पाहत पाळण्यात बसून पलीकडे जाणे हे कर्म एकूण रोमहर्षकच ! दोन्ही तीराना जाड तार बांधून त्याला हा पाळणा लटकवला आहे. पण तो ताकद लावून ओढणे हे येऱ्याचे काम नोव्हे ! पलीकडे 'भगिन-घर 'ला नेहमीप्रमाणे सूर्यास्त झाला. पुढे चिरमोडीला जाताना तीन तास कसे गेले हे आमचे आम्हालाच माहीत. समोर तर सगळे वेडेवाकडेच दिसत होते पण पायाखालीही चिखलात बूट बुडतायत की एखाद्या ओढ्यात पाय चाचपडतायत हेही आम्हा पामराना कळत नव्हते.

निथळत्या अंगाना कपड्यासकट पिळून दांडीवर वाळत टाकले असते तरी चालण्यासारखे होते.

चिरमोडीत पहाट उजाडली तेव्हा काहीशी उघडीप होती. हिरवी कुरणे लख्ख दिसत होती. झिंझरमागची रांग धुक्याच्या शालीत

अजूनही लपकून बसली होती.

पाठीवर ओल्या पिशव्या अन् अंगात ओले कपडे चढवून राजगडाची वाट चालू लागलो तो आमचा जिवलग सखा धावत आला त्याच्या प्रेमात निथळतच गुंजवण्यात पोचलो.

गुंजवण्याजवळ एक बऱ्यापैकी मोठा ओढा आहे. पण साखळी करून ओलांडणे फारसे अवघड गेले नाही. गुंजवणे हे राजगडच्या पूर्व कुशीतील गाव. गडाची सुवेळा व पद्मावती या माच्याच्या दुबेळक्यात ह्याची कौलारू घरे टुकीने उभी आहेत. गावाबाहेर बहिरोबाचे देऊळ ! चिरमोडीहून निघून दोन तास झाले होते.

गुंजवण्यातून दरडिगेच्या वाटीतून चोरदिंडीमार्गे पद्मावती माचीत प्रवेश करता येतो. आम्ही मारुतीच्या देवळापासून गुंजणद्वाराची वाट पत्करली.

भाताची तुडुंब शेते कधीच नाहीशी झाली. प्रपाताचा घुम्म आवाज घुमू लागला. त्यात पानावरून टपटपणाऱ्या पागोळ्याचा ध्वनी मिसळत होता. ओल्या गवताने झाकलेल्या ओल्या वाटेवरचा एक घसरडा प्रस्तर चढलो ते गुंजण द्वारात पोचण्यासाठीच !

थंडीत थडथडत पद्मावतीच्या देवळात पोचलो.

आरडा आरोळ्यानी राजगड गजबजला.

भिकुदा धनगराच्या झोपडीतील गोवऱ्या अन् आमच्याजवळील मट्टी तेलामुळे भुकेची पोळी चागली भाजली गेली. पावसाळी मोहिमेत गरम अन्न मिळणे हा ब्रह्मानद ! राजगडचा जोडभाऊ आहे प्रचंडगड ( तोरणा ) या दोघामधली डोंगरधार पार करणे हा धकाधकीचा विशेपत पावसाळ्यात तर निव्वळ वेडेपणा !

संजीवनीमाचीत आलो तेव्हा कळले की डावीकडे राजगडच्या बालेकिल्ल्याची उच्च खोपडी पाठीमागे गेली. पाऊस वाढतच गेला. यामुळे दूरवर तोरणा आहे व पायाखाली वाट आहे हे गृहीत धरावे

तेव्हाच पुढे पाय पडत होते.

आळू दरवाज्यातून बाहेर पडून माचीच्या टोकावरची घसरगुंडी उतरून खिंडीत पोचलो. इथून टेपाड चढून पलीकडच्या खिंडीत पोचेपर्यंत दम घुटायची वेळ आली. मनगटावर डोळे फाडून पाहिले तेव्हा तीन वाजले होते. इथून नजीकच्या धनगरवाड्यापासून डोंगर-धारेवरून तोरण्याजवळ जायला चार तास लागतात. तिथून मग बुधला माचीत प्रवेश करायचा तो एका शेवाळलेल्या प्रस्तरावरून ! पुढे कातळधारेवरची डोंबारी कसरत करावी तेव्हा कधीतरी तासा-भराने बालेकिल्ल्यातला निवारा भेटणार !

अर्थातच तसेच पुढे गेलो असतो तर बुधला माचीपाशीच अंधाराने आमची थडी बांधली असती. तेव्हा यशस्वी माघार घेणे कसे शहाणपणाचे वगैरे कौतुक करीत खिंडीतून उजवीकडे वळून ' पाली 'स आलो. उलटीकडे वळलो असतो तर ' भुतोंड्या 'स पोचलो असतो. ' साकव ' म्हणजे नदीच्या दोन तीरावरील भक्कम वृक्षाच्या आधारे जाड बांबू टाकून बांधलेला पूल ! पालीकरानी गुंजवणीवर हा साकव बांधून एक छान काम केले आहे. नाही तर गुंजवणीचे वेगवान पाणी पार करणे जडच होते.

तोरण्याच्या झुंझारमाचीच्या खाली उतरलेल्या रांगेत बामणखिंड ही वेल्ह्यास दोन तीन तासांत घेऊन जाते. वेल्हे तर तालुक्याचे गाव. मुक्कामाला मोठी शाळा आहे देऊळ आहे बऱ्याची हॉटेलची सोय आहे. पण मुख्य म्हणजे पाठ राखीत तोरणा उभा आहे. पायथ्याहून माथ्यापर्यंत नजर फिरविण्यात दृष्टी दमून जावी अशी खडी उंची.

वेल्ह्याहून पुण्यास जाणारी रा. प. गाडी गिऱ्हाइकाची वाट पाहत तयार होती. पण तिकडे चक्क काणाडोळा केला आणि तोर-ण्याच्या चढणीस लागलो. माथा अर्थातच धुकटात, पण मधूनच

अजूनही लपकून बसली होती.

पाठीवर ओल्या पिशव्या अन् अंगात ओले कपडे चढवून राजगडाची वाट चालू लागलो तो आमचा जिवलग सखा धावत आला त्याच्या प्रेमात निथळतच गुंजवण्यात पोचलो.

गुंजवण्याजवळ एक बऱ्यापैकी मोठा ओढा आहे. पण साखळी करून ओलांडणे फारसे अवघड गेले नाही. गुंजवणे हे राजगडच्या पूर्व कुशीतील गाव. गडाची सुवेळा व पद्मावती या माच्याच्या दुवेळक्यात ह्याची कौलारू घरे टुकीने उभी आहेत. गावाबाहेर बहिरोबाचे देऊळ। चिरमोडीहून निघून दोन तास झाले होते.

गुंजवण्यातून दरडिंगेच्या वाटेतून चोरदिंडीमार्गे पद्मावती माचीत प्रवेश करता येतो. आम्ही मारुतीच्या देवळापासून गुंजणद्वाराची वाट पत्करली.

भाताची तुडुंब शेते कधीच नाहीशी झाली. प्रपाताचा घुम्म आवाज घुमू लागला. त्यात पानावरून टपटपणाऱ्या पागोळ्यांचा ध्वनी मिसळत होता. ओल्या गवताने झाकलेल्या ओल्या वाटेवरचा एक घसरडा प्रस्तर चढलो ते गुंजण द्वारात पोचण्यासाठीच !

थंडीत थडथडत पद्मावतीच्या देवळात पोचलो.

आरडा आरोळ्यानी राजगड गजबजला

भिकुदा धनगराच्या झोपडीतील गोवऱ्या अन् आमच्याजवळील मट्टी तेलामुळे भुकेची पोळी चांगली भाजली गेली. पावसाळी मोहिमेत गरम अन्न मिळणे हा ब्रह्मानंद ! राजगडचा जोडभाऊ आहे प्रचंडगड ( तोरणा ) या दोघामधली डोंगरधार पार करणे हा धकाधकीचा विशेषत' पावसाळ्यात तर निव्वळ वेडेपणा !

संजीवनीमाचीत आलो तेव्हा कळले की डावीकडे राजगडच्या बालेकिल्ल्याची उंच खोपडी पाठीमागे गेली. पाऊस वाढतच गेला. यामुळे दूरवर तोरणा आहे व पायाखाली वाट आहे हे गृहीत धरावे

तेव्हाच पुढे पाय पडत होते

आळू दरवाज्यातून बाहेर पडून माचीच्या टोकावरची घसरगुंडी उतरून खिंडीत पोचलो. इथून टेपाड चढून पलीकडच्या खिंडीत पोचेपर्यंत दम घुटायची वेळ आली. मनगटावर डोळे फाडून पाहिले तेव्हा तीन वाजले होते. इथून नजीकच्या धनगरवाड्यापासून डोंगर-धारेवरून तोरण्याजवळ जायला चार तास लागतात. तिथून मग बुधला माचीत प्रवेश करायचा तो एका शेवाळलेल्या प्रस्तरावरून! पुढे कातळधारेवरची डोंबारी कसरत करावी तेव्हा कधीतरी तासा-भराने बालेकिल्ल्यातला निवारा भेटणार!

अर्थातच तसेच पुढे गेलो असतो तर बुधला माचीपाशीच अंधाराने आमची थडी बांधली असती. तेव्हा यशस्वी माघार घेणे कसे शहाणपणाचे वगैरे कौतुक करीत खिंडीतून उजवीकडे वळून ' पाली 'स आलो. उलटीकडे वळलो असतो तर ' भुतोंड्या 'स पोचलो असतो. ' साकव ' म्हणजे नदीच्या दोन तीरावरील भक्कम वृक्षाच्या आधारे जाड बांबू टाकून बांधलेला पूल! पालीकरानी गुंजवणीवर हा साकव बांधून एक छान काम केले आहे. नाही तर गुंजवणीचे वेगवान पाणी पार करणे जडच होते.

तोरण्याच्या झुंझारमाचीच्या खाली उतरलेल्या रांगेत बामणखिंड ही वेल्ह्यास दोन तीन तासांत घेऊन जाते. वेल्हे तर तालुक्याचे गाव. मुक्कामाला मोठी शाळा आहे देऊळ आहे बर्केची हॉटेलची सोय आहे. पण मुख्य म्हणजे पाठ राखीत तोरणा उभा आहे. पायथ्याहून माथ्यापर्यंत नजर फिरविण्यात दृष्टी दमून जावी अशी खडी उंची.

वेल्ह्याहून पुण्यास जाणारी रा. प. गाडी गिऱ्हाइकाची वाट पाहत तयार होती. पण तिकडे चक्क काणाडोळा केला आणि तोर-ण्याच्या चढणीस लागलो. माथा अर्थातच धुकटात, पण मधूनच

सूर्यकिरणाचे झोत गवताळ उतारांना अन् कोसळणाऱ्या पाण्याला झळाळी देत होते. पायथ्याला हे पाणी सातआठ धबधब्यातून कोसळत राहते. तोरण्याच्या भिंतीवर आदळून धुके फुटले अन् त्याचे प्रचंडगडत्व जाणवले. पुनश्च एक ढगाचा लोट पाऊस घेऊन आला. अन् हिरव्या वाटा ओल्या करून गेला. खिळखिळे झालेले निसरडे लोखंडी रेलिंग पकडत वर गेलो व कारवीच्या दाटीतून वाट काढीत पुढे जातो तो एक प्रचंड प्रपात अंगावर आला. खास ठेवणी-तला हा धबधबा !

कातळातल्या पायऱ्यावर तोल सांभाळत बिनी दरवाज्यातच नि:श्वास सोडला.

वरती मेंगाईचे देऊळ काय किंवा तटबंदी काय सर्व सारख्याच धुक्यात लपेटलेले ! झुझार माचीवर धुक्याचा सागर तर कोकण दरवाज्यातून बुधला माचीकडे नजर फेकावी तो त्याचा महासागर ! या महासागरातून एक मोती मनाने वेचला होता. पहाडांच्या मातीत टिकून राहिल्याचे समाधानाचे स्वरूपात ! तोरण्याच्या निसरड्या उतरणीवर कधीमधी घडणारे सपशेल दंडवत या हिरव्या डोंगरातील ओल्या वाटांची आठवण कायम ठेवणार आहे हे नक्कीच.

## गिरिकुहरातील एक आगळे शिल्प
# रतनवाडाचे अमृतेश्वर मंदिर

डोंगर–दऱ्यातून हिंडताना पायथ्यापेक्षा माथ्यावर पोचण्याचा आनंद अधिक असतो. पण त्यासाठी माथ्याकडे झेपावणाऱ्या गिर्यारोहकाला पायथ्याशीच खिळवून ठेवील असे एक डोंगरतळीचे सुभग स्थान आहे—नगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील रतनवाडी.

मेरू पर्वताची रवी करून शेषनागाच्या दोरीने क्षीरसागर घुसळून देव-दानवांनी जी चौदा रत्ने काढली त्यातील एक रत्न या वाडीच्या भाग्याला आले अशी श्रद्धा आहे. आणि म्हणूनच गाव रतनवाडी अन् डोंगर रतनगड–रत्नगड. पायथ्यासच आहे अमृतेश्वर देवालय. इगतपुरी-संगमनेर मार्गावर भंडारदरा धरणाच्या पश्चिमेला आणि सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर ही वाडी वसली आहे. वाडीला गाडीमार्ग घाटघर-सामरदमार्गे पण फार लांबून त्यापेक्षा भंडारदऱ्याजवळील शेंडी-मुरशेतहून जलमार्गाने वाडीस चटदिशी पोचता येते. नौकेची स्थानीय व्यवस्था आहे.

धरणातून जाताना कळसूबाई अलंग-मदन-कुलंग ही उत्तुंग रांग व दुसऱ्या बाजूला पाबरगड धनचक्कर डोंगर यांचा वेढा असतो अमृतेश्वर देवालय हे सर्वांत आतल्या वाडीजवळ. देवळाभोवती आता विशेष झाडी नसल्यामुळे लांबूनच त्याचे दर्शन होते. धरण


होण्यापूर्वी मात्र देवळाभोवती निबिड अरण्य असणार यात शंका नाही.

देवळाचे बाह्यदर्शनच थक्क केल्याशिवाय राहात नाही. सह्याद्रीच्या इतक्या अतर्भागात असे देखणे देऊळ अतोनात पावसाला तोंड देत आज सात-आठशे वर्षे कसे टिकून राहिले! देवळाची रचना अकोल्याच्या सिद्धेश्वर मंदिराच्या धर्तीवरच आहे. महादेव मंदिराला नेहमीच तीन भाग असतात. गर्भगृह, शिखर व सभामंडप. अमृतेश्वराचे शिखर चांगले ५-६ मीटर उंच आहे आणि त्यावर वैशिष्ट्यपूर्ण अशी बारीक जाळीची नक्षी आहे. प्राकारात प्रवेश केला की समोर प्रथम नंदीची मंडपी व गर्भग्रहाचे द्वार. पण देवळात प्रवेश इकडून नाही. त्यासाठी पलीकडील प्रवेशद्वारी जावे लागते. महादेवाला अर्धी प्रदक्षिणा यातच पूर्ण होते. अकराव्या शतकातील मंदिरात यासारखी नंदीची मागीलदारी स्थापना क्वचितच आढळते.

## लक्ष्यवेधी जोडपे

मंदिर सुमारे १९×९ मीटर लांबी रुंदीत बंदिस्त केलेले आहे. भिंतीच्या बाह्यभागावर मूर्ती नसल्या तरी सुबक नक्षीकाम आहे. सभामंडप सभागृहाच्या द्वारावर शिल्पकारांनी आपली आयुधे वापरून नेटकी शिल्पे कोरली आहेत. त्यातल्यात्यात सभामंडपाच्य द्वारावरील जोडप्याचे शिल्प विशेषच लक्ष्यवेधी आहे. सर्वसाधारणपणे अशा मंदिराच्या सभामंडपास दोन्ही बाजूंना पंखाप्रमाणे छोटेसे मंडप असतात. ह्या मंदिराला मात्र त्याऐवजी छिद्रित कोनाडे आहेत.

मंडपाचा अतर्भाग तर विविध मूर्तींनी सजला आहे. स्तंभ चौकोनी असले तरी नुसते ठोकळे नाहीत. बारीक नक्षीकाम त्यावर केलेले आहे. याशिवाय देव-देवतांच्या मूर्ती त्यावर जडवलेल्या आहेत. छताच्या कडेने समुद्रमंथनाची दृश्ये व नृत्यशिल्पे आहेत, तर



पहा अमृतेश्वराचे मंदिर येथिल एक शिल्प



दुर्ग लिंगाणा

कोपऱ्यातही कीर्तिमुखे देवाल्याची कीर्ती द्विगुणित करीत आहेत.

## शिल्पकार अज्ञात

यादवकालात बांधलेल्या ह्या मंदिराचे शिल्पकार अथवा अर्थ-सहाय्यक अज्ञात आहेत. इतिहासात बाळाजी बाजीराव पेशव्याच्या कारकीर्दीत अमृतेश्वराचा उल्लेख आढळतो तो असा—

श्री महादेव रतनगडी किल्ल्याखाली आहे. त्यास बालाजी कराळे यानी किल्ले रतनगड घेतेसमयी नवस केला त्याप्रमाणे किल्ले रतन-गडपैकी देविले. सदरहू सामान श्रीच्या गुरवाजवळ देऊन नित्य नैवेद्य व नंदादीप ताकीद करून चालवणे म्हणोन मोरो महादेव यास सनद[1]


रतनवाडीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथील पुष्करणी, देवळापासून थोड्याच अंतरावर ही खोदलेली आहे. येथून काढ-लेल्या दगडातूनच देवळाची बांधणी केली असावी. पुष्करणी ६×६ मीटर चौरसाकृती आहे. कडेच्या भिंतीत दहा कोनाडे आहेत. प्रत्येक कोनाड्यात उभी मूर्ती आहे. एकात शेषशायी विष्णूची मूर्ती तर एकात गणेश मूर्ती आहे. प्रवरा नदीचा उगम रतनगडला रत्नादेवीच्या गुहेत होतो. तिथून ती या तीर्थात प्रगटून पुढे वाहते.

अमृतेश्वराची पाठ राखीत असलेल्या रतनगडावरून सह्याद्री अन् कोकणचे विराट दर्शन घडते. ते गिर्यारोहकाकडे सोपवणे हे चांगले. पण परीटघडीची काळजी घेणाऱ्या पर्यटकानी चाकोरी सोडून गिरीकुहरातील या अमृताची चव घ्यायला हरकत नाही.

# इथे डोंगरमाथ्यावरी

कधीतरी वाटतं की डोंगरमाथ्यावरचा सुसाट वारा अनुभवावा, लुसलुशीत गवतावरून मनसोक्त लोळावे, कातळकड्याचे रौद्रत्व न्याहाळावे, त्याच्या पोटातील थंड पाण्याचा स्पर्श घ्यावा आणि त्याच्याच माथ्यात उगवलेले एखादे रसिले रानफूल कौतुकाने पाहावे.

अन् मग असेच आम्ही बाहेर पडतो ते पुण्याच्या पश्चिमेला पानशेतला थडकतो. धरणफुटीचे अवशेष पानशेतची वसाहत अजूनही डोंगरउतारावर बाळगीत आहे. धरणाने आंबी नदीचे पाणी पाठीमागे २० कि. मी. फुगवलेय.




आंबीच्या उत्तरेला धारेपलीकडे मोसे खोरे. याच्या उगमापाशी

विश्रामगडच्या ठेंगणासा सुळका लिंग्या घाट रोखीत उभा आहे. याच्या दक्षिणेला कुम्या घाटाचे रक्षण करतोय मानगड तर कावल्या घाटात डोकावतेय कोकण दिव्याचे कातळ शिखर.

पानशेतजवळ आंबी व मोसी या नद्यांचा संगम झालाय. पुढे या मुठेला मिळतात अन पुण्याकडे वाहतात. मोसे खोऱ्यात आम्ही प्रवेशलो तेव्हा चंद्रबिंब नुकतेच वर आले होते. डोंगराची निस्तब्धता कोल्हेकुई डहुळवत होती. नदीच्या डाव्या काठाची पाऊल वाट. वरसगाव, साईव ही गावे गुपचूप बसली होती. अन् मग थोरले मोसेच.

मोसे गाव एका ऐतिहासिक वीरास निगडीत आहे — बाजी यशवंतराव पासलकर. शिवछत्रपतींच्या स्वराज्य कार्यास बाजींनी मोलाची मदत केली खुद्द मोस्यात बाजींचा वाडा होता आणि त्यांचेच एक वंशज श्री. दत्तोबा पासलकर यांनी परिश्रमपूर्वक तिथे बाजींची स्मृती पुतळारूपाने जपली आहे. बाजी पासलकर धरण पूर्ण झाल्यावर हे सर्व पाण्याखाली जाणार आहे.

ऐतिहासिक अवशेषाच्या सान्निध्यात स्मृतींची पाने चाळताना हळूचकन डोळे मिटले. पासलकरांच्याच आधिपत्याखालील विश्रामगड मानगड ही दुर्गस्थळे उद्या पाहावयाची होती.

वेळुच्या बेटांनी मोस्यातील घराघराला शोभा आणली आहे. तिथल्या निसर्गात न गुंगता मोसे पहाटेच सोडले. नदीच्या डाव्या किनाऱ्याने मळलेली वाट बेंबटमाळ, पळशी, आडमाळ. उन्हा-बरोबरच दृष्टीतही गात्रे वाढत होती.

आडमाळच्या अलीकडे एक सुबक जागा आहे. काळकाईचे देऊळ. भोवती थोडी सपाटी अन् पलीकडे मोसे नदीचा डोह. विश्वाची चिंता करीत म्हसरे सावलीतून पहुडली होती. निंबाळकरांच्या दिलीपला अशा जागा फार प्रिय. जरा टेकला की समाधीच. मुगाव-

जवळ त्याला अशाच समाधीतून जागे केले तेव्हा नदीतल्या निळ्या डोहावरचा वारा घाटापाशी पोचल्याची सुखद जाणीव देऊन गेला.

उत्तरेकडे पुढे खोऱ्यात डोकावणारी ताम्हीन खिंड गाडीरस्ता लपेटून उभी होती. मुगावपासून तासाभरातच खोरे चिंचोळे होत होत गेले. उजवीकडे धामणवहाळच्या वाटेवर मोसे नदीचा उगम आहे.

मुळशीहून नावेतून दावडी किंवा डोंगरगाव मार्गेही इथे येता येते.

नदीने कातळ कापून वळण घेतले होते. कोलाहल येत होता. कातकरी लमाणाचा तळ पडला होता. आमच्या शिरस्त्राणाना भिऊन पोरे आयशीला चिकटली अन् आम्हीही सह्याद्रीला घाटमाथ्यावर नेहमीप्रमाणे बहिरी.

पायथ्याचे कडे टप्प्याटप्प्याने उतरत गेले होते. घाटाच्या मध्यात विश्रामगडचा सुळका उगवला होता. तळातल्या वृक्षराईवरून कोक-णच्या सपाटीवर दृष्टी पोचत नव्हती. अगदी उजवीकडे घाटाचे कातळकडे सरळ तुटले होते.

कातळातल्या पायऱ्या नेटक्या असल्यामुळे मध्यापर्यंत उतरायला फारसा वेळ लागला नाही. देशावरून कोकणात चौल ह्या प्राचीन बंदरी जाणारा मार्ग उजवीकडच्या वहाळात नाव देवस्थळी !

उंबर्डीची वाट सोडून विश्रामगडाकडे निघालो. उंबर्डीच्या वाटेवर घाट पायथ्याला घडशा कोळ्याचा वाडा होता.

गडाची तटवदी झाडीतून कशीबशी दिसतीय तोवर कुडईचे देऊळ आले. विश्रामगडच्या पश्चिमेला उतरत गेलेल्या दांडावर कुई पेठ वस्ती आहे.

पेठेपासून गडाच्या चढणीवर लागलो तोच कोन हाय र वा ! गडावर कोन चढतया !

खड्या आवाजात असे दरडावणारे हे कोणी जुन्या रखवालदाराचे आत्मे तर नव्हते! हळूच मागे वळलो. पेठेतल्या खळ्यापासच्या दोन ठिपक्याकडून आवाज येत होता.

'आम्ही पुण्याची मानसं, दादाऽहो.' असे सागून गडात प्रवेश केला. गडाचा सुळका चागला तीस-चाळीस मीटर सरळ उंचावलेला. वर चढण्यास निसर्गाने कुठेच वाव ठेवलेला नाही.

सुळक्याभोवती पैस जागा नाही. मोठाले खडक पडलेले. त्यातल्याच एका कपारीत दडलेले पाणी रिचवून पुढे झालो तो सुळक्याच्या पोटात केवढीतरी मोठी गुहा. सुळक्याचा प्रचंड भार गुहेच्या छताने सांभाळलाय ही किमयाच.

गडाच्या पूर्वेला खिडीतला बुरूज घडीव आहे. ह्या बाजूने घाटावरून गड पूर्णपणे माऱ्यात आहे. सुळक्याच्या दक्षिण बाजूला एक प्रचड खडक सुटला आहे. या मधल्या खिडकीत बसणे ही एक और मजा आहे. याही बाजूला पाण्याचे टाके आहे.

बाजी पासलकरानी आपल्या ८४ गावावर अधिकार गाजवताना एक कणखर ठाणे म्हणून गडाला इ. स. १६४०-४२ मध्ये मूर्त स्वरूप दिले. कोकणातील घडशा कोळ्याचा पाडाव केल्यावर बाजींनी कुर्डूचा सुळका चहूबाजूनी बाधून त्याचा विश्रामगड केला.

गडासाठी फारशा लढाया झाल्या नाहीत. पण जावळीचे राजे म्हणवणारे विजापूर अकीत सरदार चद्रराव मोऱ्याची पाठ मात्र बाजींनी या कुर्डू गडावरूनच पाहिली ती रात्या माग, खडनाक महार अन् अनता खुरसुला याच्या सहाय्याने. ठेंगण्याशा विश्रामगडावरून अवतीभवती काहीच दृष्टीस येत नाही. वारेही पडले होते. मग आमची पावले उताराला नाही लागली तरच नवल

कुर्डूवरून जित्यास उतरणारा तो लिंग्या घाट. पण आम्ही उतरलो उबर्डीस. छोट्याशा कुर्डूची उतरण चागलीच जाणवणारी

दीड तासाची वाटचाल शिखलीत अधाराबरोबरच घेऊन गेली. वाटेत जिते-शिरवली गाडीवाट भेटली अर्थातच गाडीशिवाय.

कडापे मागे गेले तेव्हा पायाची चाळण झाली होती. सागाच्या झाडातून चादणे पसरले होते. भयाण शातता. लाबलचक शेताडे. एकही दिवा नाही. आम्ही दोघेही दोघेच. वाटा बक्कळ चकवणाऱ्या!

दिलीप थकून बसलाच ! छे! असे हातपाय गाळून चालणार नव्हते. खरं म्हणजे शिखलीतच एखाद्या अगणात पथाऱ्या पसरल्या असत्या तर कुणी नाही म्हटले नसते. पण मानगडच्या पायथ्याला बोरवाडीत मावशीबायला सागावा धाडला होता. आणि तिच्या मायेत चिंब भिजल्यावर उद्याचा उष:काल पुढली वाटचाल सुलभ करून देणार होता.

मग चार तासाची जीवघेणी वाटचाल संपली रात्री दहाला. हरि नामाच्या भजनात बोरवाडी जागेच होते.

अबूमावशी गोऱ्यांकडे मुक्काम करून मानगडाकडे निघालो. मानगडातून हाळी दिली तर बोरवाडीतील झाडांची पाने हलावी. गडाचा पायथा मात्र मशीदवाडी. गडाची पश्चिम बाजू तुटलेली तर पूर्वेकडून गड कुंभ्या डोंगराला जोडलेला. मधल्या खिंडीत विंझाई देवी. देवीचे पुजारी अनत जाधव सागाती असल्यावर दरवाज्यात पोचणे काहीच अवघड नव्हते. कमानीवर एक सुबक नक्षी.

अकरा टाक्यानी गड संपन्न आहे. एक पीर व एक गुहा. सागाच्या झाडीत गडकऱ्यांची उद्ध्वस्त घरे. पश्चिम कड्यावरून तळे—घोसाळे गडापर्यंत प्रवेश दिसतो. वायव्येला जननीच्या डोंगरा-मागे सरसगड कोकणाच्या सपाटीतून उठावला होता. पूर्वेला सह्या-कडा धन्वीची दोन शिखरे अन् कुंभमाथा उंचावून उभा होता.

विंझाई देवीपासून माजूऱ्यांत पोचायला वेळ लागला नाही. रण-पिस्यांचे मोठे थोरले घर अगत्याने स्वागत करून गेले. विश्रामगड

कुडु पाहून खरे म्हणजे जिते, टिटवे, केळगणमार्गे माजूऱ्यांत येणे हा जवळचा मार्ग. इथून कुंभ्या घाटाची चढण अर्ध्या तासाची. हाशहुश करीत जननीचे देऊळ गाठले तेव्हा १२ वाजले होते.

पलीकडे कुंभी नदीतला कोंड स्वच्छ नितळ पाणी. पिट्टू फेकून त्यात उड्याच ठोकल्या. थकलेले स्नायू त्या थंड स्पर्शाने मोकळे झाले.

नदीच्या पाण्यातूनच थोडे पुढे गेलो तो नदीने वळण घेऊन सरळ दोनशे मीटर उडी घेतली होती—अप्रतीम. कड्यावर वाकून पाहातो तो पाणी तळात पोचतच नव्हते. वाऱ्याच्या झोताने उधळून इंद्रधनुष्यात ते मिसळले होते. तळात छोटासा तलाव. पुढे नदी इंग्रजी ' यू ' वळण घेऊन नाहीशी झाली होती.

' तळात जाऊनच हा रौद्राविष्कार अन् हे गंगावतारण पाहिले पाहिजे नाही. ' इति दिलीप.

' पाण्याच्या धारेला धरून जात असशील तर जा बापडा. '

अर्थात आम्ही कोकणदिव्याकडे निघालो. जन्नीच्या देवळापर्यंत माघार घेतली आणि उंचावरील कुंभे गावात आलो. धब्धबा असा देखणा की तो पाहिला नाही तर या भटकतीत निश्चितच न्यून राहील.

उत्तरेला आता सह्याद्रीने आपले बाहू थेट सुधागडापर्यंत पसरले होते त्याच्यावरती घाटावर तो ठेंगणासा धनगड आणि मध्येच तेलबैल्याचा वैचित्र्यपूर्ण ' दुर्ग डोंगर ' आणि उगवतीकडे कुंभे खोरे असे काही वेडेवाकडे पसरले होते की त्यातली रडतोंड खिंड शोधणे फार अवघड होते.

दोन अडीच तास चाललो तेव्हा कुठे आम्ही त्या खिंडीत पोचलो. कोकणदिवा सायंकिरणे झेलीत दूरवर उभे होते.

सह्यधारेवरची नागमोडी सुरु झाली, झाडीने भरलेल्या असंख्या घळी, ओघळ अन् दऱ्या थंड आणि शांत होत चालल्या होत्या.

दूरवरच्या कोलाहालानेच केवळ ' घोल ' गाव सापडले. झाडीने अन् डोंगराने घोल वेढून टाकले आहे. घोलाचे खोरे पश्चिमेला उलगडते अन काळ खोऱ्यात कोकणात ओघळते.

गोविंदा पोळेकर रानातून परतेपर्यंत घरधनीणीने तत्परतेने चूल पेटवून दिली होती. थकलेले पाय शेक घेऊन विसावत होते.

पक्षीभाटाचे कूजन ऐकतच घोल सोडले पाऊण तासातच गार-जाईवाडी आली. बहिरू पोळेकर ह्या काटक म्हाताऱ्याला बरोबर घेतले. वाडीच्या पुढच्या खिंडीत कोकणदिवा समोर ठाकला होता. त्याला लगटूनच कावल्या घाट कोकणात उतरतो. काळकाई देवी-पासून आम्ही वाट सोडून दिली.

तीव्र चढण अन् कारवी याचे नेहमीच नाते असते. कारवी तोडली तेव्हा कुठे वाट झाली. दोन कातळटप्पे चढून माथ्याखाली आलो. खाब असलेली एक खोदीव गुहा. पलीकडेच कड्यात चार टाकी.

पाण्यात माथ्यावरच्या वानराची प्रतिबिंबे पडली होती. ' दमा बाईच, आम्हीपण तुमच्या इथे येतोच ' असे डोळे मिचकावीत त्याना म्हणालो तो ती कड्यावरून पळालीच.

टाक्यापासून माथा म्हणजे ५-६ मीटर प्रस्तरारोहण. अवघड व सोपे याच्या सीमारेषेवरचे.

माथ्यावर आलो तो समोरच काळ खोऱ्यापलीकडे दुर्गराज रायगडाने आमचे अभिवादन स्विकारले. गडावरील शिवछत्रपतींची समाधी, जगदीश्वर, बाजारपेठ या वास्तू व्यवस्थित दिसतात. त्यामागे दूरवर प्रतापगड, मकरंदगड, अस्पष्टसा कांगोरी आणि कोकणदिव्याच्या रांगेतच पूर्वेला लिंगाण्याचा भेदी सुळका.

कोकणदिव्यावरील गुहाची खोदाई म्हणजे पांडवकर्तृत्व असे स्थानीय लोक नेहमीप्रमाणे मानतात. पांडवानी माथ्यावर मंडप

बाधायला घेतला पण कोंबडा आरवल्यामुळे ते काम अर्धवट सोडून निघून गेले वगैरे कथा. मात्र माथ्यावर जणू स्तंभ रोवण्यासाठी खोदलेली अशी बिळे आढळतात खरी.

उन्हे वर आली तेव्हा आम्ही कोकणदिवा उतरून गारजाईवाडीत आलो होतो. इथून कावल्या घाटाने कोकणात सादोशीस उतरून रायगडामार्गे महाडला जाता येते. पण पानशेतच्या खोऱ्यातून परतण्यासाठी वाडीच्या पूर्वेच्या डोंगरावर आम्ही पाऊल टाकले. अनंत सृष्टीची विविध रूपे पुन्हा दृष्टीस आली. राजगड–तोरणा ह्या सुप्रसिद्ध दुर्गांनी आपले माथे आमच्या समोर उचावले होते.

आब्याची वाडीवरून 'टेक पवळे' गाव गाठले तेव्हा काल-दर्शकात दु. २ वाजले होते.

पानशेतचा जलाशय पवळ्याच्या उंबऱ्यास भिडला आहे. 'होडी कुठून सुटते? पानशेताला जायचय.'

'ती तर कधीच बंद हाय, दोन-चार मयन झाले! पायानं जावा. सात-आठ तासान जावाल'

आम्ही मटकन खालीच बसलो. धरणासमोरच्या भागातील संसार ज्यांनी आपल्या जमिनी बुडवून फुलवले त्याचे खरे हाल हे त्या दिवशी कळले.

गोंडखल, करोडी गावावरून आंबी-मोसे खोरी विभागणाऱ्या डोंगरधारेवरून सात-आठ तास चालतोय. पानशेतचे लुकलुकते दिवे अजूनही दूर दिसत होते. पहिल्या दिशीचे चंद्रबिंब तिन्ही दिवस साथ देऊन पुन्हा आकाशात डोकावत होते.


# मेरुलिंग आणि धावडशी

एके काळच्या स्फूर्तिदायी, गौरवशाली मराठी सत्तेची राजधानी असलेले सातारा आजही एक प्रमुख व्यापारी पेठ व ऐतिहासिक शहर म्हणून कीर्तिशिखरावर आरूढ आहे. याच साताऱ्यात शिव-छत्रपतींचे राजघराणे अजूनही नांदत आहे.


सातारा शहराच्या परिसरात माहुली, सज्जनगड, जरंडा, यवतेश्वर यासारखी तीर्थक्षेत्रे, अजिमतारा ऊर्फ किल्ले सातारा यासारखे धारातीर्थ, तर कास, तापोळे, महाबळेश्वरसारखी निसर्गरम्य स्थानेही आहेत, पण याच साताऱ्यापासून सुमारे नऊ-दहा किलोमीटर अंतरावर मेरुलिंगासारखे डोंगरावरील रमणीय शिवस्थान आणि धावडशीसारखे उत्तम शिल्पकलाकृतींनी नटलेले मंदिर असलेले स्थान आहे हे आपल्याकडील कित्येकांना माहीतही नसेल.

पुणे-सातारा रस्त्यावरील पाचवड गावानंतर अनेवाडी लागते. इथून पश्चिमेस आठ-नऊ किलोमीटर अंतरावर मेरुलिंगाचा उंच डोंगर पसरलेला आहे. अनेवाडीपासूनच हा डोंगर आपल्या दृष्टि-पथात येतो आणि आपले लक्ष वेधून घेतो. याच्या उत्तर पायथ्याशी महिगाव ( पुण्याहून १०० किलोमीटर ) व दक्षिण पायथ्याशी धावडशी गाव आहे.

पुण्याहून मेरुलिंगास जावयाचे झाल्यास पुणे–महिगाव गाडीने



मेरुलिंग शिवमंदिर



धावडशी – भार्गवराम व ब्रह्मेंद्र स्वामी समाधी मंदिर

( ही गाडी चालू नसल्यास अनेवाडीपासून चालत ) महिगावास जावे. अनेवाडीपासून महिगावला जाताना आपण एका रम्य प्रदेशात शिरल्याचा आजूबाजूची झाडी, शेते प्रत्यय देतात. महिगावातून बाहेर पडताच डोंगरावरील मंदिर स्पष्ट दिसू लागते. डोंगराच्या सोंडेवरून चढण्यास प्रारंभ करताच खड्या चढतीमुळे काही काळातच घामाच्या धारा लागतात. श्रीशिव हे मोठे कडक दैवत मानले जाते. तेव्हा तसाच कडक त्रासही डोंगर चढताना झाला तर नवल नाही, पण गार वारा आणि खाली दृष्टी टाकली असता दिसणारी गर्द झाडी आणि छोट्या छोट्या टुमदार गावांनी नटलेला प्रदेश पाहताच श्रमपरिहार होतो. थोड्याच वेळात एका उभ्या खडकाची तटबंदी लागते. एखाद्या दुर्गाला जशी बांधीव तटबंदी असते तशी या डोंगराला सर्व बाजूंनी खडकाची तटबदी आहे. या खडकात शिडीसारख्या पायऱ्या खोदल्या आहेत. शिडीवरून डगमगत आपण वर माचीत येतो आणि मंदिर आणखी जवळ येते. यानतर आवे करवदे यासारख्या वनश्रीतून फारसे श्रम न होता, महिगावाहून निघाल्यावर सुमारे दीड-दोन तासात आपण मेरूलिंगाच्या चरणी येऊन ठेपतो.

सर्वत्र विखुरलेली सोनचाफ्याची झाडे आणि तीर्थकुंडातील मधुर पाणी नव्हे अमृतच ! यामुळे मन कसे हलके-फुलके होऊन जाते. क्षणभर जगाचा विसर पडतो. चाफ्याचा सुगध भरून घेत दोन भव्य बुरूज असलेल्या प्रवेशद्वारातून आपण मंदिराच्या प्राकारात प्रवेश करतो.

प्राकारात काही काळ स्थिरावताना मुख्य मंदिराभोवतीचा तो भक्कम कोट व बुरूज पाहून मन थक्क होते. डोळ्यासमोर तो योगी तरळू लागतो. ज्याने या स्थानी एकातात तपश्चर्या केली व हे मदिर बाधले.

श्रीमंत शाहू छत्रपतींचे गुरू श्रीब्रह्मेंद्रस्वामी यांनी सुमारे

एक लाख रुपये खर्चून हे मंदिर बांधले. भोवताली कोट बांधला. सुरेख नक्षीदार कामे असलेली प्रवेशद्वारे बांधली. या कोटाबाहेरच तीर्थकुंडे आहेत. काळ्याशार कातळात ही कुंडे खोदलेली असल्या-मुळे पाणी अतिशय थंडगार आहे. सिंहगडावरील देवटाक्याची आठवण करून देणारे हे पाणी बारमाही व भरपूर असून गोमुखातून सतत धार लागलेली असते.

नरफदेव उर्फ मेरूलिंग मंदिराचे तीन भाग आहेत. गाभाऱ्यात पिंडी असून त्यावर नागराज व पाठीमागे शिव-पार्वती यांचे सुबक मुखवटे आहेत. याच शिवलिंगास चिमाजी अप्पा पेशव्यांनी बारा मण तूप, चार तोळे केशर वापरून अभिषेक करवून घेतल्याचा उल्लेख आहे. त्यावेळी नऊ मण शोभेची दारूही खर्च झाली आहे. गाभाऱ्याच्या दाराच्या दोहोंबाजूस हत्ती असून दारावरती मध्यभागी कमळात ब्रह्मदेव ध्यानस्थ बसलेले दाखविले आहेत. गाभाऱ्याबाहेरील मंडपात सुंदर कलाकुसर केलेले लाकडी खांब आहेत तर अगदी बाहेरील बाह्य सभामंडपात द्वारपालाच्या जागी एका बाजूस श्रीहनुमान व एकाबाजूस गरुडावरील विष्णू दाखविले आहेत.

अशारीतीने हे एक नितांत रमणीय व पवित्र स्थान आहे. पण या स्थानाची व मंदिराची घनघोर उपेक्षा होत आहे असे दुर्दैवाने म्हणावे लागते. मंदिर संपूर्णपणे काळवंडून गेले असून, पडझडहि अनेक ठिकाणी झालेली आढळते. पुणे—सातारा हमरस्त्यापासून अतिशय जवळ असूनहि हे स्थान उपेक्षित आहे हे पाहून आश्चर्य वाटते.

ब्रह्मेंद्रस्वामींसारख्या योगी पुरुषाने मात्र येथील वनश्री व एकांत पाहून ईश चिंतनासाठी योग्य जागा निवडल्याची खात्री पटते. मंदिरा-सभोवती जंगम व धनगर मिळून सुमारे ७०—८० वस्ती असून चौथीपर्यंत एक शाळाही बलभीम मंदिरात आहे

मेरूलिंगमंदिराच्या मागेच सर्व बाजूनी ताठ खडक असलेले पठार आहे. याचे स्थानिक नाव बडा असे आहे. पाचगणीच्या टेबल लॅंड-प्रमाणेच या भागावरती सर्वत्र सपाटी आहे.

दूरवर असलेले सातारा शहर व सातारगड याचे दृश्य एका बाजूला दिसते तर एका बाजूला वेण्णा नदी, मेढे व त्यामागे थेट सह्याद्रीच्या मुख्य रांगेपर्यंतचा प्रदेश डोळ्यात भरतो. एका बाजूला यवतेश्वर व सज्जनगड तर दुसऱ्या बाजूला वैराटगड, चदन, वंदन हे दुर्ग व जरडा डोंगर यात आपण हरवून जातो. येथेच एक छोटीशी दीपमाळही आढळते, येथे पूर्वी दिवा लावीत असत. असे हे रमणीय निसर्ग व पावित्र्य याचा संगम असलेले स्थान प्रत्येकाने पाहिलेच पाहिजे.

मेरूलिंगाच्या दक्षिण पायथ्याशी धावडशी हे सुमारे हजार एक लोकवस्तीचे गाव वसलेले आहे. मेरूलिंग उतरतानाच धावडशीतील भार्गवराम मंदिराचा भव्य कळस आपणास आकर्षून घेतो. मेरूलिंग मंदिरापासून निघाल्यावर सुमारे दीड-दोन तासात आपण धावडशीस येऊन पोचतो.

भार्गवराम मंदिराच्या कळसाची भव्यता, त्यावरील शिल्पकला यानी मन मोहून जाते. गाभाऱ्यातील भार्गवरामाची मूर्ती व त्याच्या चरणी असलेली ब्रह्मेंद्रस्वामींची समाधि पाहून ब्रह्मेंद्रस्वामींचा जीवन-पट आपल्यासमोर उभा राहतो.

श्री ब्रह्मेंद्रस्वामींचा जन्म स १५४९ मध्ये वऱ्हाडातील गणपतीचे राजुरी नजीकच्या दुधेवाडीस झाला. लहानपणापासून ते गणेशभक्त होते. पुढे काशीस ज्ञानेंद्रसरस्वतीनायक यानी त्याना परमहंस दीक्षा दिली आणि ब्रह्मेंद्रस्वामी हे नामाभिधान त्याना प्राप्त झाले. तीर्थयात्रा केल्यावर कोकणात धामणी सोनगावच्या रानातील गुफेत ते गुप्तपणे राहू लागले आणि १६९८ मध्ये ते परशुरामी प्रगट झाले. बाळाजी

विश्वनाथ-त्याचे भक्त झालेच, पण अजिम्याचा सिद्दीही त्याना मानू लागला. परशुराम क्षेत्राचा जीर्णोद्धार केल्यावर सिद्दीकडूनच स्वामींस त्रास झाल्याने साताराप्रांती मेरूलिंगास येऊन राहू लागले.

दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या त्याच्या तेजाचा व वैराग्याचा प्रभाव पडून शाहू महाराजानी त्याना गुरुपदी मानले. तसेच सेनाधुरंधर पहिले बाजीराव, प्रतिनिधी, शिंदे, होळकर, दाभाडे, पवार, आंग्रे, जाधव यासारखे सरदार त्यांचे भक्त बनले. स्वामींनीही वेळोवेळी या सर्वांना मार्गदर्शन व सहाय्य केले. धावडशी, वीरमाडे व अनेवाडी ही गावे इनाम मिळाल्यावर स्वामी धावडशीस स्थायिक झाले धावड-शीस ज्ञान आणि वैराग्य याचे वैभव प्राप्त झाले. स्वामींनी अलौकीक कार्य करून अनेक मंदिरे, वाडे, तळी बाधून लोकोपयोगी कामे केली. मेरूलिंग, भुलेश्वर यासारखी मंदिरे व कोरेगावाजवळचे त्रिपुरीचे तळे ही तर प्रसिद्ध आहेच. खबाटकी घाटासाठी त्यानी ४५००० रु. खर्च केल्याचा उल्लेख आहे. धावडशीसहि त्यानी अडीच लाखाच्यावर रुपये खर्चून भार्गवराम मंदिर, गणेश खिंडीत गणपती तसेच गावाच्या चार बाजूस मंदिरे, मठ, वाडे तळी बांधली. स्वामींचे कर्तृत्व तरुण मनाला कार्यप्रवृत्त करील यात संदेह वाटत नाही.

पण सूर्याला कधीतरी ग्रहण लागतेच. स्वामींचे आवडते शिष्य पहिले बाजीराव निधन पावल्यावर इ. स. १७४५ मध्ये वीरमाडे या कृष्णाकाठच्या गावी स्वामीही त्याच्या ध्यानस्थ बसण्याच्या जागी आपली चिरंतन स्मृती मागे ठेवून पंचत्वात विलीन झाले. मराठी साम्राज्याचे मार्गदर्शक व गुरू गेले. स्वत शाहू छत्रपतींनी स्वामींना पालखीतून ( ही पालखी अजून पाहावयास मिळते ) धावडशीस आणले. भार्गव रामाच्या चरणीच त्याच्यावर अंत्यसंस्कार करून त्यावर समाधि-मंदिर बाधले. हेच ते आद्य भार्गवराम मंदिर. सुमारे १,१९,३५३ रुपये

खर्च होऊन हे मंदिर इ. स. १७५८ मध्ये पूर्ण झाले.

उत्तराभिमुखी मंदिराच्या दोन्ही शिखरांवर देवतांच्या उत्तमोत्तम मूर्ती आहेत आणि घेरावरील दगडातून दशावतार कोरलेले आहेत. गाभाऱ्यापुढे सभामंडप असून शेजारीच स्वामींनी बांधलेले एक तळे अतिशय पाहण्यासारखे आहे. या तळ्याचे चार भाग असून एक पिण्यासाठी, एक धुण्यासाठी, एक पोहण्यासाठी व एक जनावरासाठी वापरतात.

दर वर्षी श्रावण शु. नवमीस येथे मोठा उत्सव होतो. या मंदिराचा सध्या जीर्णोद्धार चालला असून सुमारे ८०००० रुपये खर्च येणार आहे. एका शिखरावरचे बरेचसे काम पुरे झाले असून स्वामींचा पुतळा बसविण्याची योजकता यामुळे मनास समाधान वाटते. मंदिराचे पुजारी श्री. शंकरराव आचार्य मोठ्या आस्थेने मंदिर व भोवतालच्या वास्तू दाखवितात.


असे हे धावडशीचे ब्रह्मेंद्रस्वामींचे समाधीस्थान व भार्गवरामाचे अप्रतिम शिल्पमंदिर आणि त्यामागीलच मेरूलिंगासारखे नितांत रमणीय शिवस्थान याकडे आस्थापूर्वक लक्ष दिले पाहिजे, असेच शेवटी सुचवावेसे वाटते. मेरूलिंगला तर पर्यटनकेंद्रही काढता येईल.

# अरण्यदुर्गांच्या माथ्यावर

महाबळेश्वर पर्वतात उगम पावून कऱ्हाडजवळ कृष्णेत समर्पित होणाऱ्या कोयना नदीने एक देखणे खोरे निर्मिले आहे. सह्याद्रीत उगम पावून दक्षिणवाहिनी अशी ही एकमेव नदी. या दक्षिणायनात सह्याद्री व घेरादातेगड रांग यामधील अरुंद खोऱ्यातून पाण्याचे महा-लोट घेऊन ही वाहायची. हेळवाकजवळ जेव्हा धरण उभारले गेले तेव्हा घनदाट अरण्याने भरलेले हे खोरे खोल निळ्या पाण्याने भारले गेले.

कोयनेच्या तिरावर थेट कऱ्हाडपर्यंत अनेक ऐतिहासिक स्थळे विखुरली आहेत क्षेत्र महाबळेश्वर, प्रतापगड, मकरदगड, महिमंडण-गड, व्याघ्रगड, जगली जयगड, दातेगड, अन वसंतगड. समर्थ रामदासाच्या संतवाणीची माधुरी ज्या स्थळानी अनुभवली अशी हेळवाकची रामघळ व चाफळ ही याच कोयनेच्या तीरावर आणि मग दख्खनच्या कातळाना चिरीत जाणारा तो भूमीहादरा ! त्याचेही केंद्र इथेच. या हादऱ्यातून कोयना तीराची माणसे सावरली पण आधीच ढासळलेल्या ऐतिहासिक वास्तू जास्तच उद्ध्वस्त झाल्या. सह्याद्रीवर बांधलेले तट बुरूज धडाक्यात कड्याच्या उदरात गेले. पण तरीही या चिऱ्याचा मागोवा घेत वने तुडविताना एक अपूर्व समाधान लाभते.

कोयनातटाकीच्या चार दुर्गांचे दर्शन घेण्यासाठी आम्ही एके सकाळी नेरळ गोंडजवळ गाडीतून उतरलो. कऱ्हाड–चिपळूण या पूर्व-पश्चिम राजमार्गावरील हे एक कोयनाकाठचे छोटेसे गाव.




पुलामुळे पावले न भिजता पलीकडे गेली. उसाच्या मळ्यामागे मोरगिरी अथवा गुणवतगड आपला कातळमाथा उंचावून उभा होता गडाच्या अंगावर आम्ही आलो तेव्हा मोरगिरी पेठेचा रस्ता दूर गेला होता.

शिवापूर व संभापूर या दोन पेठा खाली नदीतीरी पण तिकडे न वळता वरच्यावरतीच आम्ही मोरगिरी वाडीत पोचलो. मोरगिरीत एक सिद्धेश्वराचे रामाचे देऊळ आहे. शिवाय जुने बांधीव तळे पण आहे. बहिरोबाच्या देवळासमोरची तोफ तर आपल्या मूळ स्थानाकडे तोंड वर करून पहुडली होती. गुणवंत गडची चढण फारशी नव्हतीच. आठ-नऊ मीटर प्रस्तरमाथा फोडून वाट माथ्यावर नेली

आहे. माथा चिंचोळा पण लांबच लांब आहे. पडकी जोती व एक बुजलेले टाके याशिवाय वर काहीही नाही. पूर्व टोकाचा कडा प्रस्तरा-रोहणासाठी उत्तम आहे.

माथ्यावरून कऱ्हाड ते हेळवाकपर्यंतचे खोरे दृष्टिपथात येत होते. वसंतगड व दातेगड डोंगर रांगातून उठावले होते. मरळीचा बाळासाहेब देसाई साखर कारखाना धूर ओकीत होता. त्याभोवतीची उसाची शेते खोरे संपन्न करीत होती

पश्चिमेला भैरवगडापासून रांग भेटायला आली होती. त्यावरची रेशमी वनश्री खुणावत होती.

गडतळातील वाडीत गोपाळराव साने याच्याकडून गडाची माहिती ऐकून भैरवगडाकडे निघालो. कोकिसऱ्यातून बाहेर पडलो तो खडी चढणच. पण वनश्री आणि शुभ्रधवल धबधब्याने ती फारशी रगेल भासली नाही

दुपारचे दोन! कोकिसऱ्याचा अवघा धनगरवाडा आमच्या भोवती गोळा झाला.

' बरामगडाला आता पोचायचे न्हाई तू. रानातच रात व्हईल. हे लांब अंतर. आमापैकी कोन नाय यायचं! ' सर्वच जण असे म्हटले तरी एका म्हाताऱ्याने पश्चिमेला हात करून वाट दाखवली. अन् आम्हीही ती चांगली घट्ट पकडली कारण नंतर चार तासात वस्ती भेटणार नव्हती. अरण्य आणि अरण्य!

विस्तृत रांगमाथ्यावर उंचावल्या जागेवरूनच केवळ मोहना व कोयना खोऱ्याचे दर्शन दिलासा द्यायचे. इतरवेळी कमरेच्या सुऱ्यावर हात चाचपण्याशिवाय गत्यंतर नव्हते.

पाटणहून मळ्याला शिकारीला जाण्यासाठी इंग्रजांनी केलेला मार्ग आता गवतात दडला आहे. चार तासाचा निर्जन एकांत, दूरवरच्या धनगरवाड्याने दूर केला. नागवणटेकचा तो वाडा मागे गेला तो

जगलाच्या तोंडावर एक काळा ठुण्या टकाटका बघू लागला. आमचे थकलेले पाय आपोआप पुढे धावले.

संध्याकाळची किरणे हिरव्या मगल पट्टयाला गहिरी बनवीत होती तेव्हा मोरणेच्या उगमाकडील उतारावर वसलेला आटोळीचा धनगर वाडा साजरा होऊन पुढे आला.

" आमच्या वाड्यावर खुशाल व्हावा अन् उद्याचाला गडी सोबतीला घेऊन मग बैरामगडाला जावा. गवे अन् डुकरे भारी हायत. "

पडत्या फळाची आज्ञा घेऊन पिट्टू ओसरीवर टाकले. रामभाऊ शेळक्याचे आतिथ्य काळजाला अजून भिडून आहे

अजनीपुताला मोह पाडणारा लाल गोळा पूर्व क्षितिजावर उगवला आणि मोरणा खोऱ्यातील झाडाचे शेंडे लाल होऊन गेले. मळ्याच्या वाटेवर आमची पावले सपासप पडू लागली. शेताशेतातून बाधलेली. मोकळी डबडी वाऱ्याबरोबर आवाज देत होती. अर्थात रानडुकरे दिवसा तरी बाहेर येण्याची मुळीच शक्यता नव्हती.

मैलोन मैल अरण्याने भरलेल्या महाकाय रांगा न्याहाळत वन-कुहरातून वाहणाऱ्या वारणा नदीकाठचे ' मळे ' गाव यायला तब्बल तीन तास गेले. सातारा रत्नागिरी सीमेवरील हे घाटावरचे गाव.

यापुढची वस्ती पाथरपुज गावची. आणि नतर डोळे ताणावे तो जंगलाखेरीज काहीच दिवस नव्हते. वाट मात्र चागली रुद त्यामुळे सह्यधारेवर पोचायला तासभरच लागला. जवळजवळ दहा तासाच्या वाटचालीनतर भैरवगड समोर उभा राहिला होता.

दरीच्या कडेवर भैरोबाचे मोठे देऊळ बाधलेले आहे. सावरशिंगे देवळाच्या भिंती सजवीत होती. अरण्याचा राजा भैरोबा त्यात डोळे वटारून बसला होता.

देवळाशेजारून एक वाट रत्नागिरी जिल्ह्यांतील दुर्गवाडीत

उतरते. चिपळूणहून राज्य परिवहनाच्या गाडीने या वाडीस पोचता येते.

देवळापाशी उभारलो तो समोर भैरवगड सह्याद्रीतून फुटला होता. त्यामधील खिंडीतून वाट होती अन् ती सापडण्यास काहीच प्रयास पडले नाहीत.

तीन द्वारानी ( नुसत्या खुणाच ) दुर्गसरक्षित केला आहे. अर्थात फक्त पूर्व बाजूने. इतर सर्व बाजूंनी गड सरळ तुटलेला आहे. पश्चिम कड्यात एक पाण्याचे टाके आहे. पण गडमाथ्यावरील वास्तू व तोफा दाट गवतात लपल्या गेल्या आहेत. उघड्या आभाळात दक्षिणेला प्रचीतगड तर उत्तरेला जंगली जयगड व सह्याद्रीची रांग लोभस दिसत होती. गडाचे दुसरे नाव ' सारंगगड ! ' इतिहासात फारशी कामगिरी न केलेला हा दुर्ग १८१८ मध्ये कर्नल केपनला अलगद हाती मिळाला.

भैरवगडहून हेळवाकला जाणारी वाट वाटेतील वाघणे गाव भूकंपाने उठून गेल्यामुळे रानात दडली आहे. घनदाट जंगलाशी अक्षरश. दोन हात करीतच ती आता शोधावी लागते आणि अधारात दोघानीच चाचपडणे शहाणपणाचे ठरले नसते.

अर्थात पाथरपुजला परतून हेळवाकची मोकळी वाट धरली. तब्बल ५ तासाच्या भटकतीनतर हेळवाक आले. वाटेत कोळणे अन् वाघणे या मधील अरण्यवाट सुरेख यात शका नाही.

हेळवाकमधील शेंड्ये राम मदिरात थंडीपेक्षा जगली जयगडचे चित्रच झोपा चाळवत होते.

कोयनानगरहून नवजाची गाडी चांगलीच उशिरा होती पण जेव्हा ती शिवाजी सागराच्या किनाऱ्याने डोंगराला वळसे घेऊ लागली तेव्हा सागरसौंदर्याची चित्रपट्टी मोरपीस फिरवून गेली.

नवजा गाव अर्ध्यातासात आले.

नवजामध्ये जयवंत शेलार हा एकमेव महाविद्यालयीन युवक. कोयता कंबरेस लावून तो आमच्या धाडसाला साथ द्यायला लगेच तयार झाला.

नवजाच्या वायव्येस सुमारे ८ कि. मी. अंतरावर असलेल्या जंगली जयगडकडे आता आमची पावले वळली नवजा जलमापन मनोरा दूर गेला तेव्हा सागराच्या एका फाट्याला वळसा घालून आम्ही सह्यमाथा चढू लागलो. आमच्या कित्येक मीटर खालून पोफळी विद्युत केंद्राकडे लक्षावधी क्युसेक्स पाणी वाहते आहे ही कल्पनाच थरारक होती.

घोडेवेताच्या पाण्याजवळूनच पुढे गेलो. एक वाट डिचोली गावाकडे जात होती. ती सोडून जंगलात घुसलो.

रानरेड्याच्या अस्थी इतस्तत: पडल्या आहेत. गेळाच्या बुंध्यावर अस्वलीच्या नखाचे ओरबाडणे दिसतेय. पलीकडे शिकारी खड्डा आ वासून बघतोय, जंगली जयगडची पहिली चुणूकच अशी भेदक होती. लोद, ऐन, अंजनी, गेळ, चिंचोरी, वेत व बांबू यांनी गडाच्या वाटेवर अभेद्य तट उभारला आहे. त्यामुळे रानरेड्याच्या धडकीची अपेक्षा करीत दिशाहीन वाटेवर भिरभिरत तासाभराने कशी बशी सह्यधार मिळाली.

कारवीच्या बुध्यात पकडून कड्यावरून डोकावलो. अडीचशे मीटर खाली पोफळी विद्युत केंद्र होते व त्याचे रक्षण करीत पलीकडे जंगली जयगड सह्याद्रीतून पुढे सरसावला होता.

कारवी अन् बाबूच्या गर्दीतून गडात पोचलो तेव्हा दुपारचा एक वाजला होता. जाम्या दगडातील एक दीपमाळ सोडली तर गड संपूर्ण बेवसाऊ.

तीन बाजूनी सरळ पाचशे मीटर कोसळलेला गड सह्याद्रीतून ५–६ शे मीटर पुढे डोकावला असला तरी सह्यधारेवरून पूर्णपणे

मान्यात आहे. पण या धारेवर पोचणेच दाट वनाने फार अडचणीचे अन् असे अरण्य हेच याचे सामर्थ्य.

गडमाथा अगदी चिंचोळा व वास्तूही मोजक्याच. भूकपाने पश्चिम टोकाला भेगा पडल्या आहेत. माथ्यावर पाणी आढळत नाही. पण कड्याच्या उत्तर पोटात टाकी असावीत तिथे पोचण्याचा मार्ग मात्र उद्ध्वस्त झाला आहे.

शिवकालापूर्वी हा गड प्रचलीत नसावा. कुंभार्ली अथवा पोफळी घाटावर नजर ठेवणे हेच इथल्या गडकऱ्याचे काम. पतप्रतिनिधीं-कडील ताई तेलिणीच्या ताब्यातील हा गड बापू गोखल्यानी सहज घेतला होता.

दुर्ग माथ्यावरून व्याघ्रगड, महीमंडणगड, पर्वत, मकरंदगडाची जुळी शिखरे सह्यरांगेत उत्तरेला दिसतात. त्याच्या डावीकडे रसाळ सुमार, महीपत ही दुर्गत्रयी. दक्षिणेला पोफळी घाटापलीकडे भैरव-गड तर तळात वैतरणा नदीचा धवल पट्टा थेट चिपळूणपर्यंत नजर वाहत नेतो. गडाजवळ कुठेही कोकणात उतरण्याजोगा मार्ग नाही. उत्तरेला ८ कि. मी. अंतरावर डिचोलीहून नादिवसेला एक घाटमार्ग आहे.

नवजात साय. ५ ची गाडी हेळवाकला परत घेऊन गेली. राम-घळीचा डोंगर, पलीकडच्या मेढेघर गावामागे झाडीचा मुकुट चढवून उभा होता. रामघळीत धबधब्याच्या संगीतात रात्र घालवण्याच्या कल्पनेने दिलीप निंबाळकरला झपाटले. अन् मग पिट्टू कसून चढण सुरू केली. तासाभरात कोंढावळ्याचा धनगरवाडा आला.

पूर्वेला पसरत गेलेले कोयना खोरे गुणवंत अन दातेगड अंगी लेवून उभे होते. ते हळूच धूसर होत लुप्त झाले. रात्रीचा पहारा तोडून रामघळीत पोचणे शक्य नव्हते व कोंडबा शेळक्याच्या वाड्याचे आतिथ्याने आम्ही तिथेच थांबलो.

रामघळीत पोचलो तेव्हा सूर्यकिरणे नुकतीच घळीत प्रवेश करीत होती. घळीवरून बारमाही पडणाऱ्या धबधब्याने इंद्रधनुष्याचे सप्तरंग उधळले होते. समर्थ रामदास या रम्यस्थानी शके १५९६ च्या आषाढात राहिले होते.

रामघळ राम ओढ्याच्या वहाळात पूर्वेस तोंड करून खोदलेली आहे. गोलाकार दरीतून डोकावणारी वनश्री इथून सुरेख दिसते.

हेळवाकला धावतच उतरलो. कऱ्हाड गाडी जणू आमच्यासाठीच उभी होती. येराड हा पाटणच्या अलीकडचा मोठा थांबा आहे. इथले देवस्थान प्रसिद्ध आहे. मात्र गेले तीन दिवस सतत हूल दाखविणारा दातेगड इथून चटकन नजरेत भरला. गावठाणातून लगेचच चढ लागला. मधल्या पठारावर धापा टाकीत पोचलो तेव्हा टोळेवाडीचे किसान ज्वारीच्या कणसाआडून डोकावत होते.

या सपाट पठाराच्या मध्यभागी २०–२५ मीटर उंचीच्या दातेरी जांभ्या दगडाला तटबद्ध करून दातेगड बांधला आहे. पश्चिम बाजूने कातळात पायऱ्या खोदून प्रवेशद्वार केले आहे. दारातच गणपती व हनुमंत यांच्या अतिभव्य मूर्ती आहेत. गडाच्या मध्यभागी असलेली एक विहीर वैशिष्ट्यपूर्ण आहे. सुमारे २५–३० मीटर खोल चौकोनी हिची खोदाई आहे. व तळात पोचण्यासाठी ८४ पायऱ्या आहेत. उतरण्यासाठी जास्त उंचीच्या तर चढण्यासाठी कमी उंचीच्या पायऱ्या अशी या पायऱ्यांची विभागणी आहे.

विहिरीतील पाणी सध्या पिण्यालायक नाही. तळाशी एका कोनाड्यात महादेवाची पिंड आहे. विहिरीची खोदाई शिवपूर्वकालीन निश्चितच आहे.

महाबळेश्वरपासून सह्याद्रीला समांतर धावणाऱ्या उत्तर-दक्षिण डोंगर रांगेचे हा गड शेवटचे टोक. पाटणजवळील हे सर्वांत उंच स्थान.

शिवछत्रपतींनी गडाचे नामकरण सुंदरगड केले होते.

चार दिवसात पाटण तालुक्यातील चार अरण्यदुर्गांचे लोभस दर्शन घेतले. कितीतरी सुगंधी स्मरणे मनात राहिली होती. गिरी-विहारातला थरार नसानसातून सळसळत होता.

त्यामुळेच की काय टोळेवाडीच्या पुढील पाटणच्या उतरणीवर धावत उतरणारे दोघे जण पाटणकरांच्या अजूनही लक्षात असतील.

# मुरूड—जंजिरा

इ. स. १६६९ चा मे. मराठ्याची मायभूमी आणि कोकणचा खवा असलेला, सावित्री व कुंडलिका या नद्यांमधील व सह्याद्रीच्या कड्यापलीकडे असलेला एक प्रदेश अजूनहि शृंखलाबद्ध होता. सिद्दीच्या जुलमी राजवटीमुळे प्रजा त्रस्त झाली होती आणि त्यावेळी शिवाजीमहाराजाच्या समशेरीचे एक टोक कोकणाकडे रोखले गेले. क्षणार्धात दंडा राजपुरी सिद्दीच्या जुलमी मगरमिठीतून सुटली. समोरील पाणकोटावर महाराजांचे आरमार धडकले. किल्ला कसला, मृत्यूचा पिंजराच तो! असा अवघड बाका किल्ला स्वराज्यात हवाच! पण महाराजांना अपयश आले. अशा रीतीने तीन वेळा शिवाजी-महाराज, एकदा संभाजीमहाराज नंतर पेशवे, प्रतिनिधी, आंग्रे यानाही ह्या पिंजऱ्याचे द्वार फोडता आले नाही येथे भलेभले थकले. किल्ला अभेद्य राहिला.

'किल्ले जंजिरे मेहरूब' अर्थात् मुरूडचा जंजिरा. चहू बाजूंनी उसळलेल्या सागराच्या फेसाळलेल्या लाटा अंगावर झेलत तो आजही ताठ उभा आहे. तटबंदी तर इतकी भक्कम आहे की सागराने कितीही तांडव केले तरी त्याचा चिरा निखळणार नाही.

## रम्य परिसर

पुण्याहून २१० किलोमीटर अंतरावर मुरूड वसलेले आहे.

मुरूडला जाताना वाटेत मुंबई-गोवे ह्या रस्त्यावर असलेल्या नागोठणे या गावी एक पुरातन पूल लागतो. हा पूल १५८० साली चौलचा काजी अल्लाउद्दीन याने तीन लाख रुपये खर्च करून बांधला. रुंदी अवघी पावणेदहा फूट असल्याने जेमतेम एक एस. टी. बस जाऊ शकते. पूल संपताच पुढे भिसे खिंड ओलांडून रोहे, साळाववरून गाडी मुरूडकडे धावू लागली की डाव्या बाजूस डोंगराची रांग आणि बाजूस रस्त्याला लागून असलेला सिंधुसागर पाहून मनाला आल्हाद मिळतो. अशा या निसर्गरम्यतेतच मुरूडच्या अलीकडे असलेल्या नांदगाव येथील श्रीगणेशाचे मंदिर आपले लक्ष वेधून घेते. मंदिर फारच सुरेख असून पालीचा बल्लाळेश्वर म्हणजे मूळचा नांदगावचा गणपती होय. थोड्याच वेळात नबाबाच्या राजवाड्या-वरून मुरूडमध्ये प्रवेश होतो. जवळच डोंगरावर एक दत्तमंदिर आहे. तेथून नारळीपोफळीच्या कुशीत बसलेले मुरूड व दूरवर पसरलेल्या अथांग सागरातील जंजिऱ्याचे व पद्मदुर्गाचे रमणीय दर्शन घडते.

मुरूडच्या थेट बंदरापर्यंत गाडीरस्ता आहे. एस. टी.तून होडी-तच पाय टाकायचा व होडीतून किल्ल्यात ! किनाऱ्यापासून सुमारे अर्धा मैलांवर दंडा-राजपुरीच्या खाडीत हा एका काळ्याकभिन्न खडकावर बुऱ्हाणखानाने १५७१ साली बांधला. लाटांवर नाचत जाणाऱ्या तराफ्यातून जाऊन महाद्वारात पाय ठेवताच मन थक्क होते. किती प्रचंड हे तट व बुरूज आणि बुरुजातून डोकावणाऱ्या आगओकया तोफा ! दरवाज्याच्या कमानीवरच एक चित्र कोरलेले आहे. एकट्या वाघाने सहा हत्तींना पकडले आहे. खरोखरच हा जलदुर्ग म्हणजे वाघच. किती हत्तींना त्याने पकडले होते कोणास ठाऊक ?




जंजिरा प्रवेशद्वारा
जवळील बुरुज



जंजिरा बुरुजावरील तोफ



विजय दुर्ग — दुर्गदर्शन पूर्वेकडून




कुणकेश्वर शिवमंदिर देवगड

अजस्त्र तोफा

महाद्वारांतून आत शिरताच समोर जहाजाचे नांगर दिसतात. तटावर फिरण्यास भरपूर लाबरुद जागा आहे. तट १५ मीटर उंचीचा असून त्यास एकोणीस बुरुज आहेत आणि या प्रत्येक बुरुजामध्ये २५ मीटर अंतर. प्रत्येक बुरूज म्हणजे मदोन्मत ऐरावतच. प्रत्येक बुरूज तोफांनी सज्ज आहे. निशाणाच्या बुरुजावरील तोफा अचंब्याने तोंडात बोटे घालण्याजोग्या प्रचंड आहेत. त्यांची नावे तरी किती भयंकर ! 'कलालबांगडी !' कीर्तिमुख असलेली 'चावरी' ! व 'लांडाकसाब !' एकाहून एक अशा या प्रचंड तोफा उडाल्यावर किल्ल्याला हादरा बसत असला पाहिजे. पश्चिमेच्या बाजूस दर्यादरवाजा आहे. येथे एक धक्का आहे. कितीही जोराची भरती येवो, पाणी धक्क्याच्या वर चढत नाही. या धक्क्याची बांधणी जाड लोखंडी पत्रे घालून मजबूत केली आहे. किल्ल्याच्या मध्यभागी बालेकिल्ला दिसतो. त्यावरील झाड दुरूनही दिसते.

किल्ल्यात दोन गोड्या पाण्याची तळी असून पडक्या इमारतींचे बरेच अवशेष आढळतात. येथे सुरुलखानाचा चौखणी वाडाही आढळून येतो. बालेकिल्ल्यावरती जाताच जंजिऱ्याच्या विस्ताराची कल्पना येते. एकोणीस बुरुजाचा हा जलदुर्ग अद्वितीय आहे हे झटकन् कळून येते. पूर्व दिशेला नजर टाकताच किनाऱ्यावर कांही पडके अवशेष दिसतात. या भागास खोकरी म्हणतात. हे अवशेष म्हणजे सिद्दीच्या कबरी होत. पश्चिमेला अथांग सागर दिसून येतो आणि वायव्येला दोन मैलांवर एक प्रती जंजिरा दिसून येतो. तो म्हणजे कासा बेटावरचा पद्मदुर्ग. जंजिऱ्याला काटशह देण्यासाठी मराठ्यांनी तो बांधला आणि तरीही जंजिरा अद्वितीय व अजिंक्यच राहिला.

# अंवती भोवती डोंगर झाडी



करकरीत उन्हाच्या झोतात, वळणे घेत गेलेला कोथळा गडचा गाडीरस्ता सुस्तावला होता. सागाच्या झाडाची मोठाली शुष्क पाने वाऱ्यावर तरगत रस्त्यावर हळूच उतरत होती. त्यावर पाऊल पडल्यावर येणारा कुरकुर आवाज शातता डहुळवत होता

सह्याद्रीने कोथळागडच्या सुळक्याला, बुद्धिबळातल्या प्याद्यासारखे पुढे ढकलले होते. डोंगरझाडीच्या कोकणप्रदेशातून उठावलेला तो सुळका पाहून सामना थोडा अवघडच वाटत होता. खरे म्हणजे कोथळागडला कोठिंवे, धामणी मार्गे नळीच्या वाटेने लवकर पोचता येते. पण १६०० वर्षांपूर्वी आविवलीगावी निर्मिलेल्या एका कर्तृत्वाला बघण्यासाठी आम्ही कोठिंब्याला येऊन तिकडे वळलो होतो.

आविवली हे कर्जत–मुरबाड मार्गावरील कशेळे गावापासून पूर्वेस सुमारे १० कि. मि. अतरावर वसलेले खेडे

समोर उत्तरेला तुगी व भीमाशकरच्या डोंगरामुळे गावाला आल्हाददायक पार्श्वभूमी लाभली होती. त्याच दिशेने शेताडातून उतरत गेलो ते चिल्हार नदीपाशी. नदीच्या पात्रातूनच वरती गेलो तो पाढऱ्या चाफ्याची झाडे एका किनाऱ्यातून डोकावत होती. तिथेच ' विहार ' होता.

नदीच्या एका सुरेख वाकणावर हा विहार खोदलेला आहे. १३ × १२ मीटर आकाराच्या ह्या विहाराच्या दर्शनी भागी चार स्तभ आहेत. यातील एकावर ' पाली ' भाषेतील शिलालेख पूर्वी होता. आता नाही. पार्श्वभागीच्या गुहातून कृष्ण, विष्णू–लक्ष्मी, विष्णू व हनुमान ह्या मूर्ती आहेत. त्याची प्रतिष्ठापना सुबक चौकोनी व १६ कोनी आसनावर केली आहे दुर्दैवाने गावानजिक असूनही दुर्लक्षिततेचा शाप ह्यानाही भोवला आहे

सह्य पहाडावर पडलेली तिरपी किरणे त्याचा कणन् कण उजळू

लागली आणि आम्ही परत आंबिवलीत आलो. कोथळागडच्या ' पेठ ' गावी जाण्यासाठी अर्धा सह्याद्री चढावा लागतो पण वाट राजमार्गच म्हणाना ! त्यामुळे तासभरातच पठारावर पोचलो.

गाव सरळ रेषेत जवळ दिसत असले तरी तिथे पोचायला एक खिंड पार करून मोठे वळण घ्यायला लागले होते.

पेठच्या वेशीवर ' पूछताछ ' अशी पाटी नसूनही नामदेव सावतानी आपले अगण आपणहूनच मोकळे केले.

रात्री चांदण्या आभाळातून गडमाथा डोकावत होता तो इतिहासकालात–१६८४ तली कथा. संभाजी महाराजाच्या आधिपत्यात ह्या गडावर मराठ्याच्या शस्त्रास्त्राचा साठा होता. दुर्गाचे सरक्षक महत्त्व जाणून अब्दुल कादर हा औरंगजेबाचा सरदार ससैन्य गडावर चालून गेला. गडाच्या कमरकोट द्वाराजवळ तो आला. गड सहजासहजी हार न जाणारा. पण फितुरीने भगदाड पडल्यावर काय होणार ? आपले लोक धान्य घेऊन परतले आहेत असे भासवून द्वार उघडले गेले व दुर्ग मुघलाच्या हातात पडला. औरंगजेबाने गडाचे नाव ' मिफ्ताहुलफतह ' ठेवले.

फटफटले ! थंडी फारशी नव्हतीच अर्ध्या तासात प्रवेशद्वारी पोचलो. भग्न तटबदीतून वर डोकावले तर ४० मीटर उचीचा कातळमाथा अधिक उरला होता.

माथ्याच्या पोटातील गुहा बघताच आमची पावले आपोआपच तिकडे वळली व काही काळ माथ्यावर जाण्याचे विसरूनच गेलो.

लेणे मंदिर ब्राह्मणी प्रकाराचे व ११–१२ व्या शतकातील आहे दर्शनी भागाचे शिल्पजडित स्तभ पार मोडकळले आहेत. त्यातूनही त्याचे सौंदर्य उठून दिसते. सभामडपाची दगडी फरशी अतिशय गुळगुळीत. सभामंडपाच्या पलीकडे दोन खोल्या आहेत. यांच्या द्वाराची चौकट सुरेख नक्षीने सुशोभित आहे. माथ्यावर गणेशपट्टीही

आहे. पण अतर्ग्रह मोकळे-गतवैभवाच्या स्मृती साठवून

जोगेश्वरी व बहिरोबा हे लेण्याबाहेरील गुहेचे देव. पण नतरच्या काळाचे. लेण्याशिवाय दुर्गात चार गुहा व उदड पाण्याची आठ टाकी आहेत. माथ्यासभोवती बारीक वाटेने प्रदक्षिणा घातली व माथ्याची वाट शोधू लागलो. तेवढ्यात दिलीप निंबाळकर लेण्याच्याही वरतून कड्यातून डोकावला.

त्याच्या मागे मीही गेलो. माथ्यावर जाण्यासाठी लेणेकारानी केवढी कल्पना दाखविली आहे. कातळमाथा पोखरून दोन मीटर रुंदीचा हा मार्ग तयार केला आहे.

पुढे मात्र एका वळणावर साप्रत गजाचा आधार दिला आहे. नतर भेटले ते प्रवेशद्वार. द्वारानजिक हत्ती व वाघशिल्पे वाट अडवतात.

छोट्याशा माथ्यावर एक तळे, हौद, पीराचे स्थान व इतर काही अवशेष आढळतात. पूर्व टोकाला 'मठ' म्हणतात. जिथे एक साधूची तप करण्याची जागा होती.

माथ्यावर आल्यावर जाणवली ती दुर्गाची एकमेवाद्वितीय जागा. पूर्वेच्या सह्य पहाडाचे संरक्षण अन् इतर बाजूंना सरळसोट कडे. थोरले बाजीराव पेशवे व चिमाजी आप्पा यानी स्वत येऊन दुर्ग न्याहाळावा अशी इच्छा उगाचच त्याच्या विश्वासाई सरदाराने केली नाही हे खरेच ! छत्रपती शाहूच्या कारकीर्दीत हा दुर्ग आगरे व पेशवे यांच्याकडे होता.

दुर्ग नजर ठेवून बसलेले घाटमार्ग-भीमाशकर, अधारी, नाखिंदा कौला, कोळंबी-दिनमणी सूर्य उजळवू लागला होता.

आमचे लक्ष वेधले ते सह्याद्रीतून उतरणाऱ्या कौल्याच्या धारेने ! हीच वाट आम्हाला मावळातल्या आद्रा खोऱ्यात नेणार होती या वाटेच्या शेजारीच ओहोळातील वनश्रीत दडला आहे

नाखिंदा घाट. घाटावरच्या कळसुबाई रांगेच्या टोकावरील खिंडाराने हे नाव त्याला बहाल केले आहे.

कोथळा गड व ही धार यात एक खिंड आहे. यात सरळ उतरणे फारसे सोपे नव्हते. तेव्हा आल्या मार्गानेच लागलो उतरताना पश्चिम दिशेस दिसणाऱ्या माथेरान रांगेतील प्रबळगड, पेब, चंदेरी, मलंगगड ह्याच्यावर दृष्टी फेकण्यास आम्ही अर्थातच विसरलो नाही कर्नाळ्याच्या सुळक्याने व भीमाशंकरजवळील सिद्धगडानेही दर्शन दिले.

दुर्गाच्या डावीकडील पदरातून खिंडीत चढून एक तासाने आम्ही कौल्याची धार चढू लागलो. सोपी चढण वर अरण्यात घेऊन गेली. मग विश्रांती न घेता रानातून सरळ पूर्वेकडे चालू लागलो. भीमाशंकरकडून येणारा जुना मार्गही डावीकडून-भेटला व एका मोकळवनात वादरखिंडीने दर्शन दिले.

मागे एकदा लोणावळ्याकडे जाताना या वाटेवर आमची पावले उमटली होतीच. ती स्मरणे व मळलेली वाट यामुळे दोन तासातच सावळ्याची घरकुले दिसू लागली.

आंद्रा तलावाचे निळेभोर पाणी समोर पसरले होते. त्यामागे असलेले शिरदेपठार व कोकणात घुसलेला ढाकगड आता आमचे पुढचे लक्ष्य होते. ढाकगडाशेजारचे शिवलिंगाकृती सुळके दिसताच त्याच्या पोटातील बहिरीची, दुर्गभ्रमक आप्पासाहेब दांडेकरानी करून दिलेली रसिली ओळख आठवणीत आली अर्थात त्यासाठी आम्हाला तब्बल १५ कि. मी. अंतर कापायचे होते.

सावळे हे गाव आंद्रा तलावाच्या शेवटी घाटमाथ्यावर आहे. तलावाचा एक फाटा या गावाजवळ तर दुसरा कुसुरच्या बाजूला या दोन्हींच्या बेचक्यात खांड गाव आहे.

सावळ्यातून बाहेर पडलो तर ऊन लाहालाहा झाले होते. गरम

झळा येत होत्या. एकुटा पाढराशुभ्र बगळा तलावावर भरारत होता. त्यानी पाण्यात झेप घेताच दिलीपचेही जलतरणपटुत्व उजळून आले. शरीर व मने दोन्ही थंड झाली व पुढचा मार्ग धरला.

पायदळीची सडकेची वाट समोरच्या डोंगररांगेला वळसा घालून खाड गावाजवळून कुसूरकडे जाते. तिकडे न वळता समोरच ओहोळाकडून रांगेवर आलो. सडकेला रामराम केला व तलावाकडेला उतरलो. एक बैलगाडी वाट जणू आमच्याच शोधात होती. समोर गर्द वनश्रीने भरलेली टेकडी होती. तलावाच्या मिरेने वाट वळली व जंगल संपले.

निसर्गाचा एक नेत्र मिटत होता तर डावीकडे त्यावर पसरलेल्या तलावावर दुसरा नेत्र उघडत होता. शात-संथ पाण्यात चंद्राचे प्रतिबिंब खुलले होते. किनाऱ्यावर छोटीशी गवताळ सपाटी होती. मोठ्या झाडावर पक्षीगण परतून चिवचिवाट करीत होते. रात्रीच्या मुक्कामाला त्या निःस्तब्ध निसर्गात याहून सुबक स्थल कोणते ? तलावातल्या बेटावरच्या झाडाचे तांबूस शेंडे गडप झाले. पाढऱ्या बगळ्याची एक माळ तिकडे तिकडे भिरारत गेली. आम्हाला निद्रिस्त करून !

हाताच्या अंतरावर खोदलेल्या सुऱ्याचा उपयोग पहाट फुलेपर्यंत काही करावा लागला नाही स्वच्छ ताज्या सकाळी बेंदवाडीतून शिरदेपठारावर जायला काहीच वेळ लागला नाही. चढणीवर पश्चिमेकडे दिसणारा प्रचड ढाकगड पठारातून नुकताच उठल्यासारखा वाटला होता. खालची दरी जाभई देत होती.

धनगरवाड्यावर सरळ एका दारासमोर उभे राहिलो.

म्हातारी आजी डोकावली. गोरीपान, नाकात बाटोळी नथ, गालावर सुरकत्या पण तरीही तेजस्वी व मायाळू नेत्र. " लांब चालून आलोया ! देवाकडनं ', गरम दूध मिळल का ? " " दूध

कुठलं र बाबा !" सगळं गेल पाटंच केंद्रावर !" तेवढ्यात लावून हाळी आली, "कोन हाय गो जनाबाई !' "हाय माझा ल्योक !"

अर्थात दोन्ही लेकराना बाफाळलेले दूध मिळाले व आम्ही झपाट्याने कुसूर पठारावरचा मार्ग पार केला.

समोरचा मार्ग कुडली खोऱ्याकडून लोणावळ्याकडे गेला. आम्ही उजवीकडे शेंदूरदेवाकडे वळलो. उतारावरून सह्यधारेवर आलो.

एक देखणे दृश्य आमच्या डोळ्यापुढे ओघळले होते. उतरणीवर गर्द जगल होते. पलीकडे कातळकडे फुगवत ढाकगड उठावला होता. त्यावरचा सुळका व त्याखालचा बहिरीचा सुळका बापलेका-सारखे उमे होते. डावीकडे बहिरीच्या सुळक्याकडे आमची पावले वळली.

पश्चिमेचा वारा खिंडीत घुसत होता. उजवीकडे ढाकगड व डावीकडे उत्तुग सुळका यामधून आता उतरू–कोसळू लागलो. ५०–६० मीटर खोल दरडीबाहेर पडलो तेव्हा पुढे कडा कोकणात उतरला होता. उजवीकडे ढाकची भिंत होती. हिच्या पोटातून नागमोडी वाट. पन्नास मीटर अतर कापले तरी गुहा दिसेना. पाठीमागे सुळक्याच्या टोकाला डोळा भिडेपर्यंत मान मोडायची पाळी आली अन् अचानक त्याच पातळीवर डोक्यावर एक कपार दिसली. बहिरीची गुहाच ती ! १० मीटर उंच कड्यावरून बहिरी टकाटका बघत होता. पावठ्याची वाट तिकडे चढत गेली होती.

'जैसे वानर चढितात तैसेच हे कर्म होते.' खोबणी संपल्या. झाडाचा सोट एका खळग्यात रोवला होता. थराराने आता सीमा गाठली होती. सोट पार झाला. श्वास घ्यायला फुरसतही न देता वरती टागलेल्या वेलाला हात घातला पण वेल गदगदा हालत होता. क्षणभर पाठीमागची वाट न्याहाळली, दिसत नसतानाही. मग झटकन

वेळाच्या कडेच्या कड्यावर अंग चिपकून वर पोचलो.

कातळकड्यातील नैसर्गिक गुहेतील बहिरोबा तसाच असणार हे ओघाने आलेच आणि कड्यातून चढणारा भाविक आपोआप त्या निर्गुण निराकारापुढे नतमस्तक होतो—बहिरीच्या खिंडीत परतलो. खिंडीतूनच वाट ढाकगडाकडे चढू लागली.

धाक बसविणारा तो धाकगड. पुढे अपभ्रंश होऊन ढाकगड नाव झाले असावे. गडाची पश्चिम बाजू म्हणजे तीनशे–चारशे मीटर उंच भिंत. पूर्व बाजू उतरत पुढे ढाक पठारात कोसळलीय. लटबंदी फक्त उत्तर बाजूस. त्याच भागात एका तळ्याकाठी राजवाड्याचे मकाण आहे एक ध्वजस्तंभही आहे. तिथेच खाली पाच टाकी. स्वच्छ नितळ पाण्याची,

ढाकगडासंबंधी इतिहास पूर्ण मौन बाळगून आहे. माथ्यावरचे रान तुडवताना दक्षिणेला भाजरसुबा, राजमाची, नागफणी टोक पश्चिमेला माथेरान राग उत्तरेला भीमाशंकरपर्यंतची सह्य राग प्रसन्न करून गेली.


गडाच्या वायव्य बाजूच्या ढाक गावात पोचायला पूर्ण दीड तास गेला. तापल्या उन्हात पाय रणरणू लागले. पाठीमागे सहज पाहिले तर सपाटीतून ढाकगड सिंहासारखा उठावला होता. झाडाच्या फांदीने सुरेख मान वाकविली होती. ते दृश्य टिपण्यासाठी छायाचित्रक डोळ्याला लावूनच मी गवतातून पुढे चालली होतो. योग्य चौकट मिळावी व खाली दबणार...इतक्यात फुस्सकन ध्वनी झाला. अगदी पायातच हातभर फणा काढून पिवळट–तपकिरी नाग सळसळत उभा होता.

रानातल्या त्या स्वच्छंद नागराजाचे दर्शन थरारक व रम्यही ( अर्थात दुरून ) होते.

देवराई संपवून धारेवर आलो. कर्जत १० कि. मी. अंतरावर.

दाड संपल्यावर भिवगड २०–२५ मीटर उंच होता. गडावरील जोती, टाकी पाहून खाली वदप गावी पोचलो. एस. टी. नव्हती. पायीच निघालो. दूरवर दिसणारे कर्जतचे दिवे जवळ येत होते... पाय थकत चालले होते....पण मनात पुढच्या भटकतीचा आराखडा तयार होत होता.

# गडांवर स्वारी : एक आगळा आनंद




जांभळीच्या रानातून येणारा थंडगार झोंबरा वारा, पायाखालच्या

बर्फाच्या लादीचा शीतस्पर्श अधिकच वाढवीत होता. दुधाच्या बरण्याच्या धकाधकीत भरधाव गाडीत उभे राहणे त्यामुळे अधिकच अवघड झाले होते.

झोलाई खिंड एकदाची आली. महाबळेश्वर पर्वताचे एक नाकाड सोळशी व कोयना खोरी विभागत धावले आहे. ह्याच्या शेंड्यापाशी असलेल्या तापोळे गावाकडे दूधगाडी धूळ उडवीत निघून गेली.

समोर सह्याद्रीच्या मुख्य रांगेत मकरंद गड १२२६ मीटर उंचीवर उभा होता. त्याची जुळी शिखरे कोयना नदीपलिकडे ठळकपणे दिसत होती. याच्या उत्तर अन् पूर्व उतारावर वृक्षराजीचे भलतेच प्रेम दिसत होते. आग्नेय उतारावर घोणसपूर हे गडाचे मेट आहे.


मकरंदगडाला पोचायचे म्हणजे घोणसपूरची परवानगी हवीच. त्यासाठी झोलाई खिंडीतून कोयना ओलांडून सरळ वाट आहे. पण आम्ही झांजवाडीकडे कसे वळलो ते कळलेच नाही. वाडीच्या पुढे कोयना पात्रात उतरेपर्यन्त उन्हे चांगलीच उबली होती. वाटेत प्रतापगडाहून येणारी कच्ची गाडीवाट भेटून गेली.

पाण्याचे डोह बरेच होते. आणि दगडगोट्यांना व जळणाला तोटा नाही. मग चाय बनायला कितीसा वेळ. गाडीला जसे पेट्रोल आवश्यक तसे ह्या भटक गाडीला चाय हवाच. उत्साहवर्धक अन् तहाननाशक म्हणून हे झटपट गरम पेय फारच उपयुक्त.

कोयना ओलांडून पुढे गेलो तो चतुर्बेट गावात. गावाला डोंगरांनी वेढलेले आहे. त्यामुळे झाडीतील एक चढण पार केली तेव्हा कुठे मकरंदने पुन्हा दर्शन दिले.

गडाच्या पलिकडच्या उतारावर दणकून झाडी होती. आणि त्यापलीकडे हातलोटची इवलीशी घरे शेताडातून उगवली होती त्या पार्श्वभूमी वर हातलोट घाटाची खिंड.

झाडीच्या दाटव्यातून गडाच्या लगत पोहचलो तो मल्लीकार्जुनाचे



रसाळगड – प्रवेशद्वार



जुना दुर्ग व आदिलशाही दुर्ग यामध्ये असलेल्या बोरीनदीवर धरण आहे.

देऊळ सामोरे आले. सभामंडपात पसरताच थंडाव्याने डोळे मिटले. देऊळ निःसंशय जुने. शिवकालापूर्वी चंद्रराव मोऱ्यांनी ज्या सात शिवमंदिरांना इनामे दिली होती त्यातील हे एक. देवळाभोवती जुनी स्मारके आहेत.

ही व अशी अनेक देवळे सह्याद्रीत भेटतात. कलाकाराचा हात यावर फिरलेला नसला तरी भक्तिभावाच्या दगडांनी बांधलेली ही देवळे पांथस्थांना सुखाचा सागर भासतात यात शंका नाही.

घोणसपुरात सर्व जंगम वस्ती, त्यातल्याच एका जानुभाऊकडे पिट्टु ठेवले अन् गडाकडे झेपावलो. लांबून वाटते तेवढी चढण अवघड नव्हती. वहिरीपुढे हात जोडून मारूती टाक्यावर आलो. कड्याच्या पोटातले थंड पाणी रिचवून माथ्यावर पोचलो माथ्यावरही मल्लिकार्जुनाचे देऊळ आहे.

'ते पल्याडले शिखर आहे ना त्याही पलिकडे कोकण दिसते. खूप मोठ्ठा कडा!" छोटासा श्रीहरी जंगम सांगत होता.

"त्यावरती जायला वाट."

"नाही बा! वाट नाही."

मग तर जायला हवेच होते. सुसाटलो अन् उटाच्या खोगीरावरून पश्चिम शिखरापाशी आलो. या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे इंग्रजांनी याला Saddle Back Hill असे सार्थ नाव दिले आहे.

उभे खडक तापले होते. खालच्या पठारावर कडे ओघळले होते. 'हिकडुन वाट नाही ऽऽ' तळातून खोल आवाज येतोय. तोवर एक मोठा दगड गडगडत सुटला. क्षणभर धस्स झाले. अन् मग फिरून उत्तर बा गेलो. या बाजूला खाली भरपूर झाडी होती. त्यामुळे धोकाही व ी.

थोडासा घसारा अन् त्यातून डोकावणारा प्रस्तर यावरची कसरत आम्हाला वर घेऊन गेली. बाठारसारख्या सपाट प्रदेशात वाढलेला

असूनही दिलीप निंबाळकर अशा कसरतीत मुरलेला होताच पण गमत म्हणजे दहा वर्षाचा श्रीहरी आमच्या पावलावर पाऊल टाकून वर चढला.

माथा पूर्ण ओसाड होता. ढोपराएवढ्या गवतातून तीन कोरडी टाकी अन् एकदोन पडकी जोती अस्तित्व दाखवतात. दुर्ग म्हणून प्रतापगड बांधल्यावर शिवछत्रपतींनी याला मूर्त स्वरूप दिले असावे. पण ह्या टेकाडाचा उपयोग पूर्व टेकाडाला संरक्षण म्हणूनच होत असावा.

सह्याद्रीच्या मुख्य रांगेतील गडाचा पश्चिम कडा केव्हाही बघणी-यच असतो, तद्वत ह्याचाही. खळग्यातले पाणी जसे गरगरत खाली जाते तसा हा कडा कोकणात घुसलेला. काळ्या कातळांनी कड-कडीत उन्हे अलगद पांघरली होती आणि ह्या कड्याच्या नसराळ्या-मधूनच आम्हाला कोकणात उतरायचे होते.

उत्तरेला झाडीच्या पुंजक्यातून प्रतापगड उठावला होता. पण आमची नजर खरी खिळली ती कोकणात दंड थोपटून उभ्या अस-लेल्या महीपत-सुमार-रसाळ या त्रयींवर. उभ्या महाराष्ट्रात सह्या-द्रीला आव्हान देत कोकणातून उचावणारी ही एकमेव रांग. आणि त्यामुळेच जगबुडीसारख्या प्रचंड जलौघाची निर्मिती ह्या रांगेने केलीय.

कोंडनाळ ही ह्या जगबुडीला गती देणाऱ्या ओढ्यातून उतरणारी वाट. उतार इतका तीव्र की घसरतच उतरणे चालू केले. त्यावेळी चार वाजले होते. अन् हजार जोर-बैठकांचे श्रम झाले तेव्हा नाळ संपून सपाटी लागली असे वाटत होते. अर्थात सूर्य कधीच डोंगराआड दडला होता. त्यात अमावास्येने काळोख ओतलेला. त्यामुळे तब्बल एक तासाच्या धडपडी, पडापडी नंतर बिरमणी गावचा पत्ता एक दिवा सांगून गेला.

भीतभीतच गावात प्रवेश केला. असे काळोखात दडून पाठीवर भलेमोठे पिट्टू घेऊन कोण त्या सह्यकुशीतल्या गावात जाणार आहे ? पण पोलीस पाटील आत्माराम मोऱ्याकडे चक्क गरम पाण्याने स्वागत. थकलेले पाय मोकळे झाले आणि प्रशस्त ओवरीवर रात्र हलकेच गेली.

जगबुडीच्या ह्यानलोट कडील ओढ्याच्या डाव्या काठावर बिरमणी गाव तर पलीकडे दोन नद्यांच्या संगमावर कळमणी वसले आहे. कळमणीतून पुढे सटकलो तेव्हा पलीकडे महीपत गडाची रांग ऊंचावली होती. डकाका व फणशी या दोन खिंडींच्या आधारे त्या रांगेवर पाऊल ठेवता येते.

फणशीची वाट त्यातल्या त्यात सोपी आणि म्हणूनच की काय वडगावात आब्याच्या थंड सावलीत उनाडक्या करण्यात जरा जास्तच वेळ गेला. पण कोणत्याही डोंगराला कमी लेखू नये हेच खरे ! फणशीसारख्या सोप्या वाटेनेही आम्हाला असा फेस आणला की खिंडीतल्या झाडावर बसलेले एक नागवे पोर आमच्या अवताराला उघड हसत होते. अनाजी नाव त्याचे.

एखाद्या थोरल्या बाप्यासारखं बोलून तो दिसेनासा झाला. पण परतला तो थंड ताक व पाण्याचे लोटे घेऊनच. त्याच्या गोड बोलण्यावर अन् ताकावर भाळून सूर्यराज चांगले डोक्यावर आले तेव्हा कुठे तिथून कसेतरी पाय काढले.

महिपत गडापर्यंत पोचायला आणखी एक तास गेला. डावी-कडच्या दरीतून बेलदारवाडी विखुरली होती.

अन् मग यशवंत दरवाजातून गडात प्रवेश करायला वेळच लागला नाही. शके १५८८ मध्ये शत्रूच्या वाकड्या नजरा अन् पाय गडात येऊ नयेत म्हणून बांधलेले हे प्रवेशद्वार आज आम्हाला सहज आत घेऊन गेले. अर्थात आम्ही तर गडाचीच माणसे !

इतिहासातले एक जीर्णशीर्ण पान सांगते की " शके १५८८ पराभव नाम सवत्सरे. कादवा डोंगर होता. इमारत बांधून ( शिव छत्रपतींनी ) महिपत गड नाव ठेविले. डोबर हवालदार ठेविला."

शिवछत्रपतींनी गडाच्या नाजूक जागावर सहा भक्कम दरवाजे बाधले होते. कोतवाल, लाल देवडी, पुसाटी, शिवगंगा, खेड व आग्नेयेचा हा यशवंत.

गडाचा विस्तार एवढा प्रचंड की माथ्यावरच्या तासभराच्या वाटचालीनंतरच केवळ ओहोळात दडलेले गडाच्या वायव्य भागातील मदिर शोधण्यात आम्ही यशवत ठरलो.

अतिशय शांत स्थान-परिसर वेलीझाडींने सजलेला. संध्याकाळ होत अलेली, त्यामुळे पसरलेली गूढता. त्यात आजुबाजूची जुनी स्मारके. महादेवाच्या तपासाठी याहून अधिक चागली जागा कुठे मिळणार ?

देवळासमोर एक खोदीव तळे. पाणी विशेष चांगले नाही. ( निदान उन्हाळ्यात ) पण गडाच्या पूर्व भागातील पाडवटाके मात्र उत्तम पाण्याने नेहमी भरलेले असते.

गडाचा विस्तार दृष्टीत न मावण्याएवढा. जुन्या निवासस्थानाचे व वाड्याचे अवशेष विपुल प्रमाणात आहेत. खेड दरवाजाजवळ मारुती व गणपती याच्या मूर्ती आहेत. उत्तर भागातील शिडीचा डोंगर हा सर्वोच्च भाग. ऊंची ९४२ मीटर. इथून ईशान्येला प्रतापगड, मकरंदगड, दक्षिणेला सुमारगड, रसाळगड, तर आग्नेयेला सह्य रागेत पर्वत, महीमंडणगड अन् वासोट्याचे दुर्ग दिसतात.

किर्र्र अधारी रात्र, निर्मनुष्य जंगलात एका ओसाड गडातील बंदिस्त देऊळ. मिणमिणता दिवा. आम्ही दोघेजण भुतासारखे राहिलो होतो. सकाळी उठून बाहेर पडतो तो बेलदार वाडीतील लोक बंदुका अन् भाले घेऊन हजर. त्याची समजूत घालून गडा-

बाहेर पडलो. तळातल्या बेलदार वाडीपासून पुन्हा चढण. ( वाडी बेलदारला दहिवली या पूर्व पायथ्याच्या गावापासून येता येते. दहिवलीस खेड तळे मार्गे रा. प. गाडी येते. ) नागमोडी वाटेने भट्टीच्या डोंगराला वळसा घातला तो सुमारगड रागेतून डोकावला.

सुमार म्हणजे सुमारे ५० मीटर ऊंचीचा कातळाचा ठोकळा. जवळ जवळ ३०० मीटर ऊंचीच्या भिंतीवर बसलेला. फक्त उगवतीच्या अंगालाच केवळ चढण्याजोगी जागा. इतर ठिकाणी झाडाच्या वेलींनीच हिंमत करावी. कातळ टोपीच्या तळातली भेदक नागमोडी उगवतीकडे घेऊन गेली.

पिट्टू उतरवून कड्यावर पावले चिकटवली. माथ्यावरचा बूर्ज दिसत होता. अष्टयाची अनेक झाडे कडा पकडून उभी होती. मधला घसारा सोडला तर वर पोचणे अवघड गेले नाही.

सुमारचे गडपण तुडुंब टाक्यानी अन् एका मानवनिर्मित गुहेने राखले आहे. माथा अगदी छोटा आणि इतिहासातही महिपत व रसाळ या दोन नामी ठाण्यांना जोडणारा एवढेच त्याचे महत्त्व. सुमारची ऊंची ८५४ मीटर. समोर रसाळ गड पानसा डोंगराने झाकून टाकला होता. दक्षिण बाजूला खोलवर खिंड दिसत होती. अत्यंत तीव्र उतार. कातळटोपीला वळसा घालून खिंडीत उतरताना तिरपीटच उडाली.

वाटेची शोधाशोध चालू केली. समोर पानसा डोंगर सुमारसारखाच आकाश भेदत होता. उजवीकडे तळात माडवे गाव पसरले होते. अन् डोंगर उताराच्या रानात तर माणसाचा पायरवही ऐकू येत नव्हता. दुपार अक्षरश पेटली होती. अन् शेवटी वाट सापडली.

रागेतून वरच्या वरती पानसा डोंगराला वळसा घातला अन् दूरवर रसाळगड दिसू लागला. आमची गती वाढली तरी सुमार-रसाळ ही दहा कि. मी. वाट सपायला तीन वाजले. तळपायापासून

मस्तकापर्यंत आगच आग. आलेली ग्लानी पाण्याने गेली. पेठेतल्या लोकानी ते पाणी आणले होते रसाळवरून.

त्या संजीवनीने झटकन उठून गडाकडे धावलो. पेठेतून माथा धावत चढण्याएवढा उंच. वाटेत दोन कमानदार द्वारे अन् हनुमंताची एक मूर्ती. गड उत्तरेकडून दक्षिणेकडे रुंद होत गेला आहे रुंद मार्गावरून दूर दिसणाऱ्या वास्तूपाशी आलो. रेखीव दीपमाळ, लाकडी कलाकुसर अन् थंड पाण्याने भरलेले तळे तीन दिवसाच्या मोहिमेचा हा शेवट खरोखरच रसाळ!

देऊळ झोलाई, वाघाई या देवतांचे. चैतातल्या पूर्णिमेनंतर पाच दिवसांनी दर तीन वर्षांतून एकदा इथे यात्रा असते त्यावेळी सुमारे पाच हजार लोक येतात.

गिरीदुर्गात कुठेच न आढळणारी तटबंद गढी गडाच्या मध्यभागी आढळते. कोकण भागातील महत्त्वाचे ठाणे म्हणून पेशव्याना रसाळगडचा उपयोग होत असल्याने ही गढी बांधली असावी.

गढीशिवाय एक कोठार व आग्नेय अथवा पुसाटी बुरुजाखालचे खांब टाके ह्या बघणीय गोष्टी. गडाच्या दक्षिणेला धामणदरा नावाचा वहाळ प्रस्तरारोहणासाठी उत्तम आहे. याच बाजूला एक चोर वाटही आहे.

गडाची उंची अवघी ५३९ मीटर. याची उणीव बलदंड तट-बुरुजांनी भरून काढली आहे. अन् याच्यावरून भडिमार करण्यासाठी अनेक तोफा पूर्वी सज्ज होत्या. सध्या त्यातील केवळ सात-आठच दिसतात.

गडाच्या नैऋत्य बुरूजावर उभे राहिलो तेव्हा पश्चिमेला खेड-पालगडापर्यन्त प्रदेश उलगडला. पश्चिमेला आंबवली घाटालगत पर्वत आणि मकरंद गडाची निळी शिखरे निळ्या आभाळात डौलदारपणे उभी राहिली. सुमार व महिपत तर दिसतच होते. आणि त्याच

रांगेच्या शेवटी आम्ही होतो.

जगबुडीच्या खोऱ्यावरून येणारे वारे आणि मिट्ट् काळोखाने गडाचे गहिरेपण भयाण केले अन् आम्ही वाघाईच्या देवळात आडवे झालो.

पहाटेच्या अंधारात गड सोडला तो झापाडी गावात खेडला तळेमार्गे जाणारी गाडी पकडण्यासाठी. कोकणची दमट हवा परत लागली होती, आपला गंध रसाळवर सोडून !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र.
संदर्भ शाखा (स्थळ

# नळदुर्ग : सहलीचे उत्तम ठिकाण

' अज दीदन ई चश्म मुहिब्बान रोशन
मीगर्दद व चश्म दुश्मनान गर्दद कूर '

( याच्याकडे दृष्टी टाकल्यास ( पाणी महालाकडे ) मित्राचे डोळे प्रसन्नतेने उजळतील तर शत्रूच्या डोळ्यापुढे अंधारी येईल ) —हे आहेत नळदुर्गच्या पाणी महालातील एका फार्सी लेखातील शब्द......

भूईदुर्ग, गिरीदुर्ग व जलदुर्ग अशा तीन प्रकारातील भूईदुर्गात नळदुर्गची श्रेष्ठ म्हणून गणना होऊ शकेल. धाराशीव ऊर्फ उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यात सोलापूरपासून अवघ्या ४८ किलोमीटर ( ३० मैल ) अंतरावर नळदुर्ग हा भुईकोट आज चारशे वर्षे खडा आहे. विजापूरची आदिलशाही आणि अहमदनगरची निजामशाही यांच्या सीमारेषा नळदुर्गपाशीच एकमेकांना टक्करा देत होत्या. बार्शीजवळचा दुर्ग परिंडा, सोलापूर, विजापूर व हैद्राबाद यांना जोडणारा नळदुर्ग हा एक महत्वाचा दुवा आहे.


नळदुर्गच्या एस. टी. स्थानकावरून पूर्वेस दृष्टि टाकली असता लांबच लांब दक्षिणोत्तर पसरलेला दुर्ग दिसतो. स्थानकासमोरच्या शाळेच्या गच्चीवरून दुर्गाच्या मांडणीची यथार्थ कल्पना येते.


दुर्गाचा घेरा सुमारे २॥ किलोमीटर ( १॥ मैल ) आहे. उत्तरे-



नळदुर्ग बंधारा व पाणी महाल

पारिंडा प्रवेशद्वार





पारिंडा पूर्वीच्या मंदिराची
नक्षीदार जाळी
पण
आता रूपांतर
मशीदीत

कडून म्हणजे तुळजापूराकडून बोरी नदी वाहत येते व दुर्गाच्या पूर्व बाजूने दक्षिणेला निघून जाते. याच नदीला आरंभी मोठ्या कौशल्याने फाटे पाडून एक फाटा पश्चिम बाजूकडून नेऊन दक्षिणेला पुन्हा नदीस मिळविला आहे. दुसरा फाटा दुर्गाच्या आत वळवून घेऊन त्यावर एक बंधारा बाधून तो पुन्हा उत्तरेस नदीस विलीन केला आहे. यातील एक विशेष म्हणजे पश्चिम बाजूच्या खंदकातील पाणी कमी जास्त करण्याची योजना. दुर्गाच्या आग्नेय टोकाशी नदीचे पाणी आवश्यक तेव्हा अडवीत. त्यामुळे पश्चिम खंदकात नदीचे पाणी शिरे व ते चढत जाऊन खंदक पाण्याने पूर्ण भरे. अशातऱ्हेने दुर्ग खोल पाण्याने वेढला जात असे. नदीला आपल्या बळावर वळवून दुर्गाच्या सरक्षणार्थ तिचा उपयोग केलेला अन्यत्र कोठेच आढळत नाही.

पेठेतून दुर्गाच्या पश्चिम प्रवेशद्वाराशी येताच प्रथम खंदक लागतो. मजबूत तटबंदी दिसू लागते. बोरी नदी शेजारच्या ताठ खडकाळ पठारावरती हा दुर्ग बाधून काढला आहे. खदकातील पाण्यापासून या पठाराची उंची निरनिराळ्या ठिकाणी १५ मीटर (५० फूट) व ६० मीटर (२०० फूट) इतकी भरते. खडक फोडून तटबदीचे बाधकाम केले असल्याने ते अतिशय भक्कम झाले आहे. खंदकावर पूर्वी काढता घालता पूल होता. आता त्याच्या फक्त खुणाच शिल्लक आहेत. प्रथम एका छोट्याशा कमानी दरवाज्यातून आत गेल्यावर थोडे उत्तरेस जाऊन एक वळण घेऊन मागे आले की पश्चिमाभिमुख असे मुख्य प्रवेशदार लागते. लाकडावर लोखंडी पट्ट्या व खिळे मारून दरवाजा भक्कम केला आहे. या दरवाज्यावरती एक जाळीदार नळी आहे युद्धकाळात शत्रूने दरवाजास आग लावली तर ती विझविण्याकरिता या नळीतून पाण्याचा मारा करीत. संरक्षकांच्या देवड्या ओलाडून थोडे पुढे गेले

की डावीकडील पडवीत दोन फार्सी शिलालेख दिसतात व उजवी-कडे ४ लांब तोफा पडलेल्या दिसतात. यातील एकतर चांगली ६ मीटर ( २० फूट ) लांब आहे.

रुंद दगडी रस्त्याने जाताना उजवीकडे सैनिकांच्या बराकी लागतात व पुढे जामेमशीद लागते १२ मी. × ९ मी. ( ४२ फूट × ३० फूट ) अशी लांबीरुंदी असलेल्या या मशिदीला मोठे अंगण आहे. पूर्वेकडे दरवाजा आहे. मशिदीच्या उत्तर दरवाज्यावरती एक अरबी भाषेतील शिलालेख आहे. यात नळदुर्ग बांधणाऱ्याचे नाव व बांधण्याचा काल दिला आहे

मशिदीच्या पुढे डाव्या हाताला तटात एक दिंडी लागते. या दिंडीत गेले की बोरी नदीचा दुर्गात वळविलेला फाटा व त्याला घातलेला बंधारा दृष्टीस पडतो. बंधाऱ्याशेजारीच डावीकडे रणमंडळ टेकडी दिसते. या दिंडीपलीकडेच काही अंतरावर आणखी एक दिंडी आहे. यातून राजवाड्यात प्रवेश करता येतो. हा राजवाडा दुमजली पण पडक्या स्थितीत आहे. हा तटानजीकच बांधला असल्याने बोरी नदीचे सुंदर दृश्य येथून पाहावयास मिळते.

राजवाड्याबाहेर एक १। मीटर ( ४ फूट ) उंचीचा अखंड शीळेत खोदलेला हत्ती आढळतो. इथून ईशान्य भागात जाताना आजूबाजूस पडक्या स्थितीतील इमारती दिसतात यात मुन्सफ कोर्टाची इमारत, बारा इमाम, अंबारखाना, दारूकोठी वगैरे आहेत. यावरून पूर्वी येथे फार मोठ्या प्रमाणात सैन्य राहात असावे.

दुर्गाच्या ईशान्य भागात उपली किंवा उपळ्या बुरूज हा लक्ष वेधून घेणारा आहे हा नेहमीप्रमाणे तटात बांधलेला नसून मध्येच उभारलेला आहे. सुमारे ३०.५ मीटर ( १०० फूट ) उंचीच्या या बुरुजावर जायला ५–५॥ मीटर ( १६–१७ फूट ) रुंदीच्या सुमारे ७८ पायऱ्या चढून जाव्या लागतात. दुर्गातील हे सर्वात उच्च

ठिकाण. येथून आजूबाजूचा ६ किलोमीटर (१० मैलाचा) टापू न्याहाळता येतो. म्हणूनच या बुरुजाचा उपयोग टेहळणीसाठी करीत असावेत. बुरुजाला पश्चिम बाजूला एक गवाक्ष आहे, यात बसून सायंकाळची रम्य दृश्ये पाहता येतात. तसेच वरती एक कीर्तिमुख असलेली तोफ आहे.

उपळ्या बुरुजावरून नळदुर्गचे संपूर्ण दर्शन घडते. दक्षिणेला हैद्राबादकडे जाणाऱ्या रस्त्यावरील बोरी पूल दिसतो. पश्चिमेस बधारा, रणमंडळ टेकडी दिसते.

प्राचीन नळदुर्गचे जनकत्व खूप मागे म्हणजे पौराणिक काळातील राजा नळापर्यंत जाते, असे सांगतात. १४ व्या शतकापूर्वी चालुक्यांच्या ताब्यात तो होता. नंतर बहामनी राज्याचे पाच तुकडे झाल्यावर आदिलशाही फौजेने त्यावर कबजा मिळविला. पुढे १६७७ मध्ये औरंगजेबाच्या फौजेने तो जिंकला व हैद्राबादच्या निजामाकडे तो सुपूर्त केला. २ जानेवारी १७५८ हा तर नळदुर्गच्या भाग्याचा क्षण. निजामाचा साखरखेडले येथे मराठ्यांनी पूर्ण पराभव केल्याने निजामाने तह करून नळदुर्गबरोबरच २५ लक्षाची जहागिर पेशव्यांना बहाल केली. नळदुर्गवर जरीपटका भगवा ध्वज फडकला. या मोहिमेत बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे, विश्वासराव, सदाशिवराव भाऊ, दत्ताजी शिंदे यांनी भाग घेतला होता. नळदुर्गची सध्या आहे तशी बांधणी सुलतान अबूल मुझफ्फर अली अदिलशाह पहिला याच्या काळात म्हणजे हिजरी ९८६ (इ. १५६०) मध्ये ख्वाजा नियमतुल्लाह याच्या अधिपत्याखाली झाली. याने दुर्ग पूर्वीपेक्षा लष्करीदृष्ट्या अतिशय मजबूत केला. त्याने ठेवलेले 'शाहदुर्ग' हे नाव फारसे प्रचारात नाही.

उपळ्या बुरुजाच्या पूर्वेकडील वाटोळा भाग जेथे पायऱ्याच्या भागाशी टेकतो, तेथे अगदी पायथ्याशी एक शेंदूर लावलेली जागा

आहे. हे खडोबाचे स्थान आहे. सध्या जरी तिथे शेंदूर लावलेल्या जागेशिवाय काही दिसत नसले तरी इ. १६१४ मध्ये तिथे खडोबाचे स्थान निश्चितपणे होते व बुरूज बांधताना ते स्थान गाडून टाकण्यात आले यासमोरच दरूकोठाराची इमारत आहे

उपळ्या बुरुजावरून खाली उतरून थोडे पश्चिमेकडे गेले की तटातल्या दरवाजातून बोरी नदीला बांधलेल्या बंधाऱ्यावर जाता येते.

हा बंधारा दगडी असून हिंदुस्थानी स्थापत्य कलेतील एक विशेषच म्हणावे लागेल. कारण बंधाऱ्याच्या पोटात तयार केलेला ' पाणीमहाल. '

१७४ मीटर ( ५७२ फूट ) लांबी असलेला बंधारा निरनिराळ्या ठिकाणी सुमारे २॥ ते १४ मीटर ( ८ ते ४७ फूट ) रूंद आहे. तर याची उंची जवळ-जवळ ५ मजली इमारतीएवढी म्हणजे १९ मीटर ( ६३ फूट ) उंच आहे. उत्तरेकडून वहात येणारी ' बोरी दुर्गाच्या आत घेऊन तिला चंद्रकोरीसारखे वळण देऊन पुन्हा उत्तरेकडे वळविली आहे व यावर पूर्व-पश्चिमदिशेत हा बंधारा अतिशय कल्पकतेने पण भरभक्कमपणास कुठेहि उणा पडणार नाही, असा बांधला आहे. निरनिराळ्या ऊंचीवर यात अनेक मोऱ्या बांधल्या आहेत तर सर्वात वरती पुराच्या वेळी पाणी चटकन वाहून जावे म्हणून दोन मोठे सांडवे आहेत यांना नर-मादी अशी नावे आहेत. दुसरा इब्राहिम आदिलशाह याच्या कारकीर्दीत म्हणजे हिजरी १०२२ मध्ये ( इ. स. १६१३ ) हा बांधला असून, स्थपतीचे नाव आहे मीर मुहम्मद इमादीन

या बंधाऱ्याचा विशेष म्हणजे याच्या पोटात बांधलेला महाल. याला ' पाणीमहाल ' म्हणतात. हा महाल पावसाळ्यातील एक आगळे आकर्षण आहे. इ. १८५३ मध्ये इंग्रजांनी हा दुर्ग आपल्या

ताब्यात घेतल्यावर कर्नल मेडोज टेलर याने " द मोस्ट इंटरेस्टिंग प्लेस, आय हॅड एव्हर सीन " असे उद्‌गार हा पाहून काढले ते यथार्थच आहेत, यात शंका नाही.

बंधाऱ्याच्या पश्चिम बाजूच्या साडव्याजवळून पाणीमहालात उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. २०-२५ पायऱ्या उतरल्या की डावीकडे महालाचे दार लागते. पायऱ्याची वाट थेट तशीच खाली एका मोठ्या मोरीपर्यंत नेली आहे. यात हेतु हा की पुराच्या वेळी धरणावरून पाणी जाईल तेव्हा पाणीमहालात पाणी न शिरता या वाटेने सरळ खाली निघून जावे. महालाच्या दारातून आत एक वळण घेऊन महालात प्रवेश होतो. ७-६ मीटर ( २३ × २० फूट ) अशा लांबी-रूंदीच्या या महालात जाताच अतिशय थंडगार आणि आल्हाददायक वाटते. महालात एक कारंजे आहे, तसेच भिंतीवर एक फार्सी लेख आहे. यात ही वास्तु बांधण्याचा काळ व त्याच्या स्थपतीचे नाव याची नोंद आहे. यात तो म्हणतो, " या वास्तुकडे पाहिल्यास मित्राचे डोळे प्रसन्नतेने उजळतील तर शत्रूचे डोळ्यापुढे अंधारी येईल."

पाणीमहाल दक्षिण बाजूने बंद असला तरी उत्तर बाजूला त्याला ८ × १ मीटर (२६ × ३।। फूट) असा एक मोठा सज्जा आहे. हा धरणाच्या बाहेर काढला असून सज्जात उभे राहून गवाक्षातून बाहेर दिसणाऱ्या विलोभनीय दृश्यात मन गुंगून जाते आपल्या पाठीमागे १८ मीटर ( ६० फूट ) उंच पाण्याचा साठा आहे, याचे क्षणभर भानच राहत नाही. पावसाळ्यात धरणावरून जेव्हा पाणी वाहते तेव्हा या सज्जाच्या छपरावरून पडताना मोठा फवारा उडतो. नदीच्या वरच्या बाजूला दुर्गापासून सुमारे २-३ किलो मी. अंतरावर सरकारने आणखी एक धरण बांधलेले आहे.

पाणीमहालाचे खरे वैभव पाहण्यासाठी पावसाळ्यातच जायला

हवे. म्हणून तुळजापूर भागात भरपूर पावसाचे वृत्त येताच नळ-दुर्गाला जावे.

पाणीमहालाव्यतिरिक्त बंधाऱ्यात धान्य दळण्यासाठी एका मोठ्या पाणचक्कीचीहि व्यवस्था केली आहे. त्याच प्रमाणे छायाचित्रात सज्जाच्या उजवीकडे दिसणाऱ्यां मोरीच्या तोंडाशी मंदिराच्या दरवा-जावर असते तशी गणेशमूर्ति आहे, तीहि बघण्यासारखी आहे. ही एखाद्या आसपासच्या मंदिराची असावी. या बंधाऱ्यामुळे दुर्गात वर्षभर पाण्याचा मुबलक साठा राहतो. नळदुर्गवर सध्या पुरातत्व विभागाचे सेवक श्री. शंकर रगडे व श्री. जाधव याची देखरेख आहे.

बंधाऱ्यावरून पलिकडील जोडदुर्गात जाता येते. त्याला ' रणमंडळ ' डेकडी असे म्हणतात. उत्तर भागातील हत्ती दरवाजात हिंदुपद्धतीचे शिल्प पाहण्यास मिळते. गंडभेरुंड हे दुर्मिळ शिल्पही इथे दिसते. याशिवाय दुर्गाच्या पूर्व बाजूस असलेला आणखी एक बांध ' मछली तट व दक्षिण तटबंदीतील एका बुरुजात छोटे छोटे नऊ बुरुज असलेला ' नवबुरूज प्रेक्षणीय आहेत


# तोरणा ते रायगड : पायी

तीनशे वर्षांची काळरात्र संपून उषःकाल झाला. सारा महाराष्ट्र, जो निराशेच्या घोर अंधारात ठेचकाळत मार्ग आक्रमत होता, तो खडबडून जागा झाला. तोरण्यावर स्वराज्याचे तोरण चढले. प्रचंड मोगल साम्राज्याची पाळेमुळे खणून काढणाऱ्या हिंदवी स्वराज्याच्या पायाचा मान तोरण्याला मिळाला आणि त्या पायावर उभारल्या गेलेल्या महाराष्ट्र भाग्यभवानीच्या मंदिराचा कळस होण्याचे भाग्य लाभले रायगडला.

अशा ह्या रायगडला जवळच्या मार्गाने पायी जाण्याच्या वाटा तीन. पैकी पानशेत, माणगाव, निवगुणे, खानूवरून बोचेघोळी नाळेतून, वारंगीवरून रायगडाला जाणारी वाट, पानशेत धरण पाण्यांने भरल्याने परावलंबी पडून निकामी ठरली आहे. उरलेल्या दोन वाटा तोरण्याच्या पायथ्याच्या 'वेल्हा' वरून रायगडला जातात.

### गडाचा राजा

तोरण्याच्या बाले किल्ल्यावरून चौफेर नजर फिरविताना तुंग, तिकोना, लोहगड, विसापूर, सिंहगड, पुरंदर, रोहिडा, प्रतापगड, राजगड इत्यादी दुर्ग दिसतात. अन् पश्चिमेला नजर टाकताच त्या





सर्वांचा मुकुटमणी, सह्याद्रीच्या उत्तुंग पहाडाच्या गराड्यात दिमाखाने उभा असलेला दिसतो – गडाचा महाराजा अन् महाराजाचा गड दुर्ग रायगड

मन भारावून जाते अन् वाटते, की रायगड आपल्याला खुणावतोय. या इकडे या. महाराष्ट्रभूमीचे वैभव डोळ्यात साठवायला या. पण.. आराम गाडीत बसून वरधा घाटाने नव्हे तर इतिहासकालीन वाटेने, सह्याद्रीच्या कडेकपाऱ्यातून त्याच्या अगाखांद्यांवरील पिसाट वारा पीत, पदयात्रा करीत.

तोरण्याहून रायगडला पायी जायचे म्हणजे पुण्याहून दुपारच्या 'पुणे-वेल्हे' गाडीने निघावे व पुण्यापासून सुमारे ६८ कि. मी. अंतरावरील वेल्ह्यास उतरावे

पाठीमागच्या बाजूस दिसणारा तोरणा सायंप्रकाशामुळे धूसर दिसू लागतो व त्यामुळे काहीसा गूढही वाटतो. वाटेत भेटणाऱ्याच्या चेहऱ्यावरील कौतुक मिश्रित आश्चर्य न्याहाळीत असतानाच 'कोदापूर' येते वेल्ह्याहून निघाल्यावर सुमारे नास-दीड तासात आपण कोदापूरला पोचतो. (कोदापूरची एस. टी. चालू अस-



रायगड राजप्रासादासमोरील मनोरे



हाच तो वळण कोंडीचा डोह

ल्यास एस. टी. नेच कोदापूरला यावे. )

पचवीस एक उंबरठा असेल नसेल, पण कानद खोऱ्यातले कोदापूर हे मोठे रम्य गाव आहे. एकूण तीन वाड्या असलेल्या ह्या कोदापूरला समोरच असलेल्या तोरण्याचा वरदहस्त लाभला आहे. तेथील वतनदार शेतकरी श्री शरदराव देशपांडे अतिशय आस्थेने आपले स्वागत करतील व आपल्या मुक्कामाची सोय करतील.

रात्रभर कोदापूरला मुक्काम करून, दुसऱ्या दिवशी झुजुमुजु व्हायच्या आतच कूच करावे. कोदापूर सोडताच दोन मार्ग आहेत एक वाट बोचेघोळी नाळेतून आणि एक सिंगापूर नाळेतून राय-गडला जाते. अर्थात शहरातील रस्त्यावर असणाऱ्या पाट्याच्या धर्तीवर ' बोचेघोळी नाळ पथ ' अथवा ' सिंगापूर नाळ पथ ' अशा पाट्या मात्र येथे नाहीत.

गाडी रस्त्याने चालू लागल्यास एका पूर्व-पश्चिम डोंगराच्या रांगेच्या डावीकडून आपण चालू लागतो. नागमोडी वळणे घेत झपाझप पावले टाकीत जात असताना थोड्याच वेळात उजवीकडे डोंगराच्या कुशीत ' निवी ' गाव दिसते. निवीची वाट सोडून पुढे जाताच गाडीरस्ता उजवीकडे वळतो आणि त्याचा एक फाटा गेवंड्याकडे जातो. उजवीकडच्या रस्त्याने चालू लागताच आपण डोंगराच्या अधिकाधिक जवळ जाऊ लागतो आणि एक चढण चढून निम्म्या डोंगरात वसलेल्या ' घिसर ' गावी आपण येतो. आतापर्यंत तासा-दीडतासाची चाल झालेली असते.

घिसर सोडले की वाट पुन्हा उतरते. पार तळापर्यन्त उतरल्यावर एक ओढा पार करून पुढे जावे तोच पुन्हा एक टेकडी सामना देण्यास सज्ज असते. टेकडी चढून पुढे चालू लागावे आता मात्र झाडी असल्यामुळे जरा रमतगमतच कानदी नदीच्या उगमा-कडे वाटचाल करावी. दांडादांडाने सुमारे तासभर चालताच समोर

रायदंडाचा डोंगर दिसू लागतो. सपाटी वरून चालल्याने हुशारी आलेली असते. एक ओढा पार करून वीस-पचवीस मिनिटात रायदंड चढून त्यावरची सपाटी पार करताच रायगडदर्शन होते. पाठोमागे तोरणा आणि राजगड पाठीराख्यासारखे उभे असतात.

## बोचेघोळी नाळेकडे

पलीकडे उतरावयास सुरुवात करताकरतानाच एक वाट खोल दरीत चांदरकडे जाते. ती वाट सोडून उजवीकडे चालू लागावे. समोर दूरवर जंगलखात्याने खुणेसाठी रचलेली दगडाची रास लागते. ते धोंडे मागे टाकून डोंगरावरील सपाटीने पश्चिमेकडे वाटचाल करावी. डावीकडे, कडेकपारींच्या करवती रांगानी कवेत घेतलेला दुर्ग लिंगाणा पहात असतानाच माणगाव, निवगुणेवरून खानूस जाणाऱ्या वाटेस आपण येथून मिळतो. खानूच्या दिशेस चालू लागावे. खानूच्या डिग्यावरून आपण थोड्याच वेळात धनगर-वाड्यावर येतो.

थोडीफार विश्रांती घेऊन पुढे अतिशय बिकट असलेल्या, खाली बघताच डोळे फिरविणाऱ्या पण रौद्र निसर्गसौंदर्यात नाहलेल्या बोचेघोळी नाळेतून नाळेच्या नावाची प्रचीती घेत कोकणातील वारंगीत उतरतो. येथपर्यंत सूर्य माथ्यावर आलेला असतो. यापुढे आपण एक चित्तथरारक अनुभूती मनात वागवतच निजामपूर, वाडीमार्गे सायंकाळी रायगडावर पाऊल टाकतो.

हा मार्ग कष्टाचा असल्याने सर्वसामान्याना झेपण्यासारखा नाही. म्हणून कोंदापूर सोडल्यावर घिसरच्या वाटेला न जाता डावीकडे 'गेवढे' गावच्या वाटेला लागावे व दुसरा मार्ग आक्रमण्यास सुरुवात करावी.

## दुसरा मार्ग

कानंदी नदी ओलांडून एक छोटीशी टेकडी चढताच आपण गेवंढ्यात शिरतो. सुमारे १५ ते २० मिनिटातच 'वरूती' कडची वाट सोडून उजवीकडच्या वाटेने आपण माथ्यावर येतो. अगदी तंतोतत माथ्यावर नाही पण एक टप्पा खाली! गेवढे, निवी अन् कोदापूर हे त्रिकुट मोठे छान दिसते. दिवाळीतल्या किल्ल्याच्या घरासारखी ती कौलारू घरे सुबक दिसतात! मधूनच धुराचा पुजका वर येऊन विरूनही जात असतो. आणि पूर्वेला तोरणा. वाळजाई दाराने तोरणा उतरुन भट्टी, गेळगान धनगरवाडे यामार्गेही इथे येता येईल.

कोदापूराहून निघून तास उलटलेला असतो. पुढे पावले टाकण्याचा विचार येतो अन् तेवढ्यात कानावर एखादी हाळी येते, "कनच्या गावच पाव्हनं ?" समोर बघावं तर फाटक्यातुटक्या लंगोटीत वावरणारा एखादा धनगरी देह दिसतो. अशा जगलातून कमरेला विळे लावून हे एकेकटे हिंडताना भेटतात. अन् म्हणूनच ह्या धाडसी मावळ्याच्या शिरावरच स्वराज्याचे तोरण बांधले गेले.

## रायगड तो बहुत दूर है!

आता डोंगर डाव्या बाजूला टाकून आपण सपाटीने जाऊ लागतो. नागमोडी वळणे घेत कधी डोंगराच्या कुशीत शिरत तर कधी दांडादांडाने जात असताना अगदी कंटाळा येऊ लागतो. एक दांड संपला की पुढचा हजर आहेच.

उजव्या बाजूला समोरच्या टेकडीवर असलेले घिसर' दिसते. टेकडी चढणारा लाल भडक रस्ता उठून दिसतो.

आकाशी रंगाची शाल पांघरलेल्या धरतीचे विशाल रूप पाहून थकलेले मन एकदम हलके होऊन जाते. वेळवंड खोऱ्यातील

वरूतीवरून नजर समोर टाकताच लांबच लांब पसरलेल्या सह्या-द्रीच्या रांगाच्या रांगा दिसतात. त्यामध्ये प्रतापगड, मकरंदगड आणि उजव्या बाजूला रायगड, छे! भासच नुसता तो! रायगड तो बहुत दूर है.

## धनगरराजा घसाडगावचा

माथ्यावरून थोडे पुढे जाताच वाघ्याच्या धनगरवाड्यात आपण शिरतो. आजूबाजूला कित्येक मैलात माणसाचे नाव नाही अन् हा वाघ्या धनगर इथे एकटा राहतो. बहुतेक त्याला नावाप्रमाणे वाघा-चेच काळीज असावे! झटकन आपल्या समोर घोंगडी अंथरली जाते.

सुमारे आठ वाजलेले असतात. सूर्याची उन्हे डोंगराडोंगरावर, झाडाच्या शेंड्यावर पडलेली दिसतात.

मन प्रसन्न झालेले असते. त्यामुळे ताजेतवाने होऊन पुढे चालू लागताच समोर डोंगराची एक सोंड लागते. डावीकडे हरपूडची वाट सोडून डोंगराच्या उजव्या बाजूने खालच्या अंगाने चालू लागावे. डोंगरापलीकडचे मनोहर दृश्य अदृश्य होते एका मागून एक दांड पार करत अर्धा तास चाल झाल्यावर वाट डावीकडे वळून डोंगरापलीकडे जाते आणि डोळ्यासमोर सुरेख दृश्यांची पुन्हा एकदा पखरण होते.

## रायगड अन् लिंगाणादर्शन

धनगरवाड्याच्या पुढे गेल्यावर वाट थोडी दक्षिणेकडे वळते आणि घिसरकडून सिंगापूरला येणारी वाट आपल्याला मिळते. तोरण्या समवेत राजगडही दिसू लागतो थोडे पुढे जाताच राय-गडावर दृष्टी स्थिरावते. अनेक फुलांच्या झुपक्यात कमळ जसे

उठून दिसेल तसेच रायगडही अनेक पहाडाच्या गराड्यात उठून दिसतो. गडावरील जगदीश्वर अन् नगारखाना स्पष्ट दिसतात. रायगडच्या डावीकडे एक काळेकुळकुळीत टोक दिसते. हाच तो दुर्ग लिंगाणा !

वाटते, आला रायगड, बाजी मारली. पण कसचे काय ? अजून सुमारे ९१५ मीटर ( ३००० फूट ) खोल कोकणात उतरायचे आहे आणि सुमारे ८६९ मीटर ( २८५१ फूट ) उंचीचा रायगड चढायचा आहे. छाती दडपून जाते. पण यापुढचा भाग खरोखरच देखणा आणि तितकाच जीवघेणा – सह्याद्रीच्या कडेकपाऱ्यातील नाळ पार करायचा.

डावीकडे एक वाट सिंगापूरला जाते. पुढे एक छोटेसे मरीआईचे मंदिर लागते. आणि नंतर ' मोहरी ' गाव.

ह्यापुढे कोकणात उतरण्यास दोन मार्ग आहेत.

मोहरीसमोरच्या सपाटीवरून सरळ गेले असता एक टेकडी लागते. तिला डावीकडे ठेवून थोडे पुढे जाताच आणखी एका टेकडीच्या डावीकडून जाऊन, सुमारे अर्ध्या तासात आपण डोंगराच्या एका टोकावर येतो. बोराटा नाळ याच्या डावीकडे.

बोराटा नाळेपेक्षा सिंगापूरची नाळ अतिसुलभ. म्हणून मोहरी सोडल्यावर लगेच एक वाट डावीकडे वळते त्या वाटेने उतरणीस लागावे. डावीकडच्या वळीतले सिंगापूर देखणे दिसते. बरेच खाली उतरून सिंगापूरवरून नाळेकडे मार्गक्रमणा करण्यास सुरुवात करावी.

एक झुळझुळ वाहणारा ओढा लागल्यावर डोंगरावरचे ते अमृत चाखण्याचा मोह अनावर होतो. हाच ओढा थोडे पुढे गेल्यावर बेहोश होऊन स्वतःला हजार-दीड हजार फूट खोल झोकून देताना आढळतो. ओढ्याच्या समर्पणातून निर्माण झालेले ते सौंदर्य काही

ऱ्यारेच ! समोरचे उत्तुंग डोंगर, खालची खोल दरी, दूरवर दिसणारी काळ नदी व त्या अलीकडील 'दापोली' अशा सोबतीबरोबरच तिथल्या अणुरेणूत भरलेली भयाण शांतताही आपल्याला सोबत करते.

यापुढे गर्द झाडीतून, कधी नागमोडी वळणे घेत तर कधी वर-खाली चढणी घेत वाट आपल्याला सतत नाचवते. झाडी संपल्यावर आपण एका ओढ्यात उतरतो. कितीही उतरले तरी उतरण काही संपत नाही आणि गाव काही येत नाही. पाठीवरच्या पिशव्यांनी खांदा बराच अवघडून गेलेला असतो. उजवीकडचा उत्तुंग लिंगाणा आणि डावीकडचे गगनभेदी डोंगर पाहून हे श्रम धुक्यासारखे विरून जातात.

आता एक आंब्याचे झाड समोर येते. त्याच्या सावलीत विश्रांती घेताच थकवा जातो. सह्याद्रीचा बराच भाग आपण उतरलेला पाहून मनाला दिलासा वाटतो. आता यापुढे दोन वाटा फुटतात.

## शिवलिंगस्वरूप-लिंगाणा

उजवीकडची वाट लिंगाण्याला संपूर्ण वळसा घालून लिंगणमाचीला जाते. सुमारे ९०८ मीटर ( २९७९ फूट ) उंचीच्या ह्या दुर्गाचा आकार शिवलिंगाप्रमाणे असल्याने नाव लिंगाणा पडले असावे. लिंगाणा पाहण्यासाठी वर चढू लागावे तो बेलाग कडे वाट अडवितात. घोटीव शिवलिंगाच्या कडा जशा तासीव तसेच याचे कडेही तासीव उभे आहेत. पूर्वी जरा तरी वाट होती म्हणे. पण आता वर जाणे जवळजवळ अशक्यच ( अर्थात सर्वसामान्यांना ) येथे शिडीची चिरीमिरी लावूनही वर पोचणे अलबत्यागलबत्याचे काम नाही.

थोडेफार वर जाताच एका ठिकाणी उंच खडक आहे. त्यात एक झाडाची मुळी आहे. धाडसाने, फक्त मुळीच्या आधाराने वर पोचल्यावर आपण गडात येतो.

लिंगाण्याच्या माचीतून रायगड व खालचा प्रदेश फार सुरेख

दिसतो. लिंगासारख्या खडकावर जाणे अत्यंत अवघड आहे. खडकाखाली मागच्या बाजूस गुहा आहेत. शिवकालात या गुहांतून कैदी ठेवीत असत. कारण, येथून पळणे अशक्य होते.

लिंगणमाचीवरून 'पाने'ला उतरून काळ नदी ओलांडून रायगडच्या उत्तर पायथ्याकडील 'वाघेरी' गाठता येईल. किंवा वारंगी, निजामपूर, वाडी मार्गे रायगडावर पोचता येते.

आंब्याच्या झाडाच्या डावीकडच्या वाटेने आपण काळ खोऱ्यातील दापोलीस येतो. हे गाव भोर-महाड रस्त्यावरील बिरवाडीच्या उत्तरेस १६ कि. मीटर आहे.

लिंगणमाची—पाने वाटेने रायगड दापोली वाटेपेक्षा काहीसा जवळ पडत असला तरी दापोलीकडून जाण्यात विशेष म्हणजे येथून वीस-पंचवीस मिनिटाच्या अंतरावर काळ नदीत असलेला वाळण-कोंडीचा डोह

बिरवाडी-सादोशी मोटार रस्त्याला लागूनच असलेल्या काळ नदीत हा डोह आहे. हा सुमारे ३१ मीटर लांब व ९ मीटर रुंद असून बराच खोलही आहे. नैसर्गिकरीत्या तयार झालेल्या ह्या डोहात एका बाजूने धबधब्यासारखे पाणी पडते व दुसऱ्या बाजूने ते बाहेर पडते. याच्या सर्व बाजूच्या दगडी दरा उंच व सरळसोट आहेत. डोहात अतिशय सुरेख रंगीबेरंगी मासे असून चणे, चुरमुरे, तांदूळ इत्यादी खाद्य टाकले असता एकापाठोपाठ एक थवे वर येतात. सातव्या थरात तर माणसाएवढे प्रचंड देवमासे वर येतात असे तेथील लोक सांगतात. अर्थात खाद्य भरपूर पाहिजे हे उघड आहे. मासे कोणीही खात नाहीत कारण ते देवाचे समजले जातात.

**रायगडच्या घेऱ्यात**

नजरदेखील खाली ओघळून जाईल असे ताठ कडे असलेला

दुर्गराज रायगड आता चढणे क्रमप्राप्त होते. वाघेरीसमोरचा दाड चढून बरीच सपाटी तुडवून टकमक टोकाच्या खाली आपण येताच कृतकृत्य वाटते. डोळ्यांचे पारणे फिटते. टकमक टोक वरतून पाहणे जसे आवश्यक तसेच खालून किंबहुना खालूनच ते अधिक डोळ्यांत भरते. रायनाक स्मारक बघून रायडच्या उजव्या बाजूकडील सपाटीने सती गोदावरीबाईची समाधी उजव्या बाजूस ठेवून नाना दरवाज्यात पाऊल ठेवावे. तिथून तासा-दीड तासात महादरवाज्याने गडमाथा गाठता येतो.

अशा रीतीने सकाळी कोदापुराहून निघाल्यास सुमारे ४० कि. मीटर चालीने वर उल्लेखलेल्या कोणत्याही मार्गाने दहा-बारा तासात रायगडावर आपण सध्याकाळी पोचू शकतो.

छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या रायगडावरील वास्तू पाहताना सिंगापूरनाळेची दृश्ये डोळ्यासमोर तरळत असतात. मन खंबीर झालेले असते. शहरी चालीच्या पायाना सह्याद्रीच्या कडेकपारीतील पाण्याचे धारदार पाणी मिळून त्यात नवा जोम आलेला असतो. त्यामुळे आपण रायगडचा निरोप घेतो ते तोरण्याहून पुन्हा पायी येण्याचा मनसुबा मनात बागवीतच पण...अधिक अवघड अशा बोचेघोळ नाळेने ! रायगड पाहून वारंगीला किंवा पाने गावी मुक्काम करून एका दिवसात घाट चढून वेल्हे येथे पुणे गाडी गाठणे असे रायगड भ्रमण अधिक योग्य ठरेल.

# दिवे घाटाखालील पेशवेकालीन वडकी तलाव

आजूबाजूला उंच डोंगर, काहीशी झाडी, दूरवर फुलारलेली शेते वाऱ्याच्या झुळुकीबरोबर डोलत आहेत आणि अथांग पाण्याच्या लाटा हळूच आदळून नीरव शांततेला पार्श्वसंगीत देत एक तलाव साय-काळच्या सोनाळ किरणात आपले अस्तित्व दाखवीत आहे.

अशा रम्य स्थळी जलविहार करावा आणि जललहरींमध्ये आपल्या अंतरंगातील विचारांचा कानोसा घ्यावा !

——कदाचित अशा विचारानीच वडकीचा तलाव बांधला गेला असेल.

मोहिमेतील शीण घालविण्यासाठी परतल्यावर आपल्या प्रियतम मस्तानीच्या हृदयावर समाजाने केलेले घाव दूर करण्यासाठी एखादे असे एकान्त स्थळ निवडून तिथे बुलंद वास्तू उभारावी अशाही कल्पनेने थोरले बाजीराव पेशवे यांनी हा तलाव बांधायला घेतला असावा

पुण्याहून सासवडकडे जाताना १७·६ कि. मी. वर ' वडकी नाला ' मागे पडला की दिवे घाटाची चढण सुरू होते. गाडी माथ्यावर गेली की डावीकडे दरीत एक अष्टकोनी तलाव आपली नजर हटकून वेधून घेतो हाच वडकी तलाव-मस्तानी तलाव !

दिवे घाटातील खिंडीपासून इथे जाण्यासाठी एक वाट उतरते.

पण यापेक्षा घाटाच्या पायथ्याच्या ' वडकी नाला ' थांब्यापासून तीन कि. मी. सपाटीच्या चालीने तळावापाशी पोचता येते. तलावापर्यंत जीप जाण्याजोगा रस्ता आहे.

तळावाला जी जागा निवडली आहे ती अप्रतिम आहे. तळावाला पाण्याचे लोट कुठून, कसे येतील याचा अचूक अभ्यास केला गेला आहे असे दिसते.

पेशव्यांच्या दोन निरीक्षकानी केलेले वर्णन याला पुष्टी देते.

" सेवेसी जगन्नाथ नागेश विज्ञापना ऐसीजे. छ. १२ मोहरमी ...सेवेशी विनती हेच की, पहिले पूर्वीचे नक्षत्राचे पाणी, लाबी उत्तरदक्षण तिही बुरुजामध्ये सुमारे १०० हात व रुदी पूर्व पश्चिम अशी नव्वद व खोली कोठे तीन हात कोठे चार हात येणेप्रमाणे होते पु ( ढे ) उत्तराचे दोन-तीन पाऊस बरेच पडले. पूर्वेकडील दोन्ही खोऱ्यातील ओढे व दक्षणेकडील तल्याचे पालीबाहेरील ओढे जिले वाहो लागले. ते खणोन बांधोन आणून तल्यात आणिले आहेत..

— सदरहू लि.।।प्रमाणे लिंगोजी निंबाणेकर व कुसाजी गायकवाड याणी आपले नजरेने पाहिले. "

तळावाचे क्षेत्रफळ सुमारे ५ ६ हेक्टर आहे. भिंतीची रुदी सुमारे तीन मीटर तर उची सहा-सात मीटर ! चार ठिकाणी घाट बांधलेले आहेत. पश्चिम भिंतीला तीन बुरूज आहेत. इथेच काठावर एक गणेश मदिर आहे. ( ह्या विघ्नहर्त्याभोवतीचे कचऱ्याचे विघ्न केव्हा दूर होणार कोणास ठाऊक ? ) गणेश मूर्ती सुबक आहे. मदिरा-बाहेरही एक पूर्वाभिमुखी गणेश मूर्ती आहे. इथेच भिंतीतील एका धक्क्यावर जाता येते. इथे एक शिवपिंडी आहे.

भिंतीवरील गणेश मूर्तीनजीक पूर्वी महाल उभा होता. त्याच्या खांबाच्या खुणा आजही दिसतात. महाल आज उभा नाही. पण

महालातून तलावाबाहेरील विहिरीत जाणारा भुयारी मार्ग मात्र अजून आहे. तो हल्ली बंद असल्याचे कळते. विहिरीत डोकावले तर त्या बाजूकडे एक द्वार दिसते ते ह्या मार्गाचेच.

याव्यतिरिक्त एक शिवमंदिर व एक मारुतीची मूर्तीही तलावा-नजीक आहे.

या तलावाला मस्तानी ' तलाव म्हणतात तेव्हा पहिल्या बाजीराव पेशव्यांनी याचे बांधकाम केले असावे. पण नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीत म्हणजे शके १६७३ ( इ. स. १७५१ ) मध्ये या तळ्यासाठी काही खर्च झाल्याचा उल्लेख आहे.

सांप्रत यातील अर्धी जागा ब्रिगेडियर जेन्कीन्स या सेनानींना इनाम मिळालेली आहे. इतर ऋतून इथे शेती केली जाते. पण हस्ताचा पाऊस झाला की भुलेश्वर रांगेतील पाणी भराभरा चहूकडून यात जमते. तलाव तुडुंब भरतो.

काठावर बसले की पाय गुडघ्यापर्यंत पाण्यात बुडतात. समोरच्या निळ्या लाटावर पाणकोंबड्या विहरत असतात. पाण्यावर विहरणारा खंड्या अचानक सूर मारून खाली येऊन परत वर झेपावतो. तलावा मागे डोंगरात दोन खिंडी डोकावतात. दिवेघाटातला उंच कातळ प्रस्तरारोहणासाठी खुणावतो. गिर्यारोहकाना या तलावाचा परिसर छान आहे.

सध्या तरी दुर्दैवाने तलाव रसिला दिसतो फक्त पावसाळ्यात! पाणी ओसरले की त्याचे तारुण्य हरपते.

काही डागडुजी करून तलावात जर वर्षभर पाणी राहील अशी योजना केली तर तलावाखालील विहिरींनाही त्याचा उपयोग होईल व हे भक्कम मराठी वास्तुशिल्प एक सहल केंद्रही होऊ शकेल.

615
232-70
REFBK-0023240